भूप्रवास -३१ सन १८८६

ले: सीताराम रामचंद्र गाइकवाड

पुणे शहर भा. १ ला

( श्री प्रिंटर्स ॲण्ड स्टेशनर्स, ठाणे )

# पुणे शहर भा. १ ला

(भू प्रवास)

३१

[illegible]
स. न. [illegible] - १८
सं. [illegible]

# पुणें शहर भाग १.

( पुण्याचा नकाशा, आणि पर्वती व
कार्तिक-स्वामी यांचें देवालयांचा
हुबेहुब देखावा यांसह )

भृंगे गुंजारवातें करिती शिरिं असे मत्त हत्तीहि जीते ।
डोळा देखोनि होते पळत भयभरें सोडुनीयां धृतीतें ॥
जेथें मुक्ताफलांचा खच बहु पडला त्या गुहे माजिं आतां ।
सिंहाच्या क्षुद्र कोल्हे कलकल करिती मृत्युनें त्यास नेतां॥१॥

हा ग्रंथ.

**सीताराम रामचंद्र गाईकवाड,**

( विजापूर वर्णन पुस्तकाचे कर्ते )


यांनीं तयार करून

' पुणेंवैभव ' छा० त छापून प्रसिद्ध केला.

जुलई सन १८८६.

ह्या पुस्तकाची मालकी सन १८६७ च्या २५ व्या
आक्ट' प्रमाणें नोंदिली असे.

किंमत चौदा आणे.


पुणें शहर
पुणें व खडकी कँटोनमेन्ट सह
स्केल १½ इंच=१ मैल
रखुणेंचा प्रकार
मुठा नदी
मुठा मुळा नदी
चित्रशाळा प्रेस पुणें सन १८८८
S. R. Sickardar

# प्रस्तावना.

दयाळू इंग्रजांचें राज्य इकडे झाल्यानंतर ह्या आपल्या देशाच्या इतिहासाकडे त्या लोकांनीं लक्ष्य पोंहचवून तो लिहून ठेविण्याचा उपक्रम सुरू ठेविला, या साधनामुळें लोकांची हळू हळू इतिहास ज्ञानाची अभिरुचि वाढत चालली. परंतु त्यांनीं लिहिलल्या इतिहासांत ‘ आप–पर ’ न्यायानें कांहीं तरी गोम असल्यामुळें सर्वथैव त्यांवरच भरंवसा ठेवून त्यांच्या ह्मणण्यास ‘ री ’ ओढणें हें बरोबर नाहीं व अशा समजुतीचा अलीकडे प्रादुर्भावही होत चालला आहे. ही मोठी अभिनंदनीय गोष्ट होय. या करितां आमच्या विद्वानांनीं या देशाचा खरा खरा इतिहास लिहून पुढील संततीस तिचा फायदा मिळण्याचीं साधनें खुलीं करून ठेविलीं पाहिजेत. इतिहास लिहिण्यास सगळा हिंदुस्थान देश अगर एखादा प्रांत—एखादें बलाढ्य राष्ट्रच पाहिजे असें नसून प्रत्येक गांवाचा–प्रत्येक खेड्याचा—प्रत्येक ठिकाणाचा–प्रत्येक इमारतीचाही इतिहास त्या त्या मानानें देण्याचें कोणी मनांत आणिल्यास तेणेंकरून ह्या देशाच्या एकंदर इतिहासांत मोठी भर पडल्यासारखी होऊन हा खरा इतिहास एकंदरीनें मोठा वर्णनीय होईल यांत शंका नाहीं.

श्रीमंत महाराज सयाजीराव गाईकवाड यांची

स्वारी गेल्या पावसाळ्यांत येथें ( पुण्यास ) आली. त्या वेळीं त्यांनीं ह्या पुण्याची एकंदर हालहवाल मला विचारिली, परंतु त्या समयीं मी ह्या स्थळीं अगदीं नवखा असल्यामुळें, महाराजांच्या प्रश्नां-चीं समर्पक उत्तरें मला देतां आलीं नाहींत. तेव्हां पासून या पुणेंशहराची प्राचीन व अर्वाचीन माहिती गोळा करण्याच्या नादीं लागून जगदीश—कृपेनें तें कृत्य शेवटास गेलें यामुळें मी महाराजांचा फार आभारी आहें.

हिंदुस्थानांतील मरमराटीच्या अत्युच्च शिखरास पावलेल्या इतर कित्येक बादशाही शहराप्रमाणेंच हें पुणें शहरही पूर्वीं प्रसिद्धीस येऊन मराठेशाहीचा ज्यावेळीं र्‍हास झाला त्यावेळीं ह्याच्या वैभवाचाही र्‍हास होत चालला ! एखादा नवखा व तशांत इतिहास शत्रु ह्या गतवैभवी शहरांत आला ह्मणजे तो येथील जुन्या-अमदानींतील घरेंदारें पाहून नाकें मुरडितो व वाटेल तशी 'अद्वातद्वा' जीभ हालवितो! ह्या 'पुण्याचें वर्णन' पुस्तकाची जाहिरात प्रथमतः आह्मीं लोकांत प्रसिद्ध केली असतां कांहींकांस आमचा हा उद्योग न आवडून ते 'हे पुण्याचें काय लिहिणार ? त्यांत काय आहे' असें देखील ह्मणून चुकले ! ह्यावरून त्या लोकांस पुणेंशहर ह्मणजे काय हें समजण्याचीच मुळीं मारामार पडली असावी, असें दिसतें. असो.

ह्या पुस्तकाचीं एकंदर सहा प्रकरणें आहेत. पुस्तक मोठें होईल ह्या भीतीनें सातवें प्रकरण " क-

वर्ने " जोडलें नाहीं. तें पुणें भाग २ ह्या पुस्तकाचे अखेर जोडूं. पुस्तकांत जे दोन नकाशे दिले आहेत, ते येथील प्रसिद्ध कारागिरांकडून तयार करविले आहेत. त्याचप्रमाणें माहिती दिली आहे ती फारकरून आधारपूर्वक दिली आहे. बॉंबे-ग्याझेटीयर ह्या पुस्तकाची, तसेंच कित्येक-इंग्रजांच्या पुस्तकांची मला बरीच मदत झाली, यामुळें त्यांच्या कर्त्यांचा मी फार आभारी आहें. तरी पण ही सर्व माहिती मी जुन्या लोकांच्या मतांशीं व कोठें कोठें जुने लेख-कागदपत्र सांपडले त्यांशीं त्यांशीं ताडून पाहून दिली आहे, असें करितां जेथें जेथें विरोध आढळला तेथें तेथें बहुतेक ठिकाणीं टीपा देऊन तो व्यक्त केला आहे. ' रावबाजी ' हें नांव ह्या ग्रंथांत दुसरा ( शेवटला ) बाजीराव ह्यास योजिलें आहे.

" महाराष्ट्रांत उदय पावले जे पेशवे, त्यांचे व त्यांच्या पदरच्या शूर सरदारांचे तिन्हाइतांप्रमाणें तुह्मीं गुण गाइले, पण तुमच्या स्वतःच्या घराण्या संबंधानें कांहीं तरी वर्णन या ठिकाणीं द्यावें " ह्मणून माझ्या मित्रमंडळींनीं मला सूचविलें, पण त्यांची ती सूचना मला प्रथमतः पसंत पडली नाहीं, परंतु पुढें विचारांतीं त्यांचें ह्मणणें कबूल करावें असा माझा विचार ठरला. कारण, यांत कांहीं गैर नसून उलट अशी चाल पडणें हितप्रद आहे, असें माझें मत आहे. ग्रंथकर्त्याची स्वतःची माहिती समजून घेण्याची वाचकांस फार इच्छा असतेच,

तेव्हां ती माहिती ग्रंथकारानें देऊन ठेविल्यास कदापि वायां जाणार नाहीं. शिवाय या संबंधानें इतरांस अशीही विनंती आहे कीं, प्रत्येकानें आपल्या ग्रंथांत आपल्या पराण्या संबंधानें माहिती दिल्यास इतिहासदृष्टया व एकंदरीनेंही तिचें चीज झाल्याविना–राहणार नाहीं.

माझें उपनांव ' गाईकवाड '. गाईकवाड हें उपनांव आम्हांस मिळण्याचें कारण असें झालें कीं, सुमारें तेराव्या शतकांत पिठोराचे वंशापैकीं क्षत्रीय कूलोत्पन्न राजाजीराने रजपूतस्थानांत राज्य करीत होते. राजाजीचें व दिल्लीच्या बादशहाचें वितुष्ट आलें. बाशहहा राजाजीवर चालून आला व त्यानें कित्येक दिवसपर्यंत राजाचीची राजधानी चितूर ( चितोड किंवा चित्रकोट ) हीस वेढा दिला; त्यामुळें राजा अगदीं त्रस्त होऊन एके दिवशीं आपले नातेवाईक ह्यांस घेऊन तटा बाहेर कोसळला. पण ह्या थोड्या रजपूत लोकांचें बादशहाचे दोन तीन लाख फौजेपुढें कांहीं चाललें नाहीं. राजाजीच्या भाईबंदांचा बादशहाचे फौजेनें धुराडा उडविला, यांतून जे कांहीं सुटले त्यांनीं दक्षिणेचा मार्ग धरिला. व आपली पूर्वींचीं उपनांवें बदलून नवीं नांवें गाईकवाड, पवार, घाडगे, भोंसले, निंबाळकर व जाधव हीं ठेविलीं. या प्रमाणें आमचें ' गाईकवाड ' हें नांव पडलें.

गाईकवाड वंशांतील पुष्कळ पुरुष लढवय्ये होऊन गेले, त्यांनीं आपल्या बाहुबळें करून महारा-

ड्यांत स्वतंत्र इनामें करून घेतलीं; व आपल्या भा-
वाबंदांपासून अगदीं अलग ( विभक्त ) होऊन रा-
हिले. आमच्या घराण्यांतील विठोजीराव गाईकवाड
हे कोंकणांत शाहुमहाराजांचे प्रारंभीं कोंकणचा
कांहीं भाग संभाळण्यास गेले. त्यांनीं आपला डेरा
बापर्डे नामक गावीं दिला. त्यावेळीं ह्या खेड्यांत
दहापांच घरें होतीं, पण पुढें तें खेडें बरेंच नांवारू-
पास आलें. विठोजीरावांचा पुत्र ( माझे पणज्याचा
बाप ) मुराररराव गाईकवाड हा संभाजी आंग्रे ह्यां-
पाशीं सरदारी पतकरून राहिला. पुढें इ० स०
१७३८ यावर्षीं आंग्रे यांचें शिद्दीशीं जें युद्ध झालें
त्यांत मुराररराव पुढारी असून यानें शिद्दीस अगदीं
जर्जर करून पळावयास लाविलें, पण दुर्दैवानें शि-
द्दीच्या कंपूतून एक गोळी येऊन ह्या शूर मुराररराव
गाईकवाडाचा तिनें प्राण घेतला! मुराररावाचा
अंत झाल्यावर त्याची स्त्री व अजाणता पुत्र हीं
बापर्डे येथें होतीं, त्यांस संभाजी आंग्रे यांनीं त्या
गांवची सनद करून दिली ( छं० ११ सफर सन
आर्बेनमया व आलफ ह्मणजे इ० स० १७३९. )
पुढें पेशवाईचा अंत झाल्यावर ती सनदबिनद गुंडा-
ळून इंग्रज सरकारानें आह्मांस सुमारें तीनशें रुपयांचे
नक्त नेमणुकीवर आणून बसविलें. त्याप्रमाणें ती
अजून चालत असून आह्मी बापर्डे गांवींच रहातों.
माझा जन्म इ० स० १८५९ च्या सुमारास झाला.

१ टीप– हें खेडें रत्नागिरी जि० देवगड तालुक्यांत आहे.

( १ ) ऑन० के. टी. तेलंग. एम्. ए; एल्.
एल्; बी. सी. आय् ई.

( २ ) रा. ब. कृष्णाजी नारायण खेर बी. ए.
एल्. एल्. बी. स. जज्ज.

( ३ ) रा. ब. चिंतामण नारायण भट. बी. ए.
एल्. एल्. बी स. जज्ज.

( ४ ) रा. ब. बाबाजीराव लक्ष्मण सावंत फ.
क्ला. स. जज्ज.

( ५ ) रा. ब. मार्तंड बापुजी गुप्ते. स. जज्ज.
नवसरी, वगैरे कित्येक विद्वान व हितचिंतक गृहस्थां-
कडून माझ्या "विजापूर वर्णन" पुस्तका संबंधानें
अभिनंदनपूर्वक अभिप्राय आले त्यांचे आभार मान-
ण्याची मी येथेंच परवानगी घेतों.

हें पुस्तक तयार करण्याचे कामीं, माझे परममित्र
**मि. दिनकर गणेश पेंढारकर** हेडमास्तर आंग्लो
व्हर्न्याक्यूलर स्कूल करमाळें यांनीं मला फार
मदत दिली त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें.

ह्या प्रथम भागास जशी आश्रयदात्यांनीं मला
मदत दिली तशीच ते दुसऱ्या भागास पुढें मदत
देतील अशी आशा धरून आहे.

पुणें ता. १६।७।८१ } आपला.
सीताराम रामचंद्र गाईकवाड.

[library stamp]

ईशकृपाहिकेवलम्.

# पुणें शहर.

( प्राचीन व अर्वाचीन. )

## भाग १.

## प्राचीन पुणें.

( प्रकरण पहिलें. )

### ऐतिहासिक माहिती.

पुणें हें शहर उत्तर अक्षांश १८°–३०' व पूर्व रेखांश ७३°–५३' यां वर आहे. हें मुंबई पासून ११९ मैलांचे अंतरावर आहे. याची उंची समुद्राचे सपाटी पासून १८५० फूट आहे. ह्याच्या चतुःसीमाः—पश्चिमेस मुठा नदी, उत्तरेस ( मुळा–मुठेचा ) संगम, पूर्वेस बहिरोबाचा नाला आणि दक्षिणेस व आग्नेयीस उंच सखल लहान लहान डोंगरांचीं टेंकाडें, येणें प्रमाणें दिसत असून दूरवर सिंहगड व भुलेश्वरादिकांचीं भव्य शिखरें दृष्टीस पडतात.

हें ठिकाण ( मुळा–मुठेच्या ) संगमावर असल्यानें इतर पवित्र ठिकाणांमध्यें याची ही गणना होणें

साहजिक आहे. व पुण्यपत्तन—पुण्यपूर—इत्यादि या ठिकाणाचीं नांवें हेंही याच गोष्टीचें द्योतक आहे*

सांप्रतच्या मनोहर व मध्यंतरच्या भाग्यशाली अशा ज्या शहराचें आपण वर्णन करीत आहों तें ठिकाण, पूर्वीं शहर या संज्ञेत मुळींच नसून (इ० स० ६१३ च्या सुमारास) १०-१५ झोंपड्यांचें एक खेडें होतें. ज्या ठिकाणीं हल्लीं आपण टोलेजंग वाडे—सुरेखशा बागा—कारंजीं—बाजारची दाटी—गाड्यांचा दणदणाट इत्यादि थाट अवलोकन करीत आहों, व ज्यांत हल्लीं अठरापगड जात खेचून भरली आहे, त्या ठिकाणीं पूर्वीं शेतकऱ्यांचा नांगर फिरत असे! त्या वेळीं या भिकार खेड्यांत वस्ती ह्मटली ह्मणजे मासेमारू धीवर व एक दोन ब्राह्मणांच्या झोंपड्या एतावता पांच-पन्नास लोकांच्या आंतच कारभार- सभोंवतीं अतोनात जंगल असून गर्द झाडींतून हिंसक पशूंच्या गर्जना दिवसा ढवळ्या ऐकूं येत. ज्या संगमावर सांप्रत गोरे व त्यांचें अनुकरण करणारे काळे लोक मोठ्या मजेनें हवा खाण्यास, चैनीनें सहल करावयास, थाटदार घोड्यांच्या गाड्यांतून, आपल्या कुलवधूंसह जातांना आपण पाहतों, त्याच संगमावर पूर्वीं इतकें घोर अरण्य होतें कीं, दिवसा देखील तेथें जाण्याची प्राज्ञा होत नव्हती.

* पंधराव्या शतकांत पुण्यास 'पणतु' हें नांव चालत होतें असें ह्मणतात.

ह्या वेळीं पुण्यांत बहिरोबा, मारुती, नारायणेश्वर, पुणेश्वर व ह्मसोबा अशीं पांच देवस्थानें होतीं व तीं त्या काळच्या लोकवस्तीच्या मानानें फार होतीं म्हटल्यास विशेषसा बाध येईल असें वाटत नाहीं.

ह्या खेड्याचा इतका भाग्योदय होण्याचें नैसर्गिक कारण सभोंवतालचा प्रदेश सुपीक—पाणी सुंदर असून विपूल हेंच होय. पुढें हळूहळू पुणें वाढत जाऊन कासरली व कुंभारली अशीं दोन छोटींशीं खेडीं* होतीं, तीं पुण्यांतच मोडूं लागून त्यांस अमळ गांवाचें रूप आलें. हें पाहून मुसलमानांचा उजवा डोळा लवूं लागला.

इ० स० १२९० त अल्लाउद्दीन खिलजी यानें ह्या प्रांतावर झेंप घालून पुणें हस्तगत करून घेतलें व बरार हबशी+ नामक एका ' अल्लोपासक ' सरदाराच्या हातांत पुण्याची लगाम दिली व येथें राहून, आसपासचा मुलुख नजरे खालीं घालावा असा त्यास हुकूम फर्माविला. या बरार किंवा वाऱ्यानें आपल्या कारकीर्दींत पुण्याचे सभोंवार भला भक्कम मातीचा एक तट बांधिला होता त्यास कुंभारवेस, केदारवेस व मावळवेस असे तीन दरवाजे होते. ह्या कोटाच्या भिंतीस पांढरी भिंत असें नांव होतें ( हल्लीं ह्या को-

---

* पुणें वाडी, माळी, मुंजेरी इ० आणखी दुसरी कांहीं खेडींही पुण्यांत मोडूं लागलीं असें ही म्हणतात.

+ ह्यानें पुण्याचे आसपास सत्तावीस किल्ले इ० स० १२७९त बांधिले ( शिवछत्रपति सत्य प्रकरणात्मक चरित्र )

टासच कसबा पेठ असें ह्मणतात. ) हिचा कांहीं भाग कसब्यांत हल्लीं अवशिष्ट आहे. त्यास जुना कोट असें म्हणतात. ह्या कोटांतून नदीवर जाण्याच्या असलेल्या पायऱ्या अगदीं झिजून झडत चालल्या आहेत. त्यांस ‘ पुरंदऱ्याच्या पायऱ्या ’ किंवा ‘ सांपिड्या महादेव ’ असें नांव प्राप्त झालें आहे. असो.

हा सरदार आपल्या लवाजम्यासह ह्या कोटांतच राहत असे. लष्करी सामान, लष्करी लोक, दारुगोळा वगैरे सरंजामही कोटांतच असे. खेड्यांतील रहिवाशी ह्मणजे शेतकरी व इतर भटभिक्षुक हे मात्र कोटाच्या बाहेर आपल्या कुंबळ्यांच्या घरांत राहत असत. याच्याच कारकीर्दींत नवीन चार पेठा वसल्या गेल्या. त्यावेळचीं त्यांचीं नांवें वेगळींच होतीं पण हल्लीं ह्या पेठांस रविवार, मंगळवार, बुधवार व शनिवार अशीं नांवें आहेत. दिवसेंदिवस ह्या पेठांस अधिकाधिक रूप चढत चाललें व येथल्या व्यापारास अर्थात् चढती कळा येत चालली.

इ० स० १५९५ च्या सुमारास मालोजी भोंसले ( शिवछत्रपतीचे आजे ) निजामशाही दरबारांत चाकरीस होते, तेथें त्यांचें प्रस्थ बरेंच वाढलें व पुढें गादीचा मालक दुसरा निजामशहा याची मर्जी मालोजींवर प्रसन्न होऊन त्यानें मालोजीस पुणें, सुपें, शिवनेर व चाकण हे चार परगणे जहागीर करून दिले. पुढें इ० स० १६२० त अहंमदनगरचा सरदार सिद्दीयाकूत याचें मन भोंसल्यांविषयीं

कांहीं क्षुल्लक कारणानें कलुषित होऊन तो पुण्यावर चालून आला व गरीब रयतेवर त्यानें शस्त्र धरिलें. रहिवाशांनीं खानाच्या धास्तीनें घरेंदारें सोडून कोंडाण्याचे रानांत व जिकडे आश्रय मिळाला तिकडे, पळ काढिला. नंतर या वेड्या बोकडानें सर्वांचीं घरें लुटून आपला मार्ग धरिला !

अजून पुण्याचीं ग्रहदशा संपली नव्हती. खानाच्या या तडाक्यांतून पुण्याचीं मुंडी अमळ वर निघते आहे तोंच इ० स० १६२९च्या सुमारास दुष्काळ रूपी महाराक्षस तोंड वासून पुण्यावर धांवला. व भडाभड लोकांस घशांत ओढून घेऊं लागला. या अनर्थापातामुळें कित्येक कुटुंबांत पीसही जिवंत राहिली नाहीं. हा स्वाहाकार चालला आहे तोंच विजापूरचा शूर मंत्री मुरारपंडित फुरफुरत व अस्तन्या वर चढवीत पुण्यावर चालून आला! आधींच दुष्काळाच्या तापानें लोक त्रस्त झालेले, तशांत ही पंडितजींची ' विजापुरी ' टोळधाड ! मग काय पुसावयाचें आहे? लोक धायमाय मोकलून रडूं लागले ! कित्येकांनीं आपल्या जन्मभूमीचें शेवटचें दर्शन घेतलें व कित्येक तेथल्या तेथेंच पंडिताच्या शिपायां बरोबर लढून देह ठेविते झाले ! कित्येक दांतीं तृण धरून त्यास शरण गेले ! ! ह्या प्रमाणें लोकांची पुरी दुर्दशा उडाली गांव अगदीं उजाड पडला. असें झाल्यावर पंडितरावानें गांवांत मशाल फिरवून गांवाचा अगदीं सत्यानाश करून टाकिला. कोटाची भिंत धुळीस मिळविली. व ती वरून गा-

ढवांचें जोत फिरविलें! वाचकांस त्याच्या ह्या शेवटच्या कृतीचें कदाचित् आश्चर्य वाटेल. त्यानें हें कृत्य यापुढें या गांवांत कोणी वसाहत करणार नाहीं अशा कुत्सित बुद्धीनें केलें होतें.

निजामशाहीचा अस्त झाल्यावर शहाजींनीं आदिलशाहीचा आश्रय केला. पुढें तर आदिलशाहीच्या कृपेंतीळते एक बडे सरदार बनले व युक्तीनें आपल्या बापाची जहागीर जी यावेळीं विजापूरकराकडे होती ती परत मिळविली. ह्या प्रमाणें इ० स० १६३९ त ही जहागीर पुनरपि भोंसल्यांच्या घराकडे आली.

पुणें हें नैसर्गिकच रम्य ठिकाण भोंसल्यांनीं आपलें वसतिस्थान केलें. शहाजींला नौकरी संबंधानें बाहेर राहणें पडे ह्यामुळें जहागिरीची व्यवस्था पाहण्याकरितां त्यांनीं दादोजी कोंडदेव नामक एका हुशार ब्राह्मणास आपला कारभारी नेमिलें. दादोजीच्या दक्षपणामुळें पुण्यास पूर्वीं आलेली निकृष्ट स्थिति बरीच सुधारली. त्यानें जमिनीचे धारे कमी करून शेतीस उत्तेजन दिलें. सभोंवतालच्या रानांतील हजारों हिंसक पशु मारून टाकून लोकांची भीति कमी केली. चोरटे व दऱ्या खोऱ्यांतून असणारे इतर रानटी लोक यांस आपलेसें केलें. पांच सालांच्या करारानें त्यांस जमिनी फुकट करून दिल्या. कित्येकांस हत्यारें देऊन आपले विश्वासु शिपाई बनविले. एतावता जितके ह्मणून होण्या-

सारखे होते तितके उपाय योजून दादोजीनें पुणें बरेंच नांवारूपास आणिलें.

पूर्वीं अनेक वेळीं पुण्यास परशत्रूपासून किती विपत्ति भोगाव्या लागल्या होत्या, या गोष्टीवर धोरण ठेवून शहाजींनीं आपल्या जहागिरीवर ( अर्थात् पुण्यास ) एक तरवारीचा मनुष्य असावा अशा विचारानें मलठणकर नामें एका पराक्रमी सरदारास नेमिलें. त्यानें घोड्यांनीं जमीन नांगरून पूर्वीं मुरारपंडितजीनीं पांडित्य लढवून लोखंडाची मेख मारिली होती ती काढून त्या ठिकाणीं सोन्याची मेख ठोकून दिली ! हें देशाच्या भरभराटीचें सुचिन्ह होय !

पुढें जुन्या कोटांत शहाजींचे हुकुमावरून दादोजीनें एक सुंदर महाल बांधिला व त्याचें नांव लाल महाल असें ठेविलें. शहाजींस आपल्या नौकरीच्या नात्यानें मोहिमेवर जाणें पडे, त्या मुळें त्यांनीं आपली प्रियपत्नी सुवीरसू जिजाबाई व अल्पवयी पुत्र शिवाजी यांस पुण्यांतच राहण्यास पाठविलें. तीं उभयतां या लाल महालांत राहत असत. हा महाल सांप्रत ‘ अंबारखाना ’ या नांवानें प्रसिद्ध आहे. कसब्यांतील गणपतीचें पुरातनचें देवालय हें जिजाबाईनें बांधिवलेलें आहे. तिची गणपतीच्या ठिकाणीं फारच निष्ठा होती.

इ० स० १६४७ त दादोजी निवर्तला, तेव्हां त्याचा कारभार शिवाजीच पाहूं लागले, म्हणजे ते आपल्या बापाचे दिवाणजी बनले, व त्यांनीं आप॰

ऱ्या कर्तबगारीस आरंभ केला. आपले लंगोटयार मावळे यांस जमा करून व त्यांचें धुरीणत्व स्वतः पतकरून त्यांनीं मोंगलांस त्राहि त्राहि करून सोडिलें. याप्रमाणें उत्तरोत्तर शिवाजींची कीर्ति, वैभव, शाहणपण व शौर्य इत्यादि गुणांचा परिमल सर्व हिंदुस्थानभर पसरला! परंतु औरंगजेब—प्रभृति हिंदुद्वेष्टयांस मात्र तो सहन न होऊन तो परिमल त्यांच्या पित्तक्षोभास कारण झाला!

नंतर औरंगजेबानें संतापून 'ह्या डोंगर पोखऱ्या लंड चोरास बेडी ठोकून दिल्लीपतीच्या कदमापाशीं आणावें' म्हणून हुकूम फर्माविला, पण शिवाजींच्या अमानुष कृत्यांवरून व त्यांच्या दराऱ्यामुळें बादशहाचा शब्द झेलण्याची त्याच्या सरदारांतून कोणाचीही छाती होईना. शेवटीं या कृत्यास शाहिस्तेखान छाती ठोकून उद्युक्त झाला. त्यानें इ० स० १६६२ त थोडेंच (!) म्हणजे सुमारें दीड दोन लक्ष सैन्य बरोबर घेऊन पुण्याकडे रोंख फिरविला, व खानांची स्वारी थेट लाल महालांत येऊन उतरली. शिवाजी या समयीं पुरंदरास होते, त्यांस ही बातमी समजल्याबरोबर ते पुण्याजवळ सिंहगड किल्ल्यांत येऊन रातोरात थोड्या लोकांनिशीं पुण्यास दाखल झाले, व मोठ्या धाडसानें लाल महालांत अचानक उतरले! खान साहेब आपल्या स्त्रीमंडळांत निमग्न असतां समशेर बहादर शिवाजी आपणापुढें उभा पाहून या अल्ला! या अल्ला! सैतान! सैतान! असें म्हणत खिडकी-

तून उडी टाकून जीव घेऊन पळाले. या समयीं शिवाजींनीं खानाचे करांगुलीचा तुकडा पाडला, व या पहिल्या भेटींतच खानांच्या वीरश्रीची इतिश्री होऊन दुसरेच दिवशीं त्यांनीं गाशा गुंडाळिला.

असो. याप्रमाणें शिवाजी महाराजांनीं अनेक प्रसंगांतून पार पडून, युक्तीप्रयुक्तीनें मोंगलांच्या हातावर तुरी देऊन, मराठ्यांची गादी स्थापिली, व छत्रपति हें पद घेतलें. व इ० स० १६८० सालीं या मृत्यु लोकचा कंटाळा केला.

शिवाजींच्या मरणानंतर पुढें आठ वर्षांनीं ( म्ह० इ० स० १६८८ त ) औरंगजेबानें बहुतेक महाराष्ट्र-देश काबीज केला, त्या वेळीं पुणेंही त्याच्या पदरीं पडलें. औरंगजेबानें आपला मोहनलाल नामें सर-दार याजकडे पुण्याची व्यवस्था ठेविली. व त्या-स हुकूम फर्मावून ठेविला कीं, ‘ तुझ्यानें होईल तितकें करून अल्लाचें नाम घेणाऱ्यांची वस्ती पुण्या-स अधिक करावी.’ यावरून पुढें पुणें ‘ दाढीमय ’ होत चाललें. सुमारें पंधरा वर्षें मोहनलालानें धुमाकूळ माजवून पुण्याचा बहुतेक भाग मुसलमानां-च्या वस्तीनें आबादित केला.

इ० स० १७०३ या वर्षी मोहनलाल पैगंबर लोकवासी झाल्यानंतर औरंगजेबाची स्वारी पुण्यास आली होती, त्यांचा तळ मोहनलालाचे थडग्या शे-जारीं बोरबनांतच होता. ( या बोरबनास सध्या भवानी पेठ असें नांव आहे. ) याचें थडगें पाहून

बादशहास फार वाईट वाटलें, व पुण्यास त्यानें त्याचें स्मारक समजून मोहिनाबाद असें नांव दिलें. हें नांव फार दिवस चाललें नाहीं. हल्लींच्या बुधवार पेठेस मात्र 'मोहिनाबाद' असें पूर्वी ह्मणत असल्याचें समजतें. औरंगजेब या बनांत एक वर्षपर्यंत होता. तेथें त्याचा नातु मोहीउलमुल्क मृत्यु पावला त्यामुळें हल्लींच्या भवानी पेठेस मोहीउल्मुल्काची पेठ असें नांव ठेवून स्वारी चालती झाली. ह्या समयीं त्यानें बहुतेक हिंदु देवालयें भ्रष्ट केलीं असें म्हणतात.

पुढें औरंगजेबाच्या मरणानंतर (इ. स. १७०७ त) ताराबाईनें धनाजी जाधव यास पुण्याच्या मोहिमेवर पाठविलें या वेळीं लोदीखान नामें कोणी जबरदस्त सरदार पुण्यावर अंमल चालवीत होता, पण धनाजीनें त्यास चीत करून पुण्यांत मराठ्यांचा झेंडा रोविला! तरी पण पुणें पूर्णपणें मराठ्यांच्या अमला खालीं आलें नाहीं. मोंगल लोक पुण्याची फक्त चौथाई मात्र मराठ्यांस देत. परंतु शाहूराजांला हें न आवडून पुण्याचे कामगिरीवर त्यांनीं बाळाजी विश्वनाथ यांस पाठविलें. या सुमारास मोंगलांचा रंभाजी नामें सरदार पुण्याची सुभेदारी गाजवीत होता. याप्रमाणें पुण्यास द्विधा अधिकारी नांदूं लागले. पण एकाचा पायपोस एकाचे पायांत नसल्यामुळें प्रजेवर जुलूम होऊं लागला. एक वेळ तर रंभाजीनें गरीब प्रजेवर शस्त्र उचलून पुणें मनसोक्त लुटलें. परंतु पुढें बाळाजींच्या पराक्रमा पुढें मोंगलांचें कांहीं एक न चालून एकदांचें

[library stamp, illegible]

[illegible]सुमे[illegible]चें [illegible] मो[illegible] [illegible] पूर्णपणें मराठ्यांच्या ताब्यांत आले. [illegible] मराठी शक १६४० विलंबीनाम संवत्सर ( सन ११२८ फसली ) हा सांपडतो. ह्यापुढें बाळाजींकडे पुण्याचा कारभार निर्वेध चालू लागला.

बाळाजी विश्वनाथ निवर्तल्यानंतर ( शके १६४२ शार्वरीनाम संवत्सरे छं. २० जमादिलाखर या दिवशीं ) पेशवे पद त्यांचा मुलगा बाजीराव यांजकडे आलें, अर्थात् पुणेंही त्यांचेच अधिकारा खालीं आलें. बाजीरावांचे मनाचा कल देश काबीज करण्याकडे विशेष असल्यामुळें, व मराठ्यांचा भगवा झेंडा अटकेपर्यंत फडकाविण्याचें त्यांचे ध्यानीं मनीं घोळत असल्यामुळें, पुण्यांतच त्यांचें मन घोंटाळून राहिलें नाहीं. पुण्याची कामगिरी त्यांनीं बापुजी

---

1. The family of Balajee Wiswanath appear to have been Deshmookhs of Dhunda-Rájpoor and Balajee had formed the customs of the Port; but it proving an unprofitable speculation he was unable to make up the deficiency and fled. The Peshwa's Deshmookhy claims upon Dhunda-Rajpoor amounting to 10 or 12,000 Rupees are I believe still paid. (*Itinerary for Western India* 1828.)

2. The Persian title of *Peshwa* was brought into use in the Deccan in A D. 1397 by Ghaias-ud-din Bahmani. It was adopted from the Bahmanies by the Ahmednagar kings and from the Ahmednagar kings by Shiwajee (*Briggs Ferista* II.)

श्रीपत नांमे सरदाराकडे सोंपविली. आजपर्यंत पेशवे सासवडास[1] राहत असत पण १७३१ इ. पासून त्यांनीं आपलें मुख्य ठिकाण पुणें करून ते पुढें शनिवारच्यावाड्यांत राहूं लागले.

पुण्यांतील लोकांना गोरकायाचें मुखावलोकन करण्याचा सोन्याचा दिवस पहिल्यानें इ० स० १७३९ त उगवला. त्या वेळीं या गोऱ्या फटफटीत माणसास पाहण्यास लोकांचे थवेच्याथवे धांवले ! ह्या साहेबाचें नांव ' गार्डन् ' असें होतें. हा साहेब कंपनी सरकारचा एक वकील असून मुंबईहून साताऱ्यास जात असतां मध्यंतरीं पुण्यांत उतरला होता. पुणें शहरच्या त्यावेळच्या भरभराटीचें वर्णन करीत असतां गार्डन साहेबानें ऐके ठिकाणीं असें ह्मटलें आहे:—" पुण्यासारखें सुबक शहर अवध्या हिंदुस्थानांत सांपडणें कठीण ! मला हें शहर मोठें भरभराटीस आलेलें दिसलें, बाजारांत शाकभाज्यांचे ढिगांचेढीग माझ्या दृष्टीस पडले, लोखंड व तोफा करण्याचे कारखानें मी अनेक पाहिले, कोष्टी, माळी, माळी इत्यादिकांची कारागिरी

(१) सासवडास पेशव्यांचे दोन वाडे आहेत. पैकीं जुनावाडा तीन चौकांचा होता. परंतु हल्लीं मागील दोन चौक पाडून पुढील चौकांत सरकारी मराठी शाळा ठेविली आहे, व नवा वाडा नदीच्या पलिकडे गांवा बाहेर आहे त्यांत कांहीं फेरफार करून मामलेदार कचेरी घातली आहे (काव्येतिहास संग्रह )

2 *Bombay Gazetteer Vol. XVIII Part III.*

पाहून तर मी थक झालों. सर्व पृथ्वीतील माल एका पुण्याचे बाजारांत माझे दृष्टीस पडत होता. लोक सुखी व सधन असून त्यांचे अंगावर जवाहीर लयलूट होतें. येथें व्यापार प्रचंड चालत होता. मालाचे गठेच्यागठे लादलेल्या हजारों गाड्या सर्व मुलुखांत रवाना होत होत्या. पेशवाईस जशी जशी चढती कळा येत चालली तसतसा व्यापारही वाढत चालला आहे."

बाजीराव पेशवे मोठें नांव कमावून इ० स० १७४० त मृत्यु पावले, नंतर त्यांचा वडील पुत्र बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब हे पेशवे पदारूढ झाले. ह्यांनीं आपलें कारस्थान लढवून मोठ्या मसलतीनें शाहू राजापासून त्याच्या अंतकाळीं 'पेशवाईचा अधिकार आपले वंशपरंपरा चालावा इत्यादि अर्थाची' सनद करून घेतली. पुढें इसवी सन १७५० त पेशव्यांनीं आपलें गादीचें मुख्य ठिकाण पुणें ठरवून ते पुण्यांतच स्थाईक येऊन राहिले व ते राजेच बनले. नामधारी राजे साताऱ्यास असत, त्यांचा मोठेपणा इतकाच ठेविला होता कीं, पेशव्यास पेशवाईचीं वस्त्रें स्वीकारण्यास साताऱ्याचे गादी पाशीं जाऊन राजाकडून तो मान घ्यावा लागत असे.

पुढें इ० स० *१७५९ त पुणें शहराभोंवतीं

* टीप—पण पंतप्रधान ह्यांचे सालवार कारकीर्दीत शके १६८१ म्ह० १७६० इसवी ह्या तटास प्रारंभ केला असें लिहिलें आहे.

एक भक्कम तट असावा असा नानासाहेबांचा विचार ठरून त्यांनीं तें काम शहरचे कोतवाल जिवाजीपंत खासगीवाले यांजकडे सोंपविलें. हा ३० फूट रुंद व १५ फूट उंच असावा ह्मणून ठराव झाला होता, व अर्धमुर्धें कामही झालें होतें इतक्यांत छत्रपती महाराजांनीं शालजोडींतला निरोप पाठविला कीं ' मराठ्यांचा झेंडा अटकेपर्यंत बिनधास्त फडकत असतां तुह्मीं भागूबाई प्रमाणें दगडा मातीच्या ढिगांनीं आपला बचाव करूं इच्छितां हें तुमच्या शूरपणास उचित आहे काय ? पुण्यास उंदरांच्या बिळाचें साम्य आणितां काय ? मराठ्यांचे गादीस हें लांछन नाहीं काय ? ' हा मरमरीत निरोप येतांच गवंड्यांनीं जागचे जागींच दगड ठेवून दिले. हें अर्धेमुर्धें काम नागझरीचे बाजूनें हल्लीं कोठें कोठें दिसतें.

बाळाजींचे कारकीर्दींत मिशनरी टिफेनथेलर नामक पुण्य पुरुषाचे पांढरे शूभ्र पाय या पुण्य भूमीस ( पुण्यास ) लागले. या ख्रिस्ती भटानें हल्लींच्या लोंचट ख्रिस्ती भटांसारखी डोकेफोड करून हिंदुजनांस तारणाच्या मिषानें येशूच्या कळपांत ओढून घेण्याच्या युक्तीचा प्रयोग मात्र त्या वेळीं चालविला नाहीं. त्या वेळीं महाराष्ट्रीय लोक स्वधर्मतत्पर असल्यामुळें ते आपल्या दैदीप्यमान तेजानें यास कदाचित् जाळून टाकिते. असो. हा साहेब तर पुण्यास अगदीं भुलून गेला. तो ह्मणतो—“ काय तीं पुण्याचीं सुंदर घरें ! काय ते

लोक सुखी ! काय ते त्यांच्या अंगावर अलंकार ! स्त्रिया तरी किती सुंदर ! मला तर त्या सुवर्णानें पिवळ्याधमक झालेल्या दिसत होत्या ! स्वस्ताई तरी किती सांगूं ? मला पैशाचीं अंडीं सहा मिळा- लीं ! माझे नोकरानें रुपयाला २९ शेर गहूं आणि- ले ! भाज्यांची लयलूट तर पुसूंच नका ! मला पुणें केवळ स्वर्गतुल्य भासलें ! !"

पानपतच्या लढाईच्या जबर धक्क्यामुळें बाळा- जींनीं देह*ठेविल्यानंतर (इ.स.१७६१त) त्यांचा वडील पुत्र माधवराव ( ज्यांस थोरले माधवराव किंवा प- हिले माधवराव म्हणतात ) हे पेशवे झाले. हळू हळू पुण्याचीं कीर्ति सर्व जगभर पसरल्यामुळें शे- जारच्या निजामअल्लीच्या डोळ्यांत पुणें सलूं लागलें, व माधवराव पेशवे-पदारूढ होऊन तीन वर्षें झा- लीं नाहींत तोंच अगणित सैन्य घेऊन तो पुण्यावर चालून आला. या वेळीं लोक गैरसावध होते, या मुळें पुण्याची पुष्कळ नासाडी होऊन कैक लोक मारले गेले, व मोंगलांनीं लूट करून आपली तुंबडी भरून घेतली.

माधवरावांचे कारकीर्दीपर्यंत इंग्रज लोक पुण्यांत जाऊन येऊन मात्र असत. व पुण्याचें ऐश्वर्य पाहू- न या बुभुक्षित पण दीर्घ प्रयत्नी मंडळीच्या जिभेस

---

* टीप—शके १६८३ जेष्ठ वद्य षष्ठीस पर्वतीवर देह ठेवि- ला. त्यावेळीं गोपिकाबाई व नाटकशाळा पलिकडच्या खोलीं- त होत्या त्यांनीं भारी आकांत केला. रघुनाथरावांनीं पेशव्यां- स मांडी दिली व सायंकाळीं लकडी पुलावर त्यांचें दहन केलें.

पाणी सुटत असे इतकेंच नव्हे, पण या संधीस ( इ० स० १७७२ त* ) त्यांनीं आपला एक वकील पुण्याचे दरबारांत बळेंच घुसडून दिला. याच वर्षीं माधवराव पेशवे क्षयरोगानें मृत्यु पावले. नंतर त्यांचा कनिष्ट बंधु नारायणराव हे पेशवाईच्या गादीवर बसले.

नारायणरावांनीं पेशवाईचा अधिकार आठच महिने अनुभविला तोंच आनंदी †बाईच्या कुटिल ब्राह्मणाच्या राज्यास 'यावच्चंद्रदिवाकरौ' काळोखी आणणाऱ्या कृष्णकारस्थानकचाट्यांत सांपडून सुमेरसिंगाच्या हस्तें अत्यंत क्रूरपणें मारले गेले, ही गोष्ट जगविश्रुत आहेच.

नारायणराव निमाल्यावर पुष्कळ वाटाघाट उत्पन्न होऊन शेवटीं पेशवेपद रघुनाथरावांच्या वांट्यास आलें, परंतु लवकरच कारभारी मंडळीनें सवाई माधवराव यांस पेशवे केलें. या बालराजांचे कारकीर्दींत मराठेशाहींत भित्रपणा बराच प्रादुर्भूत झाला. पुढें पुढें सवाईमाधवराव जसे जसे मोठे होत चालले तसतसे त्यांचे चांगले चांगले गुण दृष्टीस पडूं लागले. हस्तीदंती फण्यांचा कारखाना पुण्यांत माधवरावांचेच प्रयत्नानें सुरू झाला होता.

---

* *Gazetteer*. पण पंत प्रधानांचे शकावलींत इंग्रजांचा प्रथम वकील शके १७०१ या वर्षीं पुण्यांत येऊन त्यास रहाण्यास जागा संगमीं दिली असें लिहिलें आहे.

† टीप—दादा साहेबांची पहिली स्त्री जानकीबाई ही निवर्तली म्हणून शके १६७७ त दुसरी स्त्री ही आनंदीबाई, ओक यांची कन्या, स्वारींत कृष्णातटाकीं केली.

ह्या कामाकरितां नाशिकाहून आनंदराव धंदारपालकर यांस माधवरावांनीं मुद्दाम आणविलें होतें. ह्या धंदारपालकरांचा कोणी वंशज पुण्यांत असल्याचें आढळींत नाहीं. इ. स. १७९६ त माधवराव निवर्तल्यावर इतिहासप्रसिद्ध दुसरे बाजीराव हे पेशवे पदारूढ झाले.

बाजीरावास गादी मिळण्या संबंधानें नाना फडणवीस सर्वथैव विरुद्ध होते. तरी शेवटीं अनेक भानगडी उपस्थित होऊन तो योग घडून आला¹. एशवंतराव होळकराचा भाऊ विठूजी यास बाजीरावानें शिद्या करवीं मारविलें होतें तो द्वेष एशवंतरावाच्या मनांत होताच. इ. स. १८०२ च्या सुमारास एशवंतराव सैन्यानिशीं पुण्यावर उतरला. पुढें रावबाजींनीं पराभव पावून सात हजार लोकांनिशीं सिंहगडीं प्रयाण केलें, व तेथून पुण्यांतील इंग्रजांचा वकील कर्नल्क्लोज यास निरोप पाठविला कीं, 'कसेंही करून बांचवा! इ०' ही वार्ता एशवंतरावास कळली तेव्हां त्यानें पेशव्यास निरोप पाठविला कीं, 'आपणांस या भरीस पडण्याचें कारण नव्हतें.

---

१ टीप—श्रीमंतांची स्वारी विजयादशमीस मोठा उत्साह करून परत आल्यावर शनवार वाड्याच्या नाची दिवाणखान्यांत असतां 'मेघडंबरी' बंगल्याचे पायरीवर शके १७१७ आश्वीन शु० १२ सीच्या दिवशीं अकस्मात पडले. त्या वेळीं कारंजाची नळी मांडींत भोसकली. पुढें १४ स काळ झाला. तीन वर्षामागें पहिली स्त्री रमाबाई कैलाशीं गेली, ह्मणून फडणविसांनीं यशोदाबाईशीं त्याच सालीं त्यांचें दुसरें लग्न केलें. पति मरणसमयीं यशोदाबाई ऋतुस्नातही नव्हती!!

मी आपला नौकर आहे, पेशव्यांचे सैन्यावर माझें अधिपत्य असावें या पलीकडे माझी इच्छा नव्हती.' या ह्मणण्याकडे रावबाजींचें लक्ष गेलें नाहीं. सिंहगडास तीन दिवस राहून नंतर त्यांनीं रायगडावर कूच केलें, तेथें माधवराव*रास्ते कैदेंत होते त्यांची मुक्तता करून त्यांस बरोबर घेतलें. तेथून पुढें महाडास उतरले, व तेथून मुंबईस कंपनी सरकारचे कामगारांस पत्र लिहिलें कीं, गलबतें पाठवून आमचा संभाळ करा. तेथून होळकराच्या भयानें स्वारी सुवर्णदुर्गास, व तेथून रेवदंड्यास येऊन दाखल झाली तेथें इंग्रजांनीं 'हरक्युलीयन्' नामक जहाज पाठवून त्यांस त्यांचे निवडक १३० लोकांसह वसईस आणून सोडिलें. (ता० १६ डिसेंबर इ. स. १८०२.)

वसई मुक्कामीं ता० ३१ दिसेंबर १८०२ मध्यें उभयतांचा (इंग्रज व बाजीराव) तह ठरला, त्यांत एकंदर १९ कलमें होतीं. ह्या तहामुळें ३० लाखां जवळ जवळ वसुलाचा मुलुख इंग्रजांचे घरांत आला. ह्याप्रमाणें रावबाजीस पक्का जखडून ता. १३ मे १८०३ या दिवशीं मोठ्या समारंभानें पेशवाईच्या गादीवर बसविलें. या मंगल प्रसंगीं उभय पक्षांकडून (इंग्रज व रावबाजी) मोठा आ-

* रावबाजीनें एके समयीं रास्त्यांकडील बायकांस वाड्यास बोलाविलें होतें. रावबाजीच्या दुर्लौकिकास भिऊन माधवराव रास्त्यांनीं तें नाकारिलें यामुळें त्यांस हा कारागृह-वास भोगावा लागला, असें जुन्या लोकांचे सांगण्यांत आहे!

ंदं दर्शविण्यांत आला. कलकत्त्याचे गव्हरनरानें रावबाजीस आपल्या आनंदाचें दर्शक पत्र लिहिलें.*

या बाजीरावींत पुण्यांत भटभिक्षुकांची जी ऊर्जितावस्था आली होती, तशी पूर्वीं कधींच आली नसेल. ‘ फांसा पडेल तो डाव व राजा बोलेल तो न्याय ’ त्या वेळीं होता. शिंद्याचे लष्कराचा तळ पुण्यासच होता. इ० स० १८०१ या सालीं पुणें

---

* From-Marquess Wellesley to his Highness the Peshwa.

*Fort Willom, 9th June* 1803.

I have received with sentiments of the most cordial satisfaction, the happy intellegence of your Highness return to Poona, and of your restoration to your dominions and Government to the free exercise of your independent authority and to the secure enjoyment of your dignity and honor. On this prosperous result of your auspicious alliance with the British Government Joffer to your Highness my sincere congratulations. The happy event of your Highness restoration was proclaimed at this Capital by every distinction of military honor, and of public rejoicing on the same day, on which the intellegence of your return to the City of Poona reached me, and I have ordered similar demonstrations of joy to be manifested at all principal stations throughout the British possessions in India * * * ( *Wellesley's despatches.* )

कोणत्या स्थितींत होतें हें पुढील उताऱ्यावरून कळून येईल. या वेळचा पुण्याचा रहिवाशी बनलेला कर्नल वेल्स् साहेब असें ह्मणतो कीं, "सहा* लक्ष मनुष्यें व एक लक्ष ऐंशीं हजार घरें, येणें करून पुणें अगदीं गजबजून गेलें होतें. नदीचे पैलवर उंच टेकड्यांवर सायंकाळीं उभें राहिलें असतां पर्वतीचें मैदान व रस्ते माणसांनीं कसे फुलून गेलेले दृष्टीस पडत. व एकंदरींत हा सर्व देखावा मनोहर दिसे. पुण्यांतील बडे बडे मुत्सद्दी कामगार वगैरे जे आपआपल्या अधिकारावर सर्व महाराष्ट्र देशांत पसरले होते, त्याचे कडील लग्नकार्यादि मंगल समारंभ हमेश पुण्यांत होत असत, त्यामुळें नानाविध वाद्यांचा मधुर ध्वनि त्रिकाल कानीं पडे. सायंकाळचे वेळीं सुगंधी पुष्पांचे हार, तुरे, गजरे येणें करून सर्व शहर कसें घमघमून जात असे!" त्या वेळचें पुण्याचें वर्णन आतां आह्मी ऐकावें इतकेंच. गेले! ते दिवस गेले, ते भाग्यशाली लोक गेले! ती पुण्याची पुण्याई गेली! दुसरें काय?

पुढें दोन वर्षांनीं दुष्काळानें लोकांची पायमल्ली होऊन वरील बहारी प्रकार जाऊन कहारी भोगण्याचा प्रसंग आला. त्यामुळें पुणें शहरची खानेसुमारी एकदम लक्षावर येऊन आदळली! त्या वेळीं पुणेंप्रांतीं जो हाहाःकार उडाला तसा मराठेशाहींत कधींच उडाला नव्हता. अगोदर सिंदे व होळकर यांच्या सैन्याच्या तापानें लोक जर्जर झाले होते.

---

* टीप—सरदारांचीं सैन्यें हीं त्यांत आलीं असावीं.

तशांत हें अवर्षण. यामुळें ह्या दुष्काळास फारच भयंकर रूप आलें.

इ० स० १८०१ या वर्षी पावसानें टाळा दिला, व दुष्काळानें आपलें पूर्व स्वरूप प्रगट केलें. पर्जन्यवृष्टि व्हावी ह्मणून बाजीरावानें दानधर्म व अन्न. संतर्पण ( अर्थात् ब्राह्मणांचीं सहस्त्र भोजनें ) याचा मोठा सपाटा चालविला होता. पण होणार तें चुकतें कशानें ! पहिल्याच सालीं धारण एक शेरावर येऊन बसली ! पुढल्या सालीं तर पावशेर ! याहून दुष्काळाचें भयंकर रूप तें काय उरलें ! हा यमपुरीचा देखावा प्रत्यक्ष पाहिलेल्या एका साहेबानें आपल्या ग्रंथांत* या दुष्काळा संबंधानें थोडा उल्लेख केला आहे. तो ह्मणतो:—

"तारीख ९ माहे आक्टंबर सन १८०३ रोजीं मी मुंबईहून निघून खंडाळ्यास आलों त्या वेळीं एका लहानशा जलाशयाच्ये कांठीं जो प्रकार पाहिला तसा प्रकार आजन्म पाहिला नव्हता. ह्यावेळीं सर्व जग माझे पुढें दिसूं लागलें आहे काय ? असें मला वाटलें. हाय ! हाय ! काय हा भयानक देखावा ! व काय ही आम्हा श्रेष्ठ मानवांची स्थिति ! अरे ! अरे ! येथें शंभरावर मुडदे पडले होते, त्यांचीं पोटें त्यांच्या पाठीशीं चिकटलीं होतीं ! त्यांचीं तोंडें विद्रूप दिसत असून त्यांवर विलक्षण कळा आली होती, त्यांचे आंगावर वस्त्र नसून त्यांचे अवयव भयकर दिसत होते. कांहींजणांनीं आपलीं पोटें

* *Lord Valentia,s Travels II.*

चिंध्यांनीं गच्च जखडून आंवळून टाकिलीं होतीं. कित्येकांस धुगधुगी राहिली असून त्यांच्या तोंडांची उघडझांकी चालली होती. कांहींजण शुद्धीवर असूनही निःशक्त झाल्यामुळें कर्दमांतच लोळत पडले होते,व त्यांचे डोळे व इतर अवयव यांचे गिधाडें वगैरे प्राणी भराभर लचके तोडीत होते ! कित्येक स्त्रिया वस्त्ररहित पडल्या असून पशुपक्ष्यांनीं त्यांचीं पोटें फाडून आंतडीं बाहेर काढिलीं होतीं ! कित्येकांचे हात–पाय–मस्तक वगैरे अवयव ठिकाणावर नसून पशुपक्ष्यांनीं रानभर ओढून नेलेले होते इ० इ० इ० ”

इकडे पुण्यांतही असाच आणीबाणीचा प्रसंग गुदरला होता. मुळामुठा नदींत पाण्याचे पृष्ठभागावर हजारों प्रेतें तरंगत होतीं. दुष्काळशांतिस्तव बाजीरायानें लाखोंरुपयांचा फन्ना पाडून भटभिक्षुकांस मिष्टान्नभोजन देण्याचा सपाटा चालविला होता. दुष्काळाच्या पराजयास्तव यद्यपि भटभिक्षुक लाडू मोडीत होते, त्यांचे सभोंवार शेंकडों अनाथ लोक दृष्टिभोजन करून प्राणोत्क्रमण करीत होते, कित्येकांस बाजीरावाचे शिपाई तोब्यानें झोडपीत होते, कित्येक उष्टया पत्रावळी चाटून पुसून खात होते, कित्येक अन्नाच्या आशेनें नुसती पत्रावळच चघळीत असतां आंतड्यांस पत्रावळीचे टांके रुतल्यामुळें व्याकूळ होऊन जमिनीवर गडबडां लोळत होते, कित्येकांस एखादा घांस मिळून तो पोटांत जातो न जातो तोंच दुसरा येऊन त्याचा कोथळा फोडून तें अमंगळ

अन्न तसेंच भक्षण करीत होता, * तरी त्या धर्मबोकड रावबाजीस या अनाथ मानवी प्राण्यांची किमपिही दया न येतां त्याचे ऐषआराम पूर्ववत जोरानें चालू होते !

हा प्रकार चालू आहे तोंच जरीमरीबाई कंबर बांधून ( पदर खोंवून ह्मटल्यास चालेल. ) सरसावली ! मग काय विचारावें ? ह्या अपेष्टेंतून बिचारीं माणसें एकदांचीं लौकरच मुक्त झालीं ह्मणावयाचीं! एक पेटका आला कीं थंड गार ! पाण्याचे आशेनें नदीकडे जाऊं लागत तोंच पायांतल्या पायांत गुरफटून धाडकन् भुईवर पडून राम ह्मणत ! ह्या प्रमाणें रस्तोरस्तीं-घरोघरीं-वाळवंटो वाळवंटीं-मैदानो मैदानीं जिकडे तिकडे मुडद्यां वांचून दुसरें कांहीं दिसेना ! अशा समयीं त्या सर्वांचें दहन तरी कसचें होणार ? मोठमोठे खड्डे खणून गाड्याचगा गाड्या भरून त्यांत लोटून देत ! !

पुढें ही वार्ता मुंबई मध्यें पोंहचली तेव्हां आश्रयाबद्दल खटपट चालू झाली, या कामीं लेडी मेकिन्टोश् हिनें पुढारीपणा पत्करून वर्गणीची यादी फिरविली, तों प्रथमच थोड्या अवकाशांत चाळीस हजारांचे आंकडे पडून लागलेच वसूल झाले. हे रुपये पुण्यांतील रेसिडेंत कर्नल् क्लोज् यांजकडे रवाना केले. तेणें करून १९००० माणसें मृत्यूच्या दाढेंतून ओढून काढितां आलीं.

---

* The sufferings were so great that mothers are said to have eaten their children. ( *V. Travel.* )

या समयास सोलापूरकर रसिक कवी रामजोशी हे पुण्यास होते त्यांनीं या दुष्काळावर एक लावणी केली आहे तिचा थोडा मासला पुढें दिला आहे.

चिन्ह वाटतें भिन्न पुढतां जग किति खिन्न जाहले मनीं।
भिन्न देह किती करिती किती भरती पोटें श्वान कंटाळुनी।
पहा किती गुण जन महागाईनें दाही दिशा धुंडुनी।
अहा शेवटीं मेले किती गेले यमलोकासीं गणावे कुणी।
भणाण सारा दणाण झाला कणा न पावती सणीं।
कुणास न मिळे भाजी कुणी राजी कण्डी मिळे अंबाडी जुनी।
मूक पडती किती भूक म्हणती द्विजवधु तशा ब्राह्मणी।
'कुक' करिती रस्त्याला कुणा त्याला राहु न देती उभी अंगणीं।
कढी म्हणती कुणी वडी घालती उडी अन्न पाहुनी।
रडीयती किती पोरें किती ढोरें तैसे वोढिती दारांतुनी।
पाकहो, न हो हाक मारिती भाकर द्या म्हणवुनी।
टाक मुखांमध्यें नाहीं, मज नाहीं, म्हणती अन्न पंधरा दिनीं।
जळा पिवुनी किती नळा फुगले पळांत वपु त्यागुनी।
गळा पडुनी किती रडती किती धरती बाळें मुडदे कंवटाळूनी।
क्षुद्र इतर ते क्षुद्र नद्यावरी रुद्रकोप या क्षणीं।
मुडदार कैचे त्याला भलत्याला भाकर मागती मुख पसरुनी।
चणा अगर नाचणा एखादा धना मिळे त्याहुनी।
गुन्हा दिवाळी दसरा किती घसरा दुष्काळाचा घ्या पाहुनी।
पीठ दाळ कुठे मीठ ढिगावरी नीट पडती येऊनी।
धीट सोसिती कठिण परि पाटी सोडिती नच मेल्या वांचुनी।
॥ चा० ॥ करतां काय हो अन्नाविण गांजली।
हिंदुनया सारी जठराग्नींत भाजली।
नच माधोकरिला कोणी नच लाजली।
वेंचित सितें चिखलांत राड माजली।
धनिकाची दौलत आपणांतची साजली।
शेवटीं विळी पळी दिपलावणी वाजली।
यात्रतें जेव्हां येउनी गांजली।
कैकांनीं कुटुंबें विष पाजुनी निजविलीं।
ही दुष्काळाची भली नौबत गाजली। + + + + +

पुढल्या सालीं पर्जन्य चांगला पडला व ही दुष्काळाची हांकाटी मोडली तरी ती मोडत मोडत मोडली. हें पुढें जें धान्याच्या भावाचें पांच सात सालांचें कोष्टक दिलें आहे त्यावरून उघड होईल.

ह्या कोष्टकांतील शेर पुण्याचे असून हा दर १ रुपयावरून आहे. *

| इंग्रजी साल | तांदूळ | बाजरी | ज्वारी. | गहूं | तुरी. | हरभरे. |
|---|---|---|---|---|---|---|
| इ. स. १८०४ | २॥ | ४॥ | ३॥ | २॥ | १॥। | ४। |
| ,, १८०५ | ७ | १० | ६ | ६ | ५ | ६॥ |
| ,, १८०६ | ७ | २२ | १० | ९॥। | ८ | १० |
| ,, १८०७ | ७ | ७ | १२॥ | १० | १३ | १३ |
| ,, १८०८ | १६ | १० | १६ | १६ | १४ | १४ |
| ,, १८०९ | १६ | १६ | १६ | १७ | १०॥ | १०॥ |
| ,, १८१० | १६ | १६ | २२ | ९ | १० | १० |

* Lt. Col. A. T. Etheridgis Report on past famines [ 1868. ]

या मध्यंतरीच्या अवधींत यशवंतरावानें अमृतरावास पेशवाईचे गादीवर स्थापिलें होतें, ती स्थापना इंग्रज बहादुरांच्या या पूर्वोक्त खटपटीनें विलयास गेली हें वेगळें सांगणें नकोच.

पुढें या जबरदस्त पाहूण्याच्या बोजास कंटाळून त्याचे पाशांतून मुक्त होण्याकरितां रावबाजींनीं धडपड करण्यास सुरवात केली पण मग काय उपयोग ?

( यः स्वपक्षं परित्यज्य परपक्षं निषेवते ।
सः स्वपक्षे क्षयं याते पश्चात्तैरेव हन्यते ॥ )

वाल्मीकिरामायण.

खडकी कोरेगांव वगैरे ठिकाणीं लढायांत अपेश आलेलें पाहून या भित्रे बाजींनीं भित्रेपणाची तर अगदीं कमालच करून सोडिली ! व आठ कोटींचें राज्य दयाळू इंग्रजांचे पदरांत टाकून आठ लक्ष रु० पेनशन घेऊन ब्रह्मावर्तीं हरि–हरि ह्मणत बसण्याचें कबूल केलें*! झालें ! पेशवाई आटपली !! व महाराष्ट्रांत इंग्रजांची सत्ता चालू होऊन त्या बरोबर पुणें हेंही इंग्रजांचेंच झालें.

---

* रावबाजी अंध होऊन इ. स. १८५१ त मृत्यु पावला. त्यास शके १७३२ आश्विन मासीं वामनराव ह्मणून पुत्र झाला होता, पण तो मृत्यु पावल्यावर सत्तावन सालच्या नानासाहेबास त्यानें दत्तक घेतलें.

# प्रकरण दुसरें.

## पेशव्यांचें दरबार.

फार पूर्वी या महाराष्ट्रांत हिंदु लोक मनुस्मृतीच्या आधारें कायदे कानू चालवीत असत. त्यांचे कायदे हल्लींच्या कायद्यांप्रमाणें घोंटाळ्यांत पाडण्यासारखे नव्हते. व्यभिचार कर्मासंबंधीं त्यांचे फारच कडक नियम असत. एखादी स्त्री परपुरुषाशीं रत झाली व तें जगांत प्रसिद्ध झालें ह्मणजे त्या स्त्रीस कुत्र्याकरवीं भक्षवीत असत! व त्या जार पुरुषास तप्त व लालभडक लोखंडाचे सळईनें भाजून ठार मारीत असत! कोणा पुरुषास परस्त्रीशीं भाषण करितांना, किंवा तीस पुष्पें वगैरे अर्पण करितांना, किंवा नदी तीरीं किंवा छत्राचे ठिकाणीं अगर एकांतांत संभाषण करितांना कोणीं पाहिलें तर, त्या पुरुषास व त्या स्त्रीस 'हद्दपार' किंवा त्याच सारखी दुसरी कांहीं कडक शिक्षा करीत असत. त्याचप्रमाणें सोनार वगैरे कारागिरांसही अशाच कडक शिक्षा करीत असत. एकाद्या सोनारानें दागिन्यांत जर तमाखोरी केली तर त्याचें सर्वांग वस्तऱ्यानें चिरीत असत. असो.

पुढें महाराष्ट्र—देश मुसलमानांचे ताब्यांत आल्यावर त्यांनीं आपल्या कुराणाप्रमाणें राज्यकारभार चालविला. गांवांतील पाटील, कुळकरणी वगैरे

कामगार गांववाल्यांचे मतानें काय जी शिक्षा करा-वयाची ती अमलांत आणीत असत; पण कधीं कधीं बादशहा अन्यायानें वर्तत असे, व चाहेल त्याचा प्राण घेत असे, अशा गोष्टीही पुष्कळ प्रसिद्ध आहेत. त्यांच्यांत न्यायाचे कामांत काजीचा मान फार असे.

पेशवाईंत किंवा मराठेशाईंत नवे देश काबीज करण्याकडेसच मुख्य भर असल्यामुळें इतर स्वस्थतेच्या सुधारणादिकांकडे त्यांना लक्ष्य शिरकावण्यास सांपडावा तसा अवकाश सांपडला नाहीं, यामुळें त्या अवजड राज्यकारभारांत प्रथमतः बराच घोंटाळा होता, पण उत्तरोत्तर जसजशी सवड मिळत गेली तसतसें त्यांचें राज्यकारस्थानपटुत्व प्रकाशित होत गेलें, ही मोठी अभिनंदनीय गोष्ट होय. तो कारभार कोणत्या प्रकारें चालत होता याची थोडी बहुत कल्पना तरी वाचकांचे मनांत उतरावी या हेतूनें थोडीशी तांत्रिक माहिती येथें देण्याचें आह्मीं मुद्दाम योजिलें आहे.

ज्याप्रमाणें हल्लीं विलायतेंत पार्लमेन्ट सभा आहे, त्याप्रमाणें पेशव्यांचे पदरींही जंगी दरबार फडावर होतें. हा फड शनवारचे वाड्यांत होता. ह्याचे मुख्य अधिकारी बाळाजी जनार्दन भानु ऊर्फ नानाफडणवीस हे होते. या धुरंधर नाना विषयीं माहिती पोरांठोरांसही ठाऊक आहे. असला राजकारस्थान कुशल पुरुष मराठी राज्यांत विरळाच होता ह्मटलें तरी चालेल. त्यांची एकएक कल्पना व राज्यांतील उलाढाली वगैरे ऐकून व पाहून कंप-

शी सरकारचे हुषार अधिकाऱ्यांनींही त्या वेळीं तोंडांत बोटच घातलें होतें. महान् महान् इंग्रज इतिहासज्ञांनीं नानांस " मराठा माचिव्हेल्[1] " असें ह्मणून त्यांची फारच स्तुति केली आहे. नानांनीं आपला वेळ कधीं व्यर्थ दवडिला नाहीं. जसें काम पडेल तसें त्यांनीं दिवस रात्रीकडे नजर दिली नाहीं. त्यांनीं आपला वेळ बहुतेक नियमित ठेविला होता. मराठेशाहींत बहुधा लोकांचें जेवणखाण दोन प्रहरीं होत असे, तो प्रघात मोडून सकाळीं ९।१० वाजतां जेवण करण्याचा नानांनीं प्रघात घातला, व त्यावरून भटभिक्षुकांत ' नानाफडणविशी बेत ' असें ह्मणण्याचा प्रघात पडला आहे. ते सकाळचें जेवणखाण आटोपल्यावर फडावर जात, व कंबर बांधून मोठ्या नेटानें कामास बसत. ते हिशेबी व जाबसाली पत्रें किती लिहीत, खलबतें व मसलती किती करीत, ह्यांचा सुमारच नव्हता. इतकें काम शेवटास जाण्याकरितां त्यांची वेळेची व्यवस्था फार चांगली होती. वेळ ह्मणजे ते फारच मूल्यवान् मानीत असत, पोकळ गप्पा मारणें हें त्यांस किमपी आवडत नसे. त्यांचे घरीं कोणीं कामा शिवाय येऊं नये असा सक्त हुकूम होता. एकांताची त्यांस फारच अभिरुचि होती. *

---

१ टीप—माचिव्हेल् नांमें जगविख्यात राजकार्यधुरंधर पुरुष इताली देशांत होऊन गेला.

* फडणविसांनीं आपल्या दैनिकवृत्त पुस्तकांत आपल्या हातून घडलेलीं रोजचीं कृत्यें लिहिलीं आहेत. त्यांत कांहीं किळस येणारींही कृत्यें दाखवून त्याबद्दल पश्चात्ताप मानिला आहे.

नानाची या प्रकारची कीर्ति व लौकिक सर्वत्र आहे. पण कपतान मॅक्डोनाल्ड सारख्या कित्येक इंग्रज ग्रंथकारांचें हें ब्रीदच काय न कळे कीं हिंदूंचा द्वेष करावयाचा, त्यांच्या माथीं नसते दोष मारावयाचे! राजकार्यासंबंधानें नानाच्या आंगीं तिळप्राय दोष ठेवण्यास जागा नाहींशी पाहून त्याचें खासगी वर्तन फारच नीच होतें. तो पक्का व्यभिचारी होता. असे कांहीं दोषारोप या कपतानांनीं नानाची बखर लिहिली आहे त्यांत ठोकून दिले आहेत व त्याची परंपरा इतकी लांबविली आहे कीं, सवाई माधवराव ही नानापासून उत्पन्न झाला होता! यास प्रमाण काय, तर नानाच्या व त्याच्या चेहऱ्यांत साम्य होतें!! वा:, खासें, असलें साम्य पाहूं गेल्यास जगांतील किती बरें लोक व्यभिचारजन्य ठरतील याचा विचार साहेबांनीं नाहीं मनांत आणिला!! दुसरें असेंही संभवतें कीं, नारायणरावाचे पश्चात् गादीवर रघुनाथरावाची स्थापना होऊन गंगाबाई व तिचा पुत्र यांनीं सांदीला पडावें अशा कुत्सित बुद्धीनें रघुनाथरावाकडील कांहीं नीच मंडळींनींही अशा वाईट कल्पना रचून गंगाबाई संबंधानें इंग्रजबहादरांचें मन कलुषित करण्याचा प्रयत्न केला असावा व यामुळें असा गढूळ लेख इंग्रजइतिहासकारांकडून सहजीं आपल्या ग्रंथांत गोंविला गेला असावा. असो.

नानाचे हाताखालीं फडावर ७०० कारकून होते. हे कारकून जाबसाली, राजकीय, हिशेबी व

चिटणिशी लेख लिहित असत. सरकार संबंधी माणसें झटलीं झणजे मुत्सद्दी व सरदार हे होत. मुत्सद्दी हे सरदारांचे हाताखालीं असत. ह्या मुत्सद्यांस, फडणवीस, पोतनीस, मुजूमदार, दिवाण, हशमनवीस (शिबंदी कामगार) दफ्तरदार वगैरे नांवें होतीं. ह्याच प्रमाणें ह्या फडावर प्रत्येक सुभ्याचे लोक व्यवस्थे करितां रहात असत. त्यांस दरकदार असें झणण्याची चाल होती. म्हणून त्या गादीचें वर्चस्व अधिक होतें. साताऱ्याचे (हुजुरचे) दरकदारांनीं पुण्याचे दरकदरांस नेमावें व पुण्याचे दरकदारांनीं प्रांतांवर व महालांवर दरकदार नेमावे अशी चाल होती. सरदारांपैकीं पटवर्धन, रास्ते, पवार, घुळप, आंग्रे, विंचूरकर वगैरे सरंजामी सरदार व ह्या शिवाय, पागे* पथकी, किल्लेदार, शिलेदार वगैरे हेही सरदारांतच मोडत असत ह्या सरदारांस गांव व कुरणें वेगवेगळीं तोडून दिलीं असत. सरदारांपाशीं जे दरकदार असत त्यांनीं जमाखर्ची व जाबसाली लिहिणें ल्याहावें व अधिक उणें असल्यास हुजुरास कळवावें असा शिरस्ता होता. पुण्यापासून आसपास सुमारें पन्नास कोसांचे अंतरावर मोठमोठ गवताचे रांन असत. तेथें पाण्याची विपुलता असे. भिमथडी, गंगथडी, इंद्रायणीतीर वगैरे ठिकाणीं नद्यांचे

---

* पागेंतील बारगिरांचे घोडे पांचशें रुपयांपेक्षां कमी किमतीचे नसावे असा नियम होता. अशा प्रकारच्या बारगिरांच्या पागा पृथक् पृथक् असत. दर एक पागेंत डंका व निशाण असून तिजवर हुकूम चालविण्यास एका सरदाराची नेमणूक असे त्यास 'पागे' अशी संज्ञा होती.

कोठीं वरील पागांची योजना केली होती, त्यामुळें खर्च कमी लागून जनावरांस मोठें आराम होतें. जेव्हां मोहिमेवर किंवा दुसऱ्या जरूरीचे कामावर जाणें पडे तेव्हां त्यांस बोलावून आणीत असत. ज्या ज्या स्थळीं किल्ले असत तेथें त्यांजवर गडकरी ह्मणजे शेतसनदी शिपाई ठेवीत असत. ह्या गडांवर सबनीस, हवालदार, सरनौबत, किल्लेदार वगैरे अंमलदार असत. पागांत व पथकांत डंकें, निशाणें, बिनी व ढाल याप्रमाणें नेमणुका असत. मोठे सरदारांस नौबती, चौघडे वगैरे इतमामाचे सरंजाम असत. शिवाय त्यांजपाशीं बक्षी, हजीरनीस, तबीब, जिनसीवाले वगैरेंची नेमणूक असे.

होळकर हे माळव्याचे सुभेदार, त्याच प्रमाणें गुजराथचे सरसुभे, वसई व साष्टीचे सरसुभे, कर्नाटकचे सरसुभे वगैरे देशाचे विभाग पाडिले होते. दर सुभ्या खालीं कित्येक मामलती व कमाविशी व किल्ले असत. सुभा हा लष्करी अंमलदार, तो स्वार, तोफा वगैरे बाळगून महालांत स्वस्थता राखी. दरकदारांची बहाली किंवा बडतर्फी त्याचे हातीं नसून त्यांस हुजूरचे हुकूमाची गरज लागत असे.

पेशवे हे सातारचे मुख्य प्रधान ह्मणून दरपिढीस त्यांस वस्त्रें घ्यावीं लागत असत. हीं वस्त्रें येणेंप्रमाणें होतीं. मंदील, जामेवार, पटका, चादरचादली, किनखाप, शिक्केकट्यार, तरवार, ढाल, जरीपटका, चौघडा, हत्ती तीन, एक घोडा व इतर जवाहीर (ह्यांत मुख्य पांच डागिने असत. शिरपेंच, झगा,

मोत्यांची कंठी, मोत्यांचा तुरा व मोत्यांचा चौकडा ) पेशवे-पदांचे कांहीं शिक्के आमचे वाचकां करितां खालीं दिले आहेत.

( १ ) श्री शाहू नरपति हर्ष निधान, बाळाजी विश्वनाथ मुख्य प्रधान.

( २ ) श्री शाहू नरपति हर्ष निधान, बाजीराव बल्लाळ मुख्य प्रधान.

( ३ ) श्री राजाराम नरपति हर्ष निधान, माधवराव बल्लाळ मुख्य प्रधान.

( ४ ) श्री शाहू नरपति हर्ष निधान, बाजीराव रघुनाथ मुख्य प्रधान.

पेशवे आपल्या पत्राचे शेवटीं 'आज्ञा प्रमाण' असा शेरा करून नंतर एक लहानसा शिक्का मारीत असत. त्यांत "मर्यादेयं राजते" अशीं अक्षरें असत.

पुण्यास जे फडणीस, मुजूमदार होते ते साताऱ्याहून नेमलेले असत, व पुण्याचे दरकदारांनीं हरएक सुभ्याजवळ व सरदारांजवळ दरकदार नेमावे असें वर सांगितलें आहे. त्या जागा बहुतकरून पिढीजाद असत. ह्या कामदारांस महालाचे जमाबंदीवर शेकडा अमुक असें ठरवून दिलें होतें, तेंच त्यांचें वेतन होय, त्या मुळें ह्या जागा मोठ्या प्राप्तीच्या व अधिकाराच्या असत, जितके ह्मणून फडणवीस नेमावयाचे त्या सर्वांची नेमणूक नानाफडणवीस हे करीत असत. मोठे घराण्यांत एक भाऊ सरदार असे त्याचा दुसरा भाऊ फडणीस, तिसरा दरकदार, चौथा चिटनीस ह्याप्रमाणें घरांत-

त्या घरांतच सर्व अधिकार वाटले जात. ह्याप्रमाणें एका कुटुंबांत दहा दहा रोजगारी असत. त्या मुळें संपत्ति त्यांचे घरीं पाणी भरी. नाना फडणविसांचें वेतन दरसाल दहा हजार रुपये होतें. पण कारकुनी दरक वगैरे कडून व होळकरांसारखे वडे वडे सुभेदार, सरदार या करवीं नानाचें सुमार दहा लाख रुपये सालीना अवांतर उत्पन्न होतें. नाना मरतेवेळीं त्यांचे जहागिरीचा वसूल २२३००० होता. त्याच प्रमाणें रामशास्त्री ह्यांची नेमणूक येणेंप्रमाणें होतीः—पगार २००० रुपये, पालखी खर्च १००० दक्षणा १००० व पोशाखाबद्दल २०० इतके रुपये मिळून, फैसल्यांच्या मानानें अवांतर त्यांस कांहीं रकम मिळत असे. शिंद्यासारखे सरदार आपले मुलुखांचे हिशेब पेशव्यांस देत व फडणिसांची मखलाशी त्यांजवर होण्याचें फार अगत्य असे. तेव्हां त्यांचे जमाबंदीवर हुजुरचे दरकदारांची प्राप्ति ५०–७५ हजार रुपये होई. ह्या प्राप्तीचे हिस्से करीत, व फडणीस व कांहीं मुजूमदार ह्यांमध्यें वांटण्या होत असत. या सर्व मिळकती सरकारांत महशूर असत. पेशव्यांच्या स्वाऱ्या, मोहिमा व मुलुखगिऱ्या दरसाल होत त्यांतून कांहीं खुद्द व कांहीं सरदार मार्फत होत. त्या वेळीं जे शिपाई मोठें शौर्य करून प्रसिद्धीस येत,

(१) हे इ० स० १७५० यावर्षी मृत्यु पावले. पेशवाई बुडाल्यावर त्यांचे पुत्र गोपाळशास्त्री यांस ३२०० रु० ची सालीना नेमणूक मिळाली.

त्यांस सरदाऱ्या मिळत असत. पानशे, पटवर्धन वगैरे नामांकित सरदार ह्यांचे घरचे दहा दहा वीस वीस पुरुष सरकार–कामावर लढून पडले असत त्यांजवर श्रीमंताची फार मेहर नजर असे या खेरीज मुलखांतून लोक चाकरीस असत त्यांजवरील आरबांचे सरदार, सिद्दी सरदार, पठाणांचे सरदार, गार्दी सरदार, गोमांतकी व फिरंगी सरदार वगैरे महान् महान् वीर व तरवार बहादर असत. नाना फडणविसांचे कारकीर्दींत हे सरदार सर्व कारखान्यावर व किल्ले पागांवर अगदीं तयार असत. ह्या सर्वांस मोठा मान असे व त्यांचा मोठा गौरव होत असे. एक वेळा रावबाजीनीं पानसे यांचा सरंजाम जप्त करण्यास हुकूम दिला. ही गोष्ट गणपतराव पानसे ह्यांनीं मनांत आणून एक दिवशीं श्रीमंतांस आपले घरीं मेजवानीस बोलाविलें. श्रीमंत पानावर बसले तों इतक्यांत पानशांनीं आंचवायास जाण्याचे ठिकाणीं पानें मांडून ओळीनें घरच्या अठरा विधवांस त्यांवर जेवावयास बसविलें. श्रीमंताचें भोजन झाल्यावर ते जों आंचवावयास येतात तों पुढें विधवा. हें काय? ह्मणून पेशव्यांनीं प्रश्न केला तों गणपतराव ह्यांनीं मोठ्या लीनतेनें श्रीमंतास विनंति केली कीं, सरकार आपणापुढें ज्या ह्या हतभागिनी तरुणी दिसताहेत त्यांच्या पतींनीं आपले (पेशव्यांचे) चरण, आपलें राज्य व आपली संपदा ह्या सर्वांचें रक्षण व्हावें ह्मणून शूरपणानें लढून रणांगणीं आपले अमोल्य

देह अर्पण केले! व ह्या निरापराधी गायांस आपल्या धन्याचे ओटींत घालून स्वर्गाचे अक्षय सुखांत ते जाऊन राहिले! परंतु सरकारांस ह्यांची किमपिही दया न येतां एकदम सरंजामाच्या जप्तीचा हुकूम सुटला, त्यास ह्या दुर्भागिणींचें नशीब समजलें पाहिजे! हें ऐकून पेशव्यांस दया आली व जप्तीचा हुकूम रद्द केला.

देशमुखी वगैरे अधिकार देण्याचे असल्यास त्यांची हुशारी पाहून देत असत. एका गांवचे देशमुखी अधिकार दोघे इसम मागूं लागल्यास पेशवे सरकार दोघांचीही मर्जी न मोडतां त्यांस एकाद्या कामगिरीवर पाठवीत व त्यांत जो विजयी होईल त्यास ती देशमुखी देत असत. हीच चाल इतर महत्वाच्या कामासही लागू होती. अशा प्रकारें पुष्कळ कुटुंबें हुशारीचे जोरावर चढलीं होतीं. मुत्सद्दी ह्यांची परीक्षा फडावर व सरदार ह्यांची परीक्षा लढाईवर होत असे. कोणी शिलेदार उमेदवार असला म्हणजे तो आरंभीं फडावर राही. तेथें त्याची हुशारी, शहाणपण, विश्वास व सरकारच्या ठायीं एकनिष्ठा, यांची पक्की पारख झाली म्हणजे, तो नानापर्यंत महशूर होई. नंतर त्यास ती जागा मिळे. त्यास मुलुखावर पाठविणें झालें म्हणजे, त्याचे माहीतगारीचा कारकून व त्याबरोबरच तैनात, जाबता, मशाल, अबदागीर पालखी वगैरे जशी त्याची योग्यता असेल तसा इतमाम बरोबर देऊन त्याचे स्वाधीन चिटणीशी-

कडील पत्रें श्रीमंताचे शिक्यासुद्धां देऊन त्यास रवाना करीत असत. प्रत्येक सरदार व सुभा यांजकडील वकील हुजूर (पुण्यास) नेहमीं राहत व ते आपल्या धन्याच्या वतीचें जें काय काम पडेल तें करीत. शिंदे, होळकर, गाईकवाड व पटवर्धन वगैरेंचे वकील नेहमीं पुण्यांत रहात असत. सरकारची जी आज्ञा होई ती वकीलांचे मार्फत होई. व पुढें वकील आपल्या धन्यास कच्ची हकीगत कळवीत. ह्या वकिलांजवळ जासूद, सांडणीस्वार, हरकारे वगैरे सरंजाम टपाल पोहंचविण्याकरितां जय्यद असे, तसेंच त्यांला धन्याकरवींही हमेशा बातमीचीं पत्रें येत जात व त्यांची दाद त्यानें हुजुरांत लावावी अशी व्यवस्था असे, तसेच श्रीमंताचे वकील परदरबारींही असत. दिल्लीस नाशिककर हिंगणे, हैदर नाईकाकडे सातारकर जोशी, निजामाकडे बारामतीकर काळे व पिंगळे व नागपुरास वाईकर वैद्य असे होते. वकीलांचीं कामें मोठ्या पदवीचीं असत. ह्यांस संस्थानिकही नमून असत. पेशवाईंत पारसनवीस व इंग्रजनवीस मेहेंदळे हे होते.

पेशवाईंत जेव्हडे ह्मणून मराठे सरदार उदयास आले त्या सर्वांना प्रथमतः फडावर उमेदवारीची पाळी फेडावी लागली होती. उमेदवारांस आपली योग्यता दाखविण्यास हेंच स्थळ होतें. जाबसालीं पत्रें हिशेबी कागद, तहनामे, मसलता, तरजुमे, एकबेरजी, दुबेरजी लिहिण्याची तऱ्हा, उत्तम वळणाचीं

(चिटणिशी वळण, जनोबाभट्टी वळण, बिवलकरी वळण वगैरे) अक्षरेंही ह्याच फडावर निर्माण झालीं. शेवटचे रावबाजी खरे कारकून होते, असा त्यांचा लौकिक आहे. ते आपले नखावर ठोकळ रकमांचा जमाखर्च सांकेतिक खुणांनीं लिहून प्रत्यही रात्रौ त्या सर्वांचा मेळ पाहत असत ह्मणून सांगतात.

वाकनीस, खाजगीवाले, हे खाजगीकडील कारभारी पण ह्यांस फडावरही हिशोब द्यावा लागत असे. दरकदारांस किताब नव्हते, त्यांच्या दरकांचीं नांवें.—फडणीस, मुजूमदार, अशीं होतीं. सरदारांस किताब बहुत असत, हे किताब हल्लींप्रमाणें पोकळ नव्हते, हें आपण विसरतां कामा नये. त्यांनीं आपल्या जिवावरच प्रसंग टाकून राज्यास देश व प्रांत जोडले होते. विश्वासराव हा किताब सुपेकर पवारांस होता. झुंजारराव, सरजेराव, घोरपडे व नामजाद हे किताब खानवीलकर व मानकर ह्यांनीं कोंकणपट्टी सर केल्याबद्दल मिळाले होते. शिवाय रणनवरे, फांकडे, सरखेल, तरवार बहादुर इत्यादि शेंकडों किताब होते. पूर्वीं कामदारांचें आडनांव लिहिण्याची फार चाल नव्हती, त्यांचें व बापाचें नांव मात्र कागदोपत्रीं लिहित असत.

हा लेख इतका विस्तारपूर्वक लिहिण्याचें

१ जनोबाभट्ट व बिवलकर हे फडावर कारकून होते.

२ टीप—ग्रँटसाहेब ह्यांनीं पेशव्यांची उत्तम व्यवस्था पाहून त्यांतील कांहीं कागद छापून प्रसिद्ध केले आहेत. त्यांवर त्यांनीं असा शेरा दिला आहे कीं, “ मराठे लोक केवळ जंगली

☞ पुढील पृष्ठ पहा

कारण हेंच कीं, पेशव्यांचा दरबार ह्मणजे निव्वळ बाजारबुणग्यांनीं भरलेला हा जो कित्येकांचा समज तो दूर व्हावा हेंच आहे.

जाबसाली पत्रें, सुभे, सरदार व पागे यांजकडून आलेलीं पत्रें, कराराच्या याद्दी, झडत्या, रोजकीर्दी ( हुजुरांत तयार झालेल्या फडणिशी व चिटणिशी ) दफतरच्या याद्दी, सरंजामाचे हिशेब, तोफखाने व हषम व अठरा कारखाने यांचे कागद, किल्ल्याच्या झडत्या, मामलती विषयींचे व फुटकामाविषयींचे ठरावबंद, तहनामे, स्वाऱ्यांचे हिशेब इत्यादि कागद वर्षांत जे लिहिण्यांत येत, ते नाना फडणविस यांच्या कारकीर्दीच्या अखेरपर्यंत नीट व्यवस्थेनें राहिले होते. पुढें रावबाजींत सर्व राज्यांतील व्यवस्थेची भाजी झाल्यामुळें पागा व सरदार मोडले—सरंजाम वगैरे जप्त झाले—शिंदे, होळकर वगैरे प्रतापी सरदार विभक्त झाले. तेव्हां अर्थातच लिहिणें कमी होऊन सर्वत्र बखेडा माजला! गांव, तालुके, प्रांत सर्व कांहीं मक्त्यानें देण्याचा क्रम सुरू झाला. एका गांवाची किंवा तालुक्याची जो अधिक रक्कम देईल त्यास तो गांव किंवा तालुका

---

जनावरांप्रमाणें नाहींत, असें युरोपियन लोकांस ह्या कागदांवरून वाटल्यावांचून रहावयाचें नाहीं. कारण, माधवराव यांनीं मरतेसमयीं नाना व सखारामपंत यांजकडून व्यवस्थेची कलमबंदी याद व आपले बायकोविषयीं जो लेख लिहिवला आहे. त्याजवरून युरोपांतील चांगले व नांवाजलेले लोकांपेक्षां त्यांची बुद्धि कांहीं कमी नाहीं, असें साफ दिसतें ( इंदुप्रकाश तारीख २८।९।६४.)

द्यावा असा रावबाजींनीं अकलेचा ठराव केला; ह्या-प्रमाणें बहुतेक राज्य मक्त्यानें विकलें गेल्यामुळें ते मक्तेवाले सावकार प्रजेवर पाहिजे तसे जुलूम करून पैसा गोळा करूं लागले. कोठेंच दाद मागण्यास जागा राहिली नाहीं. फड वगैरे न्या-याचीं व हिशेबाचीं दरबारें चट्ट सारीं मोडून त्या ठिकाणीं रांडवाडा मानला. ज्या फडावर हजारों वीर-शिरोमणींचे पाय लागत असत. त्याठिकाणीं आ-ळशी, तोंडपुजे, नायकीणी, व कलांवतिणी ह्यांचे ताफे माजले! आपल्या हुजऱ्यास रावबाजींनीं मुख्य प्रधान नेमलें. त्याजवळ कोणी दाद मागावयास आलें असतां त्यांचीं टाळकीं बडवून तो त्यांस वाटेस लावी! एकवेळां ह्या दांडग्या त्र्यंबकजीनें आपल्या बोटांतील सोन्याच्या जोडव्यांनीं एका निरापराधी ब्राह्मणास थप्पडा दे-देऊन ठार केलें. ही गोष्ट रावबाजीपुढें घडली; तरी पण त्याबद्दल त्यास कि-मपिही विषाद वाटला नाहीं!

# प्रकरण तिसरें.

## पेठा व त्यांतील प्रसिद्ध ठिकाणें.

सामान्यरीत्या ह्या शहराचे तीन मोठे भाग करितां येतील. ( १ ) माणिक ओढ्याचे डावे अंगास वसलेलें पुणें. ( हें पेशवाई अमदानीचे नंतर फैलावलें आहे. ) ( २ ) खुद्द पुणें किंवा कसबा पुणें. ( हें मुसलमानी अमदानी पासूनच वसलें आहे. ) ( ३ ) लकडी पुलापर्यंत वसलेलें पुणें ह्म० अर्थात् शहराचा बाकीचा भाग. ( हें पेशवाई बरोबरच वसत जाऊन पेशवाईचे भरभराटी बरोबर याचीही भरभराटी होत गेली. )

इ० स० १७९१ पर्यंत पुण्यास पेठा वगैरे कांहीं कल्पिल्या नव्हत्या, पण या सुमारास सातार्‍यांतील प्रमाणें येथेंही पेठा असाव्या असा विचार करून, नाना फडणविसांनीं कांहीं पेठांस नांवें दिलीं. सांप्रत पुण्यांत १८ पेठा आहेत, त्या येणेंप्रमाणें. ( १ ) मंगळवार, ( २ ) सोमवार, ( ३ ) न्याहाल, ( ४ ) रास्ते, ( ५ ) नानाची पेठ, ( ६ ) भवानी पेठ, ( ७ ) मुजफरजंग, ( ८ ) गंज, ( ९ ) घोरपडे, ( १० ) वेताळ, ( ११ ) शुक्रवार, ( १२ ) गणेश, ( १३ ) रविवार, ( १४ ) कसबा, ( १५ ) बुधवार, ( १६ ) शनिवार, ( १७ ) नारायण, व ( १८ ) सदाशिव.

### ( १ ) मंगळवार पेठ.

मुसलमान सरदार षाहिस्तेखान ह्यानें इ० स० १६६२ या वर्षी आपले नावानें ही पेठ वसविली.

त्यावेळीं ही ‘ षाहिस्तेपुरा ’ या नांवानें प्रसिद्ध होती, पण पुढें पेशव्यांचे अमदानीपासून ही पेठ निकृष्टावस्थेस जात जात तेथील मोठमोठ्या वाड्यांचा लय होऊन त्यांचे पाये मात्र तिच्या गतवैभवाची साक्ष देत आहेत.

ह्या पेठेंत महार, मांग व हलालखोर ह्यांचीच बहुतेक वस्ती असून खाने-सुमारी २१९२ आहे.

## ( २ ) सोमवार पेठ.

इ० स० १७५५ त ही वसली गेली. हिचें पुरातनचें नांव ‘शहापुरा.’ ह्या पेठेंत नागेश्वराचें व लक्ष्मीनारायणाचें अशीं दोन देवालयें बघण्यासारखीं आहेत.

**नागेश्वराचें देऊळः**—हें पुण्यांतील फार जुनाट देवळांपैकीं एक आहे. हें कधीं बांधलें असावें याचा सन बरोबर सांपडत नाहीं, तथापि याचे कित्येक ठिकाणच्या बांधणुकीच्या मुसलमानी धर्तीवरून हें सोळावें शतकांत बांधिलेलें असावें असा अजमास आहे. हें देऊळ अतिशय जराग्रस्त झालें पाहून प्रसिद्ध * आबा शालूकर ह्यांनीं इ० स० १७८० सालीं एक लक्षावर रुपये खर्चून याचा जीर्णोद्धार केला. हें देऊळ कालमानानें जरी जुनाट झालें आहे तथापि त्याची रमणीयता जुनी

* आबा शालूकर ह्मणून कोणी श्रीमंत गृहस्थ नाना फडणविसांचा मित्र होता. शिंद्यानें नानास कैद केलें त्यावेळीं आबासही कैद केलें. परंतु इ० स० १७९८ त शिंद्यास १० लक्ष रुपये देऊन आबानें आपला सुटका करून घेतली; व अहमदाबादची सुभेदारी मिळविली, शालूकराचा बोळ हल्लीं पुण्यांत प्रसिद्ध आहे.

झाली नाहीं. नागेश्वरास पर्वती संस्थानांतून दर-महा ६ रुपयांची नेमणूक आहे.

**लक्ष्मीनारायणाचें** देऊळः—हें अर्वाचीन देऊळ नरपतगीर नामें श्रीमान गोसावी यानें इ० स० १८५० या वर्षी बांधिलें. ह्याचें बांधकाम सर्वत्र दगडी असून ह्यास १,३०,००० रुपये खर्च झाला आहे. देवाचे नित्य-खर्चास ५०० रु० उत्पन्नाची जमीन पृथक् तोडून दिली आहे. देवालयाचे आंतील व बाहेरील मोकळ्या जागेंत सुंदर हौद केले आहेत. मुख्य देवळाचे दोहों बाजूंस दोन सुंदर शिळा लटकवून दिल्या आहेत व त्या दोहोंवरही खाली लिहिल्याप्रमाणें आंकडे काढिले आहेत.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | २ | ८ | ५ | ४ | ९ | १ | ६ | ७ |
| ५ | ४ | ९ | १ | ६ | ७ | ३ | २ | ८ |
| १ | ६ | ७ | ३ | २ | ८ | ५ | ४ | ९ |
| ८ | ३ | २ | ९ | ५ | ४ | ७ | १ | ६ |
| ९ | ५ | ४ | ७ | १ | ६ | ८ | ३ | २ |
| ७ | १ | ६ | ८ | ३ | २ | ९ | ५ | ४ |
| २ | ८ | ३ | ४ | ९ | ५ | ६ | ७ | १ |
| ४ | ९ | ५ | ६ | ७ | १ | २ | ८ | ३ |
| ६ | ७ | १ | २ | ८ | ३ | ४ | ९ | ५ |

वरील आंकड्यांची बेरीजही आडव्या, उभ्या किंवा कर्णरेषेनें कशीही केली असतां ४९ यावी अशी कांहीं चमत्कारिक रीतीनें त्यांची मांडण केली आहे. पुण्यांतील इतर पेठांच्या मानानें या पेठेंत साळी, कोष्टी यांचे भाग बरेच आहेत.

सोमवार पेठेच्याच एका भागाला 'गोसावी-पुरा' म्हणतात. त्यांत गोसावी लोकांचे जुनाट मोठमोठे टोलेजंग वाडे आहेत. असे वाडे सगळ्या पुण्यांत नाहींत असें ह्मणतात. हे गोसावी लोक पूर्वीं फार संपन्न होते व आतांही कांहीं आहेत. सर्व पुण्यांत गोसावीपुरा पूर्वीं धनाढ्य होता.

या गोसावी मंडळाची पूर्वींची राहाटी फार चमत्कारिक होती. पेशवाईच्या आरंभीं हे आपल्या शौर्याचा भलत्याच दिशेकडे उपयोग करून वाटमाऱ्यांचा धंदा करीत असत. त्यांचे जटेंत एक तीक्ष्ण धारेचें कांहीं विशेष प्रकाराचें चक्र असे तें बोटांत फिरवून त्याच्या अंगीं पुष्कळ[1] चालकत्व उत्पन्न झाल्यावर नेमानें शत्रूवर ( अर्थात् वाटसरावर ) मारून त्याचा प्राण घेत व त्यास लुटीत. परंतु पुढें मराठ्यांनीं

---

1 Itinnerary for Western India by captain J. Clunes'

ह्या गोसाव्याविषयीं किल्येकांच्या असें सांगण्यांत आहे कीं, प्रथम हे गोसावी हरीद्वार वगैरे लांबलांबच्या यात्रा करीत असत. त्यांचे मेळे मोठाले असत. ते यात्रेस गेले म्हणजे तिकडील शाली वगैरे हिकडे आणीत, व मोत्यांच्या मुलखांत जाऊन मोत्यें आणीत. ह्याप्रमाणें ज्या मुलखांत जात तेथून मौल्यवान माल हिकडे आणीत, व हिकडील माल तिकडे नेऊन ते विकीत असत ह्यामुळें ते गब्बर झाले. त्यांनीं वाटमाऱ्यांचा धंदा कधीं केला नाहीं वगैरे.

त्यांच्या शौर्यास योग्य दिशा लावून त्यांस आपल्या फौजेत घेतलें. मनोहरगीर गोसावी यांजपाशीं ६|७ हजार गोसाव्यांची फौजही होती. पुढें राव-बाजीच्या कारकीर्दींत कांहीं गोसावी, बडेबडे सावकार —पेढीवाले—हुंडीवाले—बनले व तेव्हां पासूनच हे लक्ष्मीच्या कृपादृष्टीस पात्र होऊन तिच्या सुश्रुषेस्तव त्यांस असले जंगी वाडे बांधावे लागले. असो.

सोमवार पेठेंत ३८०८ लोक वस्ती आहे.

## ( ३ ) न्याहाल पेठ.

ह्या पेठेच्या नामाभिधानचा पूर्व वृत्तांत असा सांपडतो कीं, खासगिवाले ( पुणेंशहरचे कोतवाल ) ह्यांजवळ 'न्याहालचंद' नामें कोणी प्रामाणिक व दक्ष माणूस होता. तो मृत्यु पावल्यावर त्याच्या यजमानांनीं त्याचे नांवानें ही पेठ वसविली. हींत विशेष वर्णन करण्यासारखें कांहीं नाहीं.

न्याहाल पेठेंत लोक वस्ती ११०७ आहे.

## ( ४ ) पेठ रास्ते किंवा रास्त्यांची पेठ.

ह्या पेठेचें वर्णन करण्यापूर्वीं रास्त्यांचे घराण्या-संबंधीं थोडीशी माहिती देणें येथें रास्त होय.* ह्या घराण्याचे मूळ पुरुष भिकाजी शामराज व सदाशिव शामराज हे उभय बंधु सातारा येथें शाहुछत्रपती यांचे दरबारी होते. त्यांस सालीना ९२०० रुपयांची नेमणूक होती. सदाशिव शामराज खुद्द महा-

* ही रास्ते घराण्यांची माहिती खुद्द त्यांच्या दफ्तरांतून आह्मांस मिळाली आहे.

राजांपाशीं रहात असत व भिकाजी यांस महाराजांनीं वाईस रहाण्यास सांगून तेथें त्यांस वाडा बांधून दिला. पूर्वीं हे दोघे भाऊ सावकारी करीत असत, व ह्यांनीं आपला व्यापार मोठ्या प्रामाणिकपणानें चालविला ह्मणून "रास्ते" हें उपनांव पावले. ह्यांचें पूर्वींचें उपनांव "गोखले" हें होय.

भिकाजीपंतास वडील कन्या गोपिकाबाई ह्मणून होती ती शाहुमहाराजांनीं पेशव्यांचे जेष्ट पुत्र बाळाजीराव ह्यांस देऊन आपण स्वतः जाऊन वाई मुकामीं हा समारंभ करविला, व पुष्कळ पैसा खर्च केला. (इ० १७३०.)

भिकाजीपंतास सात पुत्र होते. हे सातही जण एकापेक्षां एक शूर असल्यामुळें त्यांचें नांव महाराष्ट्रांत झळकूं लागलें. पेशव्यांचे स्वारी बरोबर हे नेहमी असत. आणिबाणीच्या प्रसंगीं हे शत्रूवर पडून शत्रूस देमाय धरणी ठाय करून टाकीत. यामुळें पेशव्यांस अति प्रीय होऊन ह्यांस खजीन्यांतून जितका पैसा लागेल तितका घेऊन जाण्यास पूर्ण परवानगी होती, पण ती पुढें माधवराव बल्लाळ पेशवे ह्यांचे कारकीर्दींत बंद झाली, मात्र त्यांस सरंजामांस मुलूख तोडून दिला. ह्या मुलूखाचें उत्पन्न १३०९२२८॥ रुपये होतें. हे बंधु मोठे धार्मीक होते. ह्यांनीं महाराष्ट्रांत व कर्नाटकांत ब्राह्मणांस गांव व शेतें इनाम करून दिलीं आहेत. व बागलकोट, बदामी, आथणी वगैरे ठिकाणीं तीं चालतहीं आहेत. ह्यांनीं देवालयें

पाणपोया, घाट वगैरे अनेक बांधिले आहेत. पुष्कळ ब्राह्मणांस घरें बांधून दिलीं आहेत. ह्या धर्म कृत्यांस रास्त्यांस ४० लाखांवर खर्च झाला असा अजमास आहे. नाशिक पंढरपूर व आथनी ह्या ठिकाणीं ह्यांचे टोलेजंग वाडे व पागा आहेत.

पेशवाई बुडाल्यावर बळवंतराव उर्फ बाळासाहेब रास्ते यांचे घराण्यास अहंमदनगर येथील कर्डे परगणा व तालिकोट जवळील कांहीं गांव मिळून ६०३६२ रुपयांची जहागीर मिळाली. ह्या शिवाय १५५५० रु० चें किरकोळ वतन व इनाम मिळालें.

रास्ते पेठेस पूर्वीं " शिवपुरी " असें नांव होतें. शिवपुरी नांव पडण्याचें कारण, सवाई माधवरावाचे कारकीर्दींत, आनंदराव भिकाजी यांचे बंधु लक्ष्मणराव भिकाजी रास्ते ह्मणून पागे कडील मुख्य होते त्यांनीं ह्या पेठेंत शिवाचें देवालय बांधिलें होतें, हें होय. ह्मणून हल्लीं ह्या देवास लक्ष्मिश्वर असें ह्मणतात. ह्या देवास पेठेंतील बाराशें रुपयांचें उत्पन्न करून दिलें. रास्ते पेठ वसविली त्याच सालीं ह्मणजे शके १७०० ( इ. स. १७७९ ) मध्यें रास्त्यांनीं आपला अजस्त्र वाडा बांधण्याचें काम येथें सुरू केलें. हें नऊ वर्षे चालून शके १७०९ त पुरें झालें. देऊळ, वाडा व नळ मिळून सारे नऊ लक्ष रुपये खर्च झाले. हा वाडा पाहिला असतां रास्ते यांचे वैभवाचें मोठें नवल

वाटतें. हल्लीं ह्यांस शंभरावर जरी वर्षें झालीं आहेत तरी पण कोठें कोठें ह्यांचें नवें काम दिसतें. वाड्याचें बहुतेक काम लाकडी आहे. एक एक तुळई पाहि-ली ह्मणजे छाती दडपून जाते. ह्यास दोन चौक आहेत. व सर्व वाड्यांत नळानें पाणी खेळविलें आहे. आंत गेले म्हणजे एखाद्या खेड्याचा भास होतो.

नुकतेंच ( इ. स. १८८२ त ) रास्त्यांची स्त्री उमाबाई साहेब रास्ते यांनीं बहुत पैसा खर्च करू-न रामाचें एक रमणीय देऊळ बांधिलें आहे. ह्यांत ज्या मूर्ती आहेत तशा मनोहर मूर्ती ह्या महाराष्ट्रांत क्वचितच आढळतील. ज्या कोणास पुण्यास थोडे दिवस राहणें घडेल त्यानें ह्या पाहण्याची संधि स-हसा दवडूं नये.

रास्त्यांनीं आपला वाडा बांधिल्यानंतर इतर पु-ष्कळ लोकांस घरें बांधावयास या पेठेंत फुकट जागा दिली. याप्रमाणें या पेठेंत दिवसानु-दिवस लोक वस्ती बरीच वाढत गेली. श्रावण महिन्यांत येथें शिराळ ( श्रियाळ ) शेटची यात्रा भरते.

या पेठेंत हल्लीं पेन्शनर व इतर कामदार यांची वस्ती फार आहे. सरकारी बहुतेक कामगार लोकांस राहण्यास ही पेठ फारच सोयीवार आहे. कारण, ही स्टेशनला—लष्कराला—वडच्यावडच्या ऑ-फिसांला व इतर अनेक ठिकाणांला त्यांतल्या त्यांत जवळ आहे. तसेंच इतर कांहीं पेठां प्रामणें

ह्या पेठेला हवा कोंदट—वस्ती दाट व गलिच्छ असा प्रकार मुळींच नाहीं. सारांश काय कीं, रास्त्यांच्या पेठेसारखी हवाशीर—निरोगी—स्वच्छ व विशेषतः अनेक गोष्टी संबधानें सोईवार पेठ पुण्यांत दुसरी नाहीं.

रास्ते पेठेची लोकवस्ती ४,२६७ आहे.

## ( ९ ) नानाची पेठ.

ही नानाफडणवीस ह्यांनीं इ० स० १७९१ त वसविली.[1] ह्या पेठेंत घाऊक धान्याचा व्यापार चालत असे व चालतो. ह्या पेठेंत घोडेपीर, पारशांची अग्यारी व निवडुंग्या विठोबा अशीं स्थळें वर्णन करण्यासारखीं आहेत.

**घोडेपीर**—ह्यास कोणी ‘ नानाचा घोडा ’ असेंही ह्मणतात ह्याचा पूर्व वृत्तांत असा आहे:—नानापाशीं नथूखां ह्मणून कोणी परम विश्वासू नौकर होता. नाना इहलोकचा त्याग करून गेल्यावर (सन १८००त ह्या एकनिष्ठ सेवकास धन्याचा वियोग सहन होईनासा होऊन पेशव्याचे नौकरीस सलाम ठोकून तो निरिच्छ व उदास बनला. व त्या दिवसापासून दरसाल मोहरमांत धन्याच्या नांवानें घोड्यावरचा ताबूद करण्याचा त्यानें क्रम चालविला. हा ताबूद घोड्यावरच करण्याचें कारण विशेष गूढ नसून, हा स्वतः घोडेस्वार होता हेंच आहे. हा घोडा

1 Bombay Gazetteer—पण पंतप्रधानाचे शंकावलींत, ही पेठ शके १७१७ ( इ० स० १७९५ ) मध्यें वसविली व तीस हणमंत पेठ असें नांव ठेविलें, असें लिहिलें आहे.

पूर्वी लहान असे, पण नथुखां मृत्यु पावल्यानंतर पेठवाल्यांनीं त्याचा तो क्रम तसाच चालू ठेवून 'दसका लकडी एकका बोजा' याप्रमाणें या ताबुताचें काम व एतत्संबंधीं खर्चाचें काम मोठ्या वीरश्रीनें चालविलें-व त्याप्रमाणें अजून चालू आहे. घोडेपिराची पुण्यांत प्रसिद्धि असून तो पोरांबाळां-च्याही ओळखीचा बनला आहे. भाविक लोक यास नवस करीत असतात. त्यांतही विशेषतः स्त्रियांस लेंकरें देण्याच्या कामांत ह्याचा हातखंडा आहे, अशी याची ख्याति आहे. दरसाल या नवसापासूनच यास हजार—दीड हजारांचें उत्पन्न होतें. खेरीज हा घोडा रेवड्यांचा मोठा भोक्ता आहे. ताबुताचे दिवशीं गाड्या भरभरून ह्यास रेवड्यांचा नैवेद्य मिळतो.

**पारशी लोकांची अग्यारी**—ह्या ठिकाणीं पूर्वी वानवळे नगरशेट ह्यांचा 'बगीचा होता तो शेट सोराबजी रतनजी ह्यांनीं खरेदी घेऊन इ० स० १८२४ त हें अग्निभजनालय बांधिलें. प्रथमतः हें इतकें डोळयांत भरण्यासारखें नव्हतें पण हल्लींचे दस्तुर नसरवानजी जमासजी ह्यांनीं मोठी भव्य इमारत उठवून तीवर मोठें घड्याळ लटकावून ती फारच मनोहर केली आहे.

**निवडुंग्या विठोबाः**—या विठोबाची मूर्ती प्रथमतः एका गोसाव्यास निवडुंगांत सांपडली होती त्यावरून हें नांव पडलें आहे. पूर्वी विठोबाचें देऊळ ह्मणण्यासारखें चांगलें नव्हतें पण पुरुषोत्तम

अंबादास नामक एका गुजर व्यापाऱ्यानें ३०,००० हजार रुपये खर्चून इ० स० १८३० सालीं हें हल्लीं-चें देऊळ बांधिलें. व देवाचे खर्चास, सालीना भाड्याचे पांचशें रुपये उत्पन्न होत इतकी जागा, तोडून दिली आहे.

नानाचे पेठेंत सर्व खिचड जात भरली असून खानेसुमारी ९४०८ आहे.

## ( ६ ) भवानी पेठ.

ह्या पेठेचें पूर्वींचें नांव 'बोरबन.' सवाई माधवरावाचे कारकीर्दींत फडणविसाचे देखरेखीखालीं ही वसली गेली. देशमुखांनीं या पेठेंत भवानीचें देऊळ बांधिल्यापासून हिला 'भवानी पेठ' असें नांव पडलें. ह्या पेठेंत आणखी विठोबाचें एक देऊळ आहे. धान्याच्या ठोकळ व्यापारासंबंधानें हिची प्रसिद्धि आहे. लोकवस्ती ६,७३७ आहे.

## ( ७ ) मुजफरजंग पेठ.

घोरपडे यांचे पदरीं 'मुजफरजंग' ह्मणून कोणी सेनापति होता, त्याचे नांवानें ही वसविली गेली आहे. 'मुजफरजंग' ह्या नांवाप्रमाणें ही पेठही 'जंगीच' असेल अशी कल्पना असल्यास तसें मात्र कोणी समजूं नये. पुण्यांतील सर्व पेठांमध्यें ही पेठ लहान असून हींत लोकवस्ती अवघी ९० आहे.

## ( ८ ) गंज पेठ.

मिठाचे मोठे मोठे गंज ह्या पेठेंत असल्यामुळें 'गंज' पेठ हें नांव पडलें. गंजांत मुख्यत्वें साळीमाळी ह्यांची वस्ती असून लोकसंख्या ४,९६९ आहे.

## ( ९ ) घोरपडे पेठ.

घोरपडे यांनीं सवाई माधवरावाचे कारकीर्दींत ही वसविली. ह्या पेठेंत घोरपड्यांचा जरीपटका असून त्यांचा सांप्रत जीर्णस्थितीस आलेला वाडाही आहे. ह्या दरिद्री पेठेंत मुख्यत्वें चांभार वगैरेच्या झोपड्यांची दाटी असून लोकसंख्या ११३९ आहे.

## ( १० ) वेताळ पेठ.

वेताळ पेठेचें पूर्वींचें नांव ‘ गुरुवार पेठ ’ पण वेताळाचें देऊळ येथें बांधिल्यापासून ‘ वेताळ पेठ ’ असें नांव पडलें. इतर बहुतेक पेठांप्रमाणें हीही खासगीवाले ह्यांनींच वसविली आहे. हींत एक भलें मोठें पारसनाथाचें—देऊळ आहे. पेशव्यांच्या मनांतून जैनाच्या या देवास अशा भरवस्तीच्या ठिकाणीं जागा देण्याचें नव्हतें, पण जैनधर्मानुयायांच्या दीर्घ प्रयत्नामुळें व श्रीशंकराचार्यांच्या आज्ञापत्राप्रमाणें त्यांना जागा देणें भाग पडलें तरी, त्या—देवाचा संसर्ग इतरांस न होऊं देण्याविषयीं त्यांच्याकडून करार करून घेतला. व त्या कराराला अनुसरूनच ह्याचें काम झालें आहे. सभोंवार किल्ल्याप्रमाणें दगडी उंच कोट आहे. यामुळें ह्या कोटाच्या आंत काय आहे याचा बाहेरून सुगावाही लागत नाहीं.

नाना शंकरशेट, केशवजी नाईक, त्र्यंबकजी व्हेलजी व चौधरी ह्यांचे वाडे ह्याच पेठेंत आहेत. चौधऱ्यांच्या वाड्यांत कोंडव्याहून निराळाच नळ

बांधून आणून सोडिला आहे. पुणेंबोर्डिंग पूर्वी चौधऱ्यांचेच वाड्यांत होतें. रांजेबागशेर यांचा तक्याही याच पेठेंत आहे. व्यापारासंबंधानें वेताळ पेठ अवघ्या पुण्यांत प्रसिद्ध आहे. लोकवस्ती ४,४९८ आहे.

## ( ११ ) शुक्रवार पेठ.

जिवाजीपंत खासगीवाले यांनीं ही शुक्रवार पेठ वसविली. एकंदरीनें पाहतां पुण्यांतील पुष्कळ पेठा यांनींच वसविल्या आहेत. यांच्याच खटपटीनें पुणें शहराचा इतका विस्तार वाढला ह्मणण्यास हरकत नाहीं. शुक्रवार पेठेसारखी मोठी पेठ पुण्यांत दुसरी नाहीं. हींत वर्णन करण्यासारखीं स्थळेंही अनेक आहेत. त्यांत शहरचा तुरुंग, ( सिटी जेल ) नवें मार्केट, रामेश्वराचें देऊळ, शुक्रवारचा वाडा व विष्णूचें देऊळ—हीं मुख्य होत.

**शहरचा तुरुंगः**—रावबाजीचे कारकीर्दींत हें तोफखान्याचें ठिकाण होतें व याचें आधिपत्य पानशे यांजकडे असे. इमारती सभोंवतीं खंदक होता. रावबाजीची उचलबांगडी केल्यानंतर आमच्या सांप्रत-

---

( १ ) टीप—रूपराम चवधरी ह्मणून रावबाजीपाशीं पायदळ पलटणांवर व तोफखान्यावर कोणी अधिकारी होता. ह्याच्याकडे कर्नाटकांतील राणीबेदनूर इंगळी वगैरे किल्ले होते. शिवाय सिंहगड व आसपासचा मुलुखही याजकडेसच होता. हा पेशवाई बुडण्यापूर्वी मृत्यु पावला, ह्याचा दत्तक पुत्र रामचंद्र चवधरी यास कंपनीसरकारानें १२,३०० रुपयांचें पेनशन व जुन्नर येथील चास नामक खेड्यापैकीं ३४०० रुपयांचा वसूल करून दिला होता.

च्या प्रभूनें या ठिकाणास तुरुंग बनविलें. थोडे दिवसांपूर्वी येथील कैद्यांचें ठाणें उठवून येरवड्याकडे नेलें व शहरांतील कित्येक कचेऱ्या तुरुंगांत घातल्या.

**नवें मार्केट**—शनिवार वाड्या पुढील ऐसपैस पटांगणांत हल्लीं मंडईचा बाजार प्रशस्तपणें भरत असतो. तेथून तो उठवून शहरच्या या भरवस्तीच्या अतएव कोंदट ठिकाणीं या मार्केटांत त्याची स्थापना होणार आहे. थोडे दिवसांपूर्वी येथल्या कित्येक—बहुतेक—सगळ्याच वर्तमानपत्रांत या भावी मार्केटा संबंधानें चर्चा झालेली आहे. त्यांतील बहुतांचे ह्मणण्याचा आशय असा होता कीं—हें मार्केट अवश्य पाहिजेच असें नाहीं.

मार्केटाचें काम सांप्रत जारीनें चाललें आहे. मंजुरीची रकम वाढत वाढत ४ लक्षांपर्यंत येऊन आदळली आहे. मार्केटचें बहुतेक काम लोखंडी सरळ खांब व लांकूड इहींकरून मंडित झालें आहे. असो हें स्थळ प्रेक्षणीय होणार हें मात्र खास दिसत आहे.

**रामेश्वराचें देऊळ**—हें खासगीवाले यांनीं स्वतः ३९ हजार रु० खर्च करून बांधिलें आहे. हें रमणीय देऊळ शुक्रवारांत अगदीं भररस्त्यावर आहे. दरसाल महा शिवरात्रीस मोठा उत्साह होत असतो. शुक्रवारांतलें विष्णुमंदीरही खासगीवाले यांनींच बांधिलें आहे. रामेश्वराचे देवळाचा

जीर्णोद्धार प्रसिद्ध सावकार नंदराम गौळी ह्यांनीं केला व त्यास १०० रुपयांची चौवडा चालेल अशी नेमणूक करून दिली आहे.

**शुक्रवारचा वाडा**—हा पेशवाईची [1] विल्हेवाट लावणारे रावबाजी ह्यांनीं इ० स० १८०४ या वर्षीं बांधिला होता. हें ह्या इष्कांधाचें चैनीचें स्थळ होतें, इमारत दुमजली असून ह्याची बांधणूक मोठी वर्णनीय होती. इ० स० १८२० ह्या वर्षीं ह्या वाड्यानें आपले स्थितीस कंटाळून आपला देह अग्निनारायणास अर्पण केला ! ह्यांत हजारों रु० किमतीचें उंची सामान होतें तें बहुतेक सुरक्षित हातीं लागलें होतें, त्यास बाजार दाखवून सरकारानें त्याचे टक्के केले. [2] हल्लीं या वाड्याची एक भिंत मात्र उभी असून ती आपल्या नशीबास हात लावून पुण्याची ( व त्याबरोबर पुणेंकरांची ) कालानुरूप होणारी अघटित घटना अवलोकन करीत आहे.

याशिवाय आणखीं स्थळें आहेत तीं येणेंप्रमाणें:— पेशव्यांचा तालीमखाना ( मुनसिपालकचेरी ) जिवाजीपंत खासगीवाले यांचा वाडा, पंतसचिव व

---

१ टीप—हा गृहस्थ मोठा भार्वीक होता. हा प्रथम अगदीं गरीब होता. ह्याची बायको मेंदी विकीत असे. पुढें लक्ष्मी ह्याचा घरीं पाणी भरूं लागली. व सर्व पुण्यांत ह्याच्यासारखा संपत्तीवान दुसरा नव्हता तथापि ह्याची नियत कायम होती.

२ टीप—Bombay Gazetteer—पण एका वृद्ध माणसाच्या सांगण्यांत असें आहे कीं, हा वाडा जळाला नाहीं. सरकारानें ह्याची मोठमोठीं लांकडें काढून वेलस्ली-पळास लाविलीं.

पानशे यांचे वाडे, पेशव्यांचा हत्तीखाना (हल्लीं चांभारांचें वस्तीस्थळ) पेशव्यांचा गाडीखाना (हल्लीं वाडीखाना किंवा लोकवसाहत) लकडखाना, काळाहौद, बावनखाणी,* भाऊ मनसाराम व नंदराम सुंदरजी यांचे वाडे, नाराइमामाची मशीद.

शुक्रवारांत पूर्वीं मंडईचा बाजार भरत असे. खेरीज पाणके, आचारी, धोतरबडवे व तैलंगी ब्राह्मण यांची दाट वस्ती होती.

खानेसुमारी १४१३७ ची आहे.

## (१२) गणेश पेठ.

ह्या पेठेंत गणपतीचें देऊळ असल्यावरून हिला 'गणेश पेठ' असें नांव पडलें. हीं पेठ स० मा-

---

१ टीप—पानसे वंशातील पुरुष शूर असून शाहुमहाराजां- पासून तों रावबाजी गादीवर बसेपर्यंत युद्धाग्निपति ह्मणजे तोफखान्यावरील सरदार होते. यांच्यातील पुष्कळ धट्टेकट्टे शूर वीर धन्याकारितां लढत असून रणांगणांत नाहींसे झाले. वडगांवचे लढाईत (सन १७७९) भाऊराव पानसे यांनीं शौर्याची कमाल केली तेणेंकरून पेशवे संतुष्ट होऊन त्यास पावणे- दोन लाखांची जहागीर दिली. ती पुढें रावबाजीनें हिसकावून घेतली. गणपतराव पानसे रावबाजीपाशीं पायदळावर मुख्य सरदार होते. पेशवे पळत असतां (सन १८१८) सोलापूर येथें इंग्रज व गणपतराव यांची झकमक झाली, त्यांत पानसे हत्वीर्य झाले. पानसे घराण्यास पेशवाई बुडाल्यावर १५२०० ची जहागीर मिळाली. पैकीं कृष्णराव माधवराव पानसे यांज- कडे ५८८८ ची जहागीर चालत होती.

* टीप—खासगीवाल्यांनीं पुण्यांतील साऱ्या कसबिणी गोळा करून सारा कसबखाना ह्या दुमजली चाळींत आणून ठेविला, व पुणें ह्या लाल बाजाराविषयीं प्रसिद्ध झालें. हल्लीं ही मोडकळीस आली असून हिंतील वस्ती पातळ झाली आहे.

धवरावाचे कारकीर्दींत खासगीवाले यांनींच वसविली आहे. हींत 'डुल्या मारुती' व आर्यभूषण नाटकगृह हीं वर्णन करण्यासारखीं स्थळें आहेत.

**डुल्या मारुती**:—प्रसिद्ध पानिपतच्या रणांगणीं पेशव्यांचा मोड झाला त्या समयीं इकडे (पुण्यांत) हा मारुती डोलत होता (हें कांहीं तरी दुश्चिन्ह आहे असें लोक समजत होते व त्याप्रमाणें घडून आलेंच!) यामुळें ह्या मारुतीस 'डुल्या मारुती' असें नांव पडलें.

मारुतीचें मुख्य देऊळ नारो अनंत नातू ह्यांनीं बांधिलें असून देवळा पुढील इमारत ही रखमाबाई नामक ब्राह्मणीनें (इ० स० १७८० त) बांधिली आहे. पर्वती संस्थाना मार्फत दरमहा चार रुपये मारुतीस मिळत असतात.

**आर्यभूषण नाटकगृह**—या ठिकाणीं पूर्वीं राघबाजीचे कारकीर्दींत धर्मशाळा—जेवणावळ असा कांहीं प्रकार असून प्रत्यहीं हजारों लाडवांचा चुराडा उडत असे. पुढें तें काल—माहात्म्य जाऊन हें ठिकाण, पुण्याचे कलेक्टर कपतान रॉबर्टसन् यांनीं इ० १८२० सालीं आपला हिशेबी हौसतोनसाहेब यास राहण्यास (पाव बिस्कूट् मोडण्यास) दिलें. तें इ० स० १८७४ पर्यंत वरील हौसतोन—साहेबांच्या विधवेकडे चालत होतें. नंतर त्या बाईनीं तें साडेदहा हजार रु० स खरेदी देऊन टाकिलें. या विक्रीच्यानें पांच सात हजार रु० खर्चून हें मजेदार नाटकगृह, शनिवार बुधवारच्या रात्रीं मजे-

दार रीतीनें पुण्याच्या लोकांस घालवितां याव्यात अशा हेतूनें बांधिलें आहे.

गणेश पेठेंत सर्व जातीचे लोक भरले आहेत. बहुतेक लोक गरीब आहेत. खानेसुमारी ३६९९ आहे.

## ( १३ ) रविवार पेठ.

रविवार पेठेचें पूर्वींचें नांव 'मालकमपुरा.' ही विस्तीर्ण व धनाढ्य पेठ बाळाजी विश्वनाथाचे कारकीर्दींत व्यवहारे* जोशी ह्यांनीं वसविली. ह्या पेठेंत कापड, भांडीकुंडीं इत्यादि अनेक जिनसांचा जंगी व्यापार चालतो. मोतीचौकांत धनाढ्य गुजराथी, मारवाडी वगैरेंचीं हुंड्यांचीं दुकानें एकास एक लागून गेलीं आहेत.

रविवारांत प्रेक्षणीय अशीं पुष्कळ स्थळें आहेत. पैकीं, फडक्यांचा वाडा, बोहऱ्यांचा जमातखाना, सोमेश्वराचें देऊळ, जुम्मा मशीद व घोरपड्यांचा वाडा हीं मुख्य होत.

**फडके[१] यांचा वाडा**:—फडक्यांचा वाडा ह्मणजे

---

*व्यवहारे जोशी ह्मणजे पुण्यांतील ग्रामस्थ जोशी ह्यांचे भाऊबंदांनीं पुण्यांतील पेठा वांटून घेतल्या आहेत, कार्य प्रयोजन संबंधीं ह्यांचा हक्क फार आहे.

( १ ) टीप—फडके घराण्यांतील प्रसिद्ध पुरुष हरिपंत फडके हे होत, हरिपंत हे नानाफडणविसांचे परम मित्र असून थोरले माधवरावांचे विश्वासु सचिव होते कपटानें आनंदीबाईनें नारायणरावाचा प्राण घेतल्यावर पेशव्यांचे जरीपटक्याचें निशाण फडक्यांनीं घेऊन राघोबावर धांवले. इ० स०

☞ पुढील पृष्ट पहा

आदितवार पेठेचें नाक असा लोकांचा समज आहे. असला प्रचंड वाडा अवघ्या आदितवारांत नाहीं. जरीफडक्याचे धनी हरीपंत फडके यांनीं इ० स० १७९४ त याचा पाया घालून १७९९ त काम पुरें केलें. या वाड्यानें १७ लक्ष रु० खाल्ले होते. 'खाल्ले आहेत' असें ह्मणण्याबद्दल 'खाल्ले होते' असें ह्मणण्याचें कारण गेल्या (इ० स० १८८५ च्या) आक्टोबरांत हा वाडा अग्नि–मुखीं पडून याचे दोन चौक जळून खाक झाले! व रविवार पेठेची शोभा गेली! या सुमाराच्या 'पुणेंवैभव' पत्राच्या कित्येक अंकांत फडक्यांच्या या वाड्यासंबंधानें हृद्यद्रावक पुष्कळ हकीकत दिली आहे. ह्या वाड्याचे भव्य पांच चौक असून सर्वत्र कात्रजचें पाणी खेळविलें आहे. वाड्यांत गेलें कीं, एकाद्या खेड्यांत गेल्याचा भास होतो—हा वाडा दुमजली असून ह्यांत सुंदर दिवाणखानें, गच्च्या, दालणें, व शयनस्थळें येणेंकरून हा मंडीत झाला आहे. आह्मांस सारें दिसतें खरें पण तो हल्लींच्या आपल्या स्थि-

---

१७७९ सालीं तळेगांव येथें इंग्रजांचा मोड ह्याच शूर फडक्यांनीं केला, पुढें इ० स० १७९३ या वर्षी हरिपंत फडके निवर्तले, ह्यांच्या वडील मुलाची एक सुंदर कन्या होती ती रावबाजीनें पेशवे पदाची वस्त्रें घेतल्यावर दोन महिन्यांनीं तिचें राधाबाई नांव ठेऊन वरिली, ही रावबाजीची तिसरी स्त्री होय. हा वडिल मुलगा सन १८१५ मध्यें मृत्यु पावला, पेशवाई बुडाल्यावर फडके घराण्यास येणेंप्रमाणें सरकारानें नेमणूक दिली:—(१) पांडुरंग माधवराव फडके (हरिपंत तात्यांचा नातु) ३६०० (२) त्र्यंबकराव मोरेश्वर (हरिपंताच्या पुतण्याचा मुलगा) १,०००

तीस अगदीं कंटाळून गेला आहे असें ह्मणावें लागतें, नशीब बिचाऱ्याचें ! ! !

**बोहऱ्यांचा जमातखाना**:—याचा पाया इ. स. १७३० या वर्षीं जमिनींत गाडला गेला. प्रथम बांधिला तेंव्हां याला १६०० रु० खर्च लागला. पण यास दिवसानुदिवस नवीन दिवाणखानें जोडीत आहेत. ही इमारत भव्य असून खालून जाण्यास ऐसपैस रस्ता आहे. ताबुतांत ह्या ठिकाणीं जशी रोषनाई केली जाते तशी पुण्यांत इतरत्र होत नाहीं अशी येथें प्रसिद्धि आहे. दिवसानुदिवस बोहरी लोकांच्या फंडांतून ह्यास अवयव फुटत चालले आहेत.

**सोमेश्वराचें देऊळ**:—हें देवालय इ. स. १८३० या वर्षीं नारायणराव नातू यांनीं बांधिलें. अर्थात् याला बांधून फार दिवस झाले नाहींत, परंतु इतक्यांतच हें जीर्णावस्थेप्रत पोहोंचलें आहे. हें नवीन असून इतक्यांतच जीर्णावस्थेस कां पोहोंचलें ? या प्रश्नाचें उत्तर प्रश्नांतच गुरफटलें आहे तें हेंच कीं, 'नवीन आहे ह्मणून' असो. जीर्णोद्धार करण्याचे उद्देशानें कापडगंजांतील धनाढ्य व्यापाऱ्यांनीं मनावर घेऊन तूर्त ३०,००० रु० वर्गणी गोळा केली आहे. देवळा सभोंवतीं धर्मशाळा असून ठिकठिकाणीं हौद आहेत. कार्तीक—मासीं येथें पाण्यावर हुबेहुब गालीचे काढीत असतात व ते पाहण्यास सर्व शहर लोटत असतें ! सोमेश्वराची जत्रा महा शिवरात्रीस भरत असते. गाईकवाड सरकारच्या

पदरच्या एका मुसलमानानें या देवालयांत चौघडा असावा ह्या हेतूनें त्याच्या खर्चास एक घर दिलें आहे. त्याचें भाडें ह्या खर्चास देण्यांत येतें.

**जुम्मा मशीदः**—इ० स० १८३९त येथल्या मुसलमानांनीं आपसांत १९०ं० रु० जमवून हें भजनालय बांधिलें. इमारतीची रमणीयता व कारंजांचे तुषार इहींकरून आंत पाऊल टाकल्याबरोबर लोकांचीं मनें संसारांगारतप्ततेपासून क्षणैक विमुक्त होऊन त्या निराकार—निर्विकार—परमेशाकडे लागावीं अशी याची रचना केली आहे.

**घोरपड्यांचा वाडाः**—हा सांप्रत दीनावस्थेस पोंहचलेला आहे. वाड्याचे मधल्या चौकांत एक विस्तृत हौद असून त्यावर एक दुमजली जलमंदिर बांधिलें आहे. पूर्वीं घोरपडे वसंतकालीं ह्या मंदिरांत राहून जलविहारादि सुखें अनुभवीत होते. सांप्रत तो काल गेला! यामुळें हें मंदीर दीनवदन होत्सातें मौन्यस्थितींत काळकंठीत असल्याचा भास होतो!

रविवार पेठेची खानेसुमारी ९७२६ आहे.

## ( १४ ) कसबा पेठ.

ही पेठ पुण्यांत फारच जुनाट आहे. शहरांत ही पेठ प्रमुख असल्यामुळें हीस ‘ कसबा ’ हें नांव पडलें. ह्या पेठे संबंधानें ठोकळ माहिती आह्मीं प्रथम भागांत दिलीच आहे.

अंबारखाना, पुरंदरे यांचा वाडा, गणपतीचें देऊळ, पेश्व्यांचा वाडा व बडे छोटे शेकसल्ले इ० स्थळें या पेठेंत वर्णन करण्यासारखीं आहेत.

**अंबारखाना**:—हा शहाजींचे आज्ञेवरून दादोजीनें इ० स० १६३६ त बांधिला त्यावेळचें याचें नांव लालमहाल किंवा रंगमहाल असें होतें. ह्याच वाड्यांत बाल शिवाजी लहानाचा मोठा झाला. पुढें पेशव्यांचे कारकीर्दींत या लालमहालांत अंबाऱ्या ठेवीत असत त्यावरून 'अंबारखाना' असें नांव पडलें.

**पुरंदरे याचा वाडा**:—बाळाजी विश्वनाथ यांचे सहाध्यायी कोणी महादाजी आबाजी पुरंदरे ह्मणून गृहस्थ होते. बाळाजीस पुढें पेशवाई आल्यावर त्यानें आपल्या स्नेह्याची ओळख ठेवून त्यास आपला कारभारी केलें व त्यास कोटांतील जागा राहण्याकरितां दिली त्या स्थळीं इ० स० १७४० त त्यांनीं ९०,००० रु० खर्च करून हा वाडा बांधिला. याचा उपभोग पुरंदऱ्यांचें घराणें अद्याप घेत आहे.

**गणपतीचें देवालय**:—ह्या स्थळीं पूर्वीं मुसलमा-

---

१टीप–बाळाजी विश्वनाथ (सन १७१४) पेशवे–पदास आल्यावर त्यांनीं आपले मित्र आबा पुरंदरे यांस मुतालिक बनविलें, हे पुढें चांगले उदयास आले. पुरंदऱ्यांच्या घराण्यापैकीं निळकंठराव पुरंदरे हे रावबाजींचे उपयोगी पडले व त्याच्या सल्लामसलतीनें रहात असत. हे पुढें सन१८२६मध्यें मृत्यु पावले. त्यांच्या कुटुंबास सरकारानें येणेंप्रमाणें नेमणूक करून दिली. (१) आईस—३०००(२) दोन विधवांस—३००० (३) दत्तक पुत्रास—१००० (४) मुलीस–३००.

पेशवाई बुडाल्यावर पुरंदरे घराण्यांतील इतर वारसांसही इनामें मिळालीं तीं येणें प्रमाणें–(१) विठ्ठलराव मल्हार—१०८३२, (२) रामराव—१५०००(३)कृष्णराव—४७५०

नांचीच कायती वस्ती होती. एके दिवशीं गुराख्यां-च्यीं पोरें येथें खेळत असतां गडग्यांत त्यांस एक गणपतीची मूर्ती सांपडली व त्याची ते पूजा करूं लागले. हा देव नवसास पावतो या गोष्टीचा पुढें पुढें फार लौकिक होऊन जिजाबाई राणीसाहेब यांजपर्यंत ही खबर गेली त्यांची श्रद्धा गणपतीवर जडली ती पराकाष्ठेचीच. प्रत्यहीं पुजेस येण्याचा त्यांचा नियम कधींही अंतरत नव्हता. व भोंसल्या-कडून देवाचा बहुतेक खर्च चालला होता. ग्रामजो-शी व्यवहारे यांनीं देवापुढें लहानसा सभामंडप उ-भा केला, पण सध्यां गजाननपंत दीक्षित यांनीं मोठा सभामंडप बांधून देवालयास विशेष शोभा आणली आहे. मराठेशाईंत या देवालयाचा बडेजाव चांगला चालत असे, पण हल्लीं सर्वच मनु फिरल्यासारखें होऊन पर्वती संस्थानाचे पोटांतून या देवालयाकडे दरमहा ९ रु० बटवडा केले जात आहेत. व देवही त्यामध्यें संतुष्ट राहून व काळावर नजर देऊन आ-पला खर्च कसा तरी भागवून घेत आहे.

**पेठ्यांचा वाडाः**—हा वाडा पेठे घराण्याचा आ-हे. ह्या घराण्याचे मूळ पुरुष कृष्णाजी विसाजी पेठे गुहागरकर यांचे पुत्र त्र्यंबकराव मामा हे होत. इ-तिहास प्रसिद्ध सदाशिवरावभाऊ यांजे हे मातुळ होत. इ. स. १७७४ मध्यें टिपु बरोबर लढतां-नां त्र्यंबकराव मामा रणांगणीं पतन पावले. ह्यां-च्या वंशास सन १८०२ पर्यंत चांगली नेमणूक होती. परंतु मध्यंतरी झालेल्या घोटाळ्यांत अमृत-

रावाचे मुलाकरितां साताऱ्याहून पेशवाईचीं वस्त्रें आणण्याचे भानगडींत यांच्याच घराण्यांतील कोणी त्र्यंबकराव हे पुढारी असल्यामुळें ह्या घराण्यावर रावबाजीचा कोप होऊन ती सर्व नेमणूक बंद झाली. पण कंपनी सरकारानें दयाळू होऊन ह्यांच्याच वंशास दोन हजार रुपये पेशवाई लयास गेल्यावर करून दिले. बहुळ ता० खेड नजीक भीमानदीच्या कांठीं यांचीं कुरणें व जमीनी बऱ्याच असून नदीचे तीरीं उंचवटयावर यांचा एक बंगला आहे.

हा वाडा तिमजली असून ह्याची बांधणूक मजेदार व मजबूत आहे. पूर्वीं ह्याचे मधल्या दिवाणखान्यांत नाना तऱ्हेचीं सोनेरी चित्रें रेखिलीं होतीं, पण तीं हल्लीं कालाच्या विचित्र सपाटया पुढें नष्ट झालीं. पेठयांचे वंशज ह्याच वाडयांत रहातात. ह्या वाड्याचा कांहीं भाग पुण्याचें बोर्डिंग किंवा भोजनगृह याजकडे भाडयानें सोंपविला आहे. हल्लीं ह्या वाडयापुढें गेलें असतां मंजूळ वाद्यांचे ऐवजीं तांबट लोकांचे टणटण आवाजानें डोकें अगदीं ठणकूं लागतें.

**शेकसालांचे दर्गे**:—हे दोन दर्गे मुळामुठा नदीचे कांठीं आहेत. एकास थोरला शेकसाला किंवा वडा शेकसाला, व दुसऱ्यास धाकटा किंवा छोटा शेकसाला असें ह्मणतात. हीं स्थानें फार प्राचीन काळाचीं आहेत. सुमारें हजार वर्षांपूर्वीं हे दर्गे नसून हीं हिंदूंचीं देवालयें होतीं व त्यांस अनुक्रमें नारायणेश्वर व पुणेश्वर अशीं नांवें होतीं परंतु इ.

स. १२९० या वर्षी दिल्लीहून हिस्सा मोहद्दीन कलाल व दुसरे आणखी चौघे फकीर पुण्यांत आले होते ते या देवालयांत उतरले ! ( या वेळीं पुण्यांत मुसलमानी अमलाचा प्रभाव गाजत होता. ) व त्यांनीं आपली पगडी फिरवून हीं दोन्ही देवालयें भ्रष्ट केलीं— मूर्ती झुगारून दिल्या व त्यांच्या मशिदी बनविल्या— ( यां पैकीं पुणेश्वराचें लिंग गांववाल्यांनीं पुरंदचे माचीस दडविलें तें अजून तेथें आहे. ) पुणेश्वराचे देवळास सेखसालाउद्दीन याचा दर्गा व नारायणेश्वराचे देवळास शेखहिस्सा मोहद्दीनचा दर्गा अशीं नांवें दिलीं.

पुढें ब्राह्मणी[1] राज्याचें वैभव महाराष्ट्रांत झळकूं लागलें यामुळें मुसलमानांची अर्थात् चहा होऊं लागली. व त्या सपाट्यांत या दर्ग्यांस पुणें जिल्ह्यांतील एरवडे व कळस हीं दोन गांवें जहागीर मिळालीं. तेव्हां या उत्पन्नावर मुजावर पुलाव व बिरयानी या पक्वान्नावर चैन मारूं लागले. पण आदिलशाही अमदानींत मुरारपंडिताचे सद्दींत ही जहागीर जप्त झाली यामुळें उपाद्व्याप बोवांच्या चैनीस 'खो' बसला. यांनीं अर्जदारें दाद मागण्याची पराकाष्ठा केली. शेवटीं एकदांचा जबाब मिळाला कीं, 'या दर्ग्यास हल्लीं जे मुसलमान मुजावर आहेत त्यांचे हक्क आह्मी ओळखीत नाहीं, परंतु एकादा कर्मनिष्ठ ब्राह्मण ह्या दर्ग्याचा मुंजावर होत असल्यास सदर गांवांची मोकळीक करण्यांत येईल.'

---

१ टीप—हुसेन कांगो ब्राह्मणी ह्यानें दक्षिण प्रांत जिंकून तेथें राज्य स्थापिलें ह्मणून त्यास ब्राह्मणी राज्य असें म्हटलें आहे.

ही वार्ता शहरभर—( नव्हे गांव—भर ) पसरली. तेव्हां एका आशाभूत ब्राह्मणाचे तोंडास पाणी सुटून तो आपल्या पूज्य सनातन धर्मावर लाथ मारून महंमदी धर्माची दीक्षा घेण्यास प्रवृत्त झाला! व मुसलमानांचे ताटांत जेवूं लागला ! ! विजापूरकरास आपलें वचन पाळण्यास कांहींच जड नसल्यामुळें त्यांनीं सदर गांवें दर्ग्याकडे चालू ठेविलीं. पुढें मराठेशाहींत ही जहागीर बंद पडून हल्लीं तर मुजावरास धुळीचे दिवे खात जावें लागत आहे. असो.

धाकट्या शेकसल्लांत हल्लीं लहान मोठ्या पुष्कळ कबरी दृष्टीस पडतात. त्यांत सर्वांत जी मोठी आहे ती औरंगजेबाचा नातू मोहिलउलमुल्क ह्याची होय.

कसब्यांत ब्राह्मण, कासार, शिंपी वगैरेंची दाट वस्ती असून लोकसंख्या ११,८९० आहे.

## ( १९ ) बुधवार पेठ.

रविवारप्रमाणें बुधवार पेठ ही शहरांत प्रसिद्ध आहे. रविवारांत जसा फडक्यांचा वाडा तसा बुधवारांत बुधवारचा वाडा ! औरंगजेबानें संभाजीचा खवट लाविल्यानंतर ही पेठ वसाविली. त्या वेळीं हिला ' मोहिनाबाद ' असें नांव चालत असे. व या पेठेंत बहुतक मुसलमानांचीच वस्ती असल्यामुळें सर्वत्र खानसाहेबांची व सलाम-आलेकम सलाम यांची गर्दी उडत असे. पुढें शिवछत्रपतीचा तीक्ष्णतर प्रतापानल असह्य होऊन मुसलमानी राज्य

तीन पायांवर आल्यामुळें कमी होत होत सर्व घरें-दारें ओस पडून मुसलमानांचें नर्यनाट झालें. ही पेठ ह्या शून्यावस्थेचा अनुभव फार वर्षे घेत होती. पुढें माधवराव बल्लाळ पेशवे यांनीं गोविंदराव खासगी-वाले यांस आज्ञा करून शास्त्रोक्तरीत्या ही पुनः वसविली.

बुधवारांत वर्णन करण्यासारखीं अनेक स्थळें आहेत, पैकीं ( नानाची ) बेलबाग, ( पेशव्यांची ) तुळसीबाग, पेशव्यांचा ( बुधवारचा ) वाडा, मोरो-बादादांचा वाडा, कोतवाल चावडी, तांबडी जोगे-श्वरी व आनंदोद्भव नाटकगृह हीं मुख्य होत.

**बेलबागः**—हें विष्णुमंदीर नाना फडणवीस यांनीं बांधिलें. याचें काम ( १७६५ पासून १७६९ पर्यंत ) चार वर्षें चाललें होतें. राजाश्रयामुळें व त्या वेळच्या स्वस्ताईमुळें या कामास २५,००० रु. खर्च लागला. देवालयाचे सभोंवार बेलाचीं पुष्कळ झाडें असल्यावरून यास ‘ बेलबाग ’ हें नांव पडलें. या ठिकाणीं पूर्वीं पेशव्यांची ‘ घोडशाळा ’ होती.

देवालयास कांहीं तरी स्थाईक उत्पन्न असावें अशा हेतूनें नानांनीं इ. स. १७७९ त सातारा, पुणें व नगर ह्या तीन जिल्ह्यांतलीं ४ गांवें तोडून दिलीं होतीं, पण पुढें रावबाजीचें व नानाचें वैमनस्य पडल्यामुळें श्रीमंतांनीं सदर गांवें जप्त करून टाकिलीं होतीं, तीं पेशवाई अखेर तशीं जप्तींतच होतीं. पुढें नानाची स्त्री जिऊबाईनें एल्फिन्स्टन् साहेबांकडे अर्ज—द्वारें दाद

लाविल्यामुळें त्यांची जप्ती उठली. हल्लीं इतर सर्व ठिकाणच्या देवस्थानांचा खर्च पूर्वींच्या खर्चाशीं ज्या प्रमाणांत आहे, त्याच प्रमाणांत या देवस्थानच्या खर्चाची स्थिति आहे !

**तुळशीबाग**:—हें राममंदीर फार प्रसिद्ध आहे. हें बाळाजी बाजीराव यांनीं बांधिलें. ( इ० स० १७६१ ) येथें पूर्वीं एक ओढा वाहत असून त्याचे कांठीं एक सुंदर तुळशीचा बाग होता व तेथेंच हें देवालय बांधलें गेल्यामुळें यास 'तुळशीबाग' असें नांव पडलें, सांप्रत बेलबागेंत ज्याप्रमाणें बेलाचीं झाडें कोठें दिसत नाहींत, त्याप्रमाणें या तुळशी-बागेंतही तुळशीचीं झाडें ( नांवाप्रमाणें ) दिसत नाहींत. या स्थळीं पूर्वीं ओढा होता हें जरी खास आहे, तरी त्याच्या सत्यतेची कांहींच साक्ष सांप्रत उपलब्ध नाहीं. मानवी प्रयत्नापुढें बिचाऱ्याचें कांहीं न चालून कोठें परागंदा झाला न कळे.

मध्यभागीं रामाचें देऊळ असून उजवे बाजूस गणपतीचें व डावे बाजूस महादेवाचें अशीं दोन छोटीशीं पण सुबक देवळें असल्यानें एकंदरींत फारच शोभा दिसते. देवाच्या मूर्तीही शुभ्र पाषाणाच्या असून अप्रतिम आहेत. देवाचा उत्साह पाहण्यास लांब लांबचे लोक येत असतात. प्रत्यहीं त्रिकाल सज्जावर नगारा झडत असतो, व सर्वदां देऊळ अगर्दी माणसांनीं गजबजलेलें पाहून आंत आल्याबरोबर मनाला एक प्रकारचा आनंद होतो. पेशवाईंतील बहारदारी आतां कशानें असणार ! हें

जरी खास आहे, तरी येथें येतांच मन रमतें खचीत.

देवालयापुढें प्रशस्त नवीन सभामंडप घातलेला असून शिखराचें कामही उत्तम झालें आहे. शहरांतील प्रसिद्ध श्रीमान गृहस्थ नंदराम यांनीं या प्रीत्यर्थ २०००० हजार रुपये खर्च केले आहेत.

**बुधवारचावाडा:**—हा वाडा आमच्या रंगेल रावबाजीनें बुधवार चौकांत केवळ शहरची मजा पाहण्यासाठीं ह्मणून अगदीं मध्यावर इ. स. १८१३ ह्या वर्षीं बांधिला. याला तीन मजले असून क्षेत्र १६० फूट लांब व १४० फूट रुंद इतकें होतें. हा वाडा मौज पाहण्याकरितांच बांधिला असून याचें कामही मौजेचेंच केलें होतें. बाजीरावी (व त्याबरोबर पेशवाई ही) लयास गेल्यानंतर कंपनी सरकारानें आपल्या कित्येक कचेऱ्या या वाड्यांत सांठविल्या होत्या. पुण्याची नेटिव्ह ज॰ लायब्ररीही याच वाड्यांत होती, व एक मराठी शाळाही होती.

इ. स. १८७२ सालीं राज्ञीपुत्र लार्ड एडिंबरो यांचें आगमन सत्कारार्थ विंचूरकरांनीं ह्यावर क्लॉकटॉवर बांधिला होता. आलीकडे ह्मणजे इ. स. १८७९ च्या मे महिन्याच्या तेराव्या दिवशीं ह्या वाड्याचें आयुष्य समाप्त होऊन हा जळून राख होऊन पडला!

**मोरोबादादांचा वाडा:**—मोरोबादादा फडणविस (नाना फ॰ चे चुलत बंधु.) ह्मणून कांहीं

दिवस स० माधवरावाचे मुख्य दिवाण होते त्यांनीं हा वाडा बांधिला. हा वाडा फार मोठा असून याचें बांधकाम उत्कृष्ट आहे. वाड्याला सर्वत्र चुन्याच्या गच्चया आहेत. तिसऱ्या मजल्यावर हस्तिदंती दिवाणखाना आहे. ह्यास नवलाख रुपये खर्च झाला असें सांगतात.

**कोतवाल चावडीः**—पेशवाईंत येथें पोलीसाचें ठाणें होतें. तळ मजल्यावर तुरुंग असून दुसऱ्या मजल्यावर पोलीसकचेरी होती. प्रसिद्ध घाशी-राम कोतवाल येथेंच न्यायासनीं विराजमान होऊन धारवाडी कांट्यानें घाशीरामी न्याय देत होते ! सांप्रत ही जागा सरकारानें विकून टाकिली आहे. येथें भाजीपाला फळफळावळ विकावयाला बसते.

**तांबडी जोगेश्वरीः**--हें देवस्थान फार पुरातनचें आहे. तांबडा रंग दिला असल्यामुळें ‘ तांबडी जोगेश्वरी ’ हें नांव पडलें. प्रथम लग्नकार्यांत ह्याच देवीची आराधना करीत असत

**आनंदोद्भव नाटकगृहः**--हें इ. स. १८६३ या वर्षी कृष्णशेट सोनार यांनीं नऊ दहा हजार रु० खर्चून बांधिलें आहे, याचें भाड्याचें उत्पन्न-ही जबरें आहे. प्रत्यहीं नाटकें—तमाशे—संभाषणें

---

१ टीप—घाशीराम कोतवाल कनूजा ब्राम्हण होता. त्यानें एकवीस ब्राह्मण लिदींचे खोलींत लीद पसरून हाल हाल करून कोंडून मारिले. हा बोभाटा श्रीमंतांस कळला, त्यांनीं ब्राम्हणांचा आग्रह धरून घाशीरामाचे पांच पाट काढून डोकीं-त शेंदूर घालून, उंटावर बसवून व शहरांत फिरवून गारपिरावर नेऊन ठार केला. ( शके १७१३. )

वगैरे कांहीं ना कांहीं तरी आहेच. हें नाटकगृह, गुंतले गेले नाहीं असे दिवस ( फार करून रात्री ) उभ्या वर्षांत फारच कमी सांपडतील. हें आप-ल्या नांवाची अन्वर्थता हमेषा पुणेंकर रसिक मंडळीच्या हृत्पटलावर बिंबवीत आहे. दुसरें याची स्थापना अशा रीतीनें झाली आहे कीं, हें नाटकगृह भरवस्तीला—भर रस्त्यावर असून खेरीज बाजूला व निवस्त असल्यासारखें आहे.

वर लिहिलेल्या स्थळांशिवाय या पेठेंत भांग्या मारुती, खणाळ्या राम, भिडयांचा वाडा, ढमढेरे यांचा वाडा, थत्ते यांचें राममंदीर, पासोड्या मारुती, माणकेश्वरांचा ( किंवा किब्यांचा ) वाडा वगैरे अनेक स्थळें प्रसिद्ध आहेत. लोकवस्ती ६०८३ ची आहे.

## ( १६ ) शनिवार पेठ.

ही इ० स० च्या १७ व्या शतकांत वसविली गेली आहे. ह्या पेठेंत पूर्वीं मुसलमानांची दाट वस्ती असून तीस त्यावेळीं ‘ मुरजुदाबाद ’ हें नांव चालत होतें. पण पेशवाईंत हा सारा प्रकार मागें पडून, मराठ्यांनीं, व ब्राह्मणांनीं हीमध्यें आंपापले टोलेजंग वाडे उठवून दिले आहेत.

ह्या पेठेंत वर्णन करण्यासारखीं अनेक स्थळें आहेत तरी आह्मी त्या सर्वांच्या नादीं लागत न बसतां फक्त ३ च ( १ ओंकारेश्वर, २ अमृतेश्वर, ३ शनिवारचा वाडा ह्म० जुना वाडा. ) स्थळांचें वर्णन वाचकांस सादर करितों.

**ओंकारेश्वर**—हें रम्य व विस्तृत सांबाचें देवस्थान मुठा नदीच्या कांठीं असून इ० स० १७६० या वर्षीं शिवरामबोवा चित्राव यांनीं बांधिलें आहे. देवालयाचें काम सहा वर्षें चाललें होतें तोंपर्यंत दरमहा एक एक हजार असे ७२,००० रुपये भाऊसाहेब उर्फ सदाशिवराव चिमणाजी हे देत होते.+ हल्लीं पर्वती संस्थानाकडून नित्यखर्चास दरमहा २५ रुपये व शिवरात्रीच्या अनुष्ठानाप्रित्यर्थ सरकारांतून दरसाल हजार रुपये देवालयाकडे मिळत असतात. ह्याचे समोर नदीचें वाळवंट आहे तेथें ब्राह्मणांचीं प्रेतें जाळतात.

**अमृतेश्वर**—हें सांबाचें देऊळही मुठा नदीचेच कांठीं आहे. हें बाजीराव ( १ ) ह्यांची बहीण भिऊबाई ( आबाजीपंत बारामतीकर यांची स्त्री ) ह्यांनीं बांधिलें. याचें कामही प्रेक्षणीय आहे. ह्यास पर्वती संस्थानांतून दरमहा १५ रुपयांची नेमणूक आहे.

**शनिवारचा वाडा ह्म० जुना वाडा**—चैनी रावबाजीनें बुधवारांत नवा वाडा बांधल्यापासून ह्यास ‘ जुना वाडा ’ असें लोक ह्मणूं लागले. ह्या स्थळीं पूर्वीं धीवर वगैरे लोकांच्या लहान लहान झोंपड्या असून पुष्कळ जागा पडिक होती. एके

---

+ गणेशखिंडींतलि गणपतीचें देऊळ हेंही सदर शिवरामबोवा यांनींच बांधिलें आहे तें बांधीत असतां बोवास कांहीं भूमिगत द्रव्य सांपडलें तें त्यांनीं पेशव्याकडेस ठेव ह्मणून ठेवून दिलें असल्यामुळेंच चित्रावांच्या या देवस्थानासंबंधानें पेशव्यांचें एव्हढें औदार्य व्यक्त झालें आहे असेंही ऐकिवांत आहे.

दिवशीं बाजीराव ( १ ) घोड्यावर बसून शहरांत दौडत असतां, ह्या स्थळीं ससा व कुत्रा ह्यांची लटपट चालली होती, तें कौतुक पाहण्यास अमळ थांबला; इतक्यांत सशानें कुत्र्याच्या नरडीचा घोट घेतला ! हें पाहून बाजीरावास परम आश्चर्य वाटलें; व ' सशानें कुत्र्यास मारावें ' अशी गोष्ट कालत्रयीं घडणें अशक्य असतां हा प्रकार घडला कसा, याचा विचार करूं लागला. शेवटीं त्याची मति कुंठित होऊन या जाग्याचच महात्म्य असें कांहीं विलक्षण आहे असें त्यानें आपलें समाधान करून घेतलें. इतकें होऊन स्वस्थ न राहतां या स्थळीं आपण वाडा बांधल्यास आपण दिल्लीपतीसही अजिंक्य होऊन मराठ्यांकडे कोणीही डोळे वर करून पाहणार नाहीं असा त्याचा विचार ठरला ! व त्याप्रमाणें लागलीच इ० स० १७२९ या वर्षीं सुमुहूर्तीं पाया खणण्यास आरंभ केला ! असो. या जागेचा उर्जित काळ आला.

पायाचे खालीं अमुक मनुष्यें बळी दिलीं अशा दंतकथा ऐकूं येतात त्या कितपत संभवनिय असाव्यात याचा विचार वाचकांवरच सोंपविणें प्रशस्त दिसतें.

वाड्याचें काम सपाट्यानें चाललें होतें, मुख्य दरवाजा, किंवा ज्यास दिल्लीदरवाजा म्हणण्याचा प्रघात पडला आहे तो, उत्तराभिमुख केला होता, ( व तो तसा आहेही ) इतक्यांत ही बातमी छत्रपति शाहूस समजली व त्यांनीं निरोप पाठविला कीं,

" तुह्मीं वाड्याचा दरवाजा उत्तरेस केला हे ठीक केलें नाहीं. आह्मी मराठे, यद्यपि तरवार बहादर आहों. आमचे धाकानें हल्लीं दिल्लीपतिही थरथर कांपत आहे तरी पण, दिल्लीची गादी आह्मांस पूज्य आहे; व तीस विशेष मान देणें हें आमचें कर्तव्य आहे. शिवाजी महाराजांनीं विजापूरकरांस अगदीं हालवून टाकिलें होतें तथापि ते गादीस पूज्य मानून, तिचें नांद घेतांना पायां पडत असत. त्याप्रमाणेंच हल्लीं आह्मांस सार्वभौम बादशहाची गादी पूज्य असतां तिचा अपमान करणें हें फार निंद्य आहे. याकरितां दिल्लीकडे तोंड करून मुख्य दरवाजा जो तुह्मीं बांधीत आहां तो रहित करावा. " हा निरोप येऊन आदळतांच काम बंद पडलें, तें पुढें बाळाजी ऊर्फ नानासाहेब यांचे कारकीर्दींत पुरें झालें.*

ह्या वाड्याचें काम सन १७३७ इसवींत पुरें होऊन ह्याच सालीं पेशवे वाड्यांत नांदूं लागले. हा वाडा सहा मजली असून याकडे चार एकर जमीन गुंतली गेली आहे. वाड्यास मोठे चौक चार

---

* कित्येकांचें असें सांगण्यांत आहे कीं, बाजीरावाचे मनांत दिल्लीदरवाजाप्रमाणेंच सारा तट बळकट बांधावयाचें होतें, पण शाहुछत्रपतीस ह्याची भिती उत्पन्न होऊन असा मजबूद तट तुह्मीं बांधूं नका असा निरोप आल्यामुळें तटाचें काम साधें विटा दगडांनीं बांधून टाकिलें. पूर्वील दरवाजाचें काम मजबूद व सुरेख करण्याची चाल जुने लोकांची होती. ह्यांची उदाहरणें विजापूरांत व ह्या पुण्यांतही सांपडतात म्हणून हें ह्मणणें संभवनिय वाटत नाहीं.

( फडांचा[1] चौक, ताक चौक, मुदपाक चौक, व पक्वान्न चौक ) असून लहान लहान चौक तर पुष्कळच होते. ह्या लहान चौकांपैकीं तीन चौक स्त्रियां करितां ( सावित्री बाईचा चौक, यमुना बाईचा चौक व मस्तानी* चौक ) केले होते.

वाड्यांत दिवाणखाने कैक होते, ह्यांच्या भिंती देवादिकांच्या चित्रांनीं सुशोभित केल्या होत्या. हीं चित्रें एवढ्या सफाईनें रेखलीं होतीं कीं, परक्या मनुष्यास ह्या भिंतीस टेकून जिवंत मनुष्येंच उभीं आहेत, असा भास व्हावा ! भिंती इतक्या गुळगुळीत केल्या होत्या कीं, त्यांत चेहरा पाहून घ्यावा.

**गोकाक दिवाणखाना**:—ह्यांत मुख्यत्वें गोकाक येथील नानाप्रकारचे कृत्रिम पदार्थ एकास एक लागून प्रदर्शनाप्रमाणें मांडिले असत, त्यावरून यास असें नांव पडलें. याखेरीज यांत इतरही जवाहीर वगैरे जिनसा बहुत असल्यानें यास फारच शोभा येत असे.

**नाच दिवाणखाना**:—ह्यांत हमेषा नायकिणींचे नाच होत असत. रावबाजी बहुधा आपलें वीरासन येथेंच ठोकून नाच रंगांत अगदीं चूर असत!

---

१ नानाफडणवीस ह्यांचे आज्ञेवरून ह्याची दुरुस्ती इ॰ स॰ १७८८ सालीं केली.

* Mustani was brought by Chimnaji Appa from Upper India and presented to his brother the Peshwa Bajeeráo ( *Bombay Gazetteer* Vol: XVIII Part III. )

**कचेरी दिवाणखाना**:—ह्यांत बहुतेक कचेऱ्या असून प्रसंगोपात् दरबारही येथेंच भरत असे.

**हस्तिदंती दिवाणखाना**:—ह्यांत हस्तिदंती तऱ्हे तऱ्हेच्या सामानाची लयलूट तर होतीच, पण शिवाय छत वगैरे हींही कामें हस्तिदंतीच होतीं.

**गणेश दिवाणखाना**:—ह्यांत गणपतीची मूर्ती असून दरसाल भाद्रपदांत एकसारखा अकरा दिवस उत्साह होत असे. शेवटचे बाजीरावींत तर ह्या उत्साहा प्रीत्यर्थ प्रत्यहीं हजारों ब्राह्मण तुपालाडवांवर ताव मारीत. प्रत्येकी ब्राह्मणास दर दिवशीं एक एक विडा असे अकरा दिवसांत अकरा विडे मिळत असत. हे विडे या "नैन्टिन्थ सेंचुरी'तील दरिद्री विडे नव्हेत बरें! तर एक विड्यांतील पानें खेरीज करून सुपारी, लवंगा, जाय-

[१] टीप—ह्या दिवाणखान्याचा फोटो [देखावा] दरबारासह सन १७९० या वर्षी पुण्याचे रेसिडेन्ट मालेट साहेब ह्यांनीं काढिला आहे. हा फोटो विलायतेंत मालेट साहेब यांचे कुटुंबांत होता. त्याची नक्कल श्री० बाळासाहेब पटवर्धन यांनीं उतरून येथें आणिली व श्रीमंत गाईकवाड सरकार यांस अर्पण केली. ह्या नक्कलेची दुसरी नक्कल हल्लीं चित्रशाळा हुबेहुब उतरीत आहे. ह्यावर इंग्रजी व मराठी लेख येणें प्रमाणें आहेत:—
"इंग्रज पेशवे व निझाम या तिघांचा तहनामा सन १७९०
"सालांत टिपु सुलतान याचा मोड करण्यास्तव झाला. तो
"तहनामा पुण्याचे रेसिडेन्ट सरचार्लस मालेट यांनीं ता० ६
"आगष्ट सन मजकुरीं श्रीमंत सवाई माधवराव पेशवे यांस, भर-
"दरबारांत नजर केला, तें दरबार जुन्या शनवारच्या वाड्यां-
"तील प्रसिद्ध गणपती रंगमहालांत भरलें असून त्यांत नाना-
"फडणवीस, हरिपंत तात्या फडके वगैरे मंडळी बसलेली होती,
"त्या दरबारचा हा फोटो आहे.

फळ, जायपत्री, वेलदोडे इ० जिनसा दुसरा भाद्र-पद येईपर्यंत खुशाल पुरे पडत असत !

**आरसेमहालः**—मोठमोठ्या आरशांच्या तावदानांनीं ह्याच्या भिंती सर्वत्र युक्त केल्या असत, तेणेंकरून एकादा नवखा मनुष्य आंत गेला असतां त्यास शेंकडों मनुष्यें—शेंकडों दरवाजे व शेंकडों दिवाणखाने दिसावयाचे ! रंगेल रावबाजी ह्यांचें हें 'शयनमंदिर' होतें. आंत शेंकडों पलंग दिसून तितकींच स्त्रीपुरुषें विलासाची लूट करीत आहेत असें भासे !

**नारायणरावांचा महालः**—बाळाजी बाजीरावानें मुद्दाम नारायणरावांकारितांच हा बांधिला होता. यांत नाना तऱ्हेचें विलासी सामान अगदीं गच्च भरलें असे. पलंग—गाद्या—गिर्द्या कितीक असतील याचा पत्ताच नसे. ह्याच शेवटल्या महालानें सवाई माधवरावांस उडी टाकून आत्मघात करून घेण्याची परवानगी दिली ! !

**अस्मानी महालः**—हा एक नवीन महाल सन १८११ त रावबाजींनीं बांधिला होता, तोही मोठा मजेदार होता.

ह्या वाड्यांत प्रत्यहीं हजारों मेणबत्या जळत असत. आचारी, पाणके, झाडलोट करणारे ह्यांनाच फक्त दरमहा १९०० रु० पगार द्यावा लागत असे. ह्यावरून बाकी बहुतेक गोष्टींचें अनुमान होईल. एकंदरीनें हा वाडा पाहिला असतां कसाही दुःखी कष्टी प्राणी आपलें दुःख विसर-

त असून आश्चर्य सागरांत मग्न होत असे. असला प्रचंड वाडा सर्व महाराष्ट्रांत दुसरा नव्हता. वाड्याची एकंदर उंची किती असावी हें जरी आज निश्चित सांगतां येत नाहीं, तरी शेवटच्या मजल्यावरून आळंदीचें देऊळ दिसत होतें, ह्मणून सांगतात.

वाड्याच्या सभोंवार असलेला तट जो सध्यां दिसत आहे, तो २० फूट उंचीचा असून त्यास एकंदर पांच दरवाजे ( दिल्लीदरवाजा, जांबूळदरवाजा, गणपतीदरवाजा, मस्तानीदरवाजा वगैरे ) होते, व ते आहेत, दिल्लीदरवाजाचीं वृक्षवत् झडपें त्याचें तें [illegible] पाहून त्या वाड्याचें पूर्वीचें वैभव अस्मळ लक्ष्यांत येतें.

जांबूळ, गणपती व मस्तानी हे दरवाजेही त्या त्या मानानें प्रसिद्ध होते. मस्तानीच्या उपभोगा प्रीत्यर्थ बाजीरावानें नानाप्रकारचीं विहार मंदिरें रथ, हत्ती, घोडे बगीचे वगैरे केले होते, व तिच्या नांवानें ते प्रसिद्धही होते. पण जसें ह्या वाड्याचें नांव नष्ट झालें त्या बरोबर तिचेही नांव नष्ट होत होत [illegible] आहे.

ह्या तटावर पेशवाईंत बंदुका व तोफा यांची रांग नेहमीं जय्यत असे. तटाचे बाहेरील सर्व भिंतीवर देवादिकांचीं चित्रें रेखिलीं होतीं. कौरव पांडव ह्यांचें तुंबळ युद्ध तर हुबेहुब उतरलें होतें, तें पाहून वीरश्रीच्या स्फुरणानें शूर लढवय्यांच्या आंगरख्याचे बंद तटातट तुटत असत, पण ती

वीरश्री–तो पराक्रम–तें वैभव सर्वच नाहींसें झालें. ईश्वरी लीला मोठी अगाध आहे. त्यापुढें मनुष्यांचा उपाय काय होय !

पेशवाई बुडाल्यानंतर पुढें नऊ वर्षांतच हा वाडा आपले स्थितीस अगदींच संतापून गेला ! कसा बरें संतापणार नाहीं ? ज्या वाड्याच्या पुण्याईवर हजारों वीरशिरोमणि गुडघे टेंकून, मराठ्यांच्या गादीचे मुख्य प्रधान यांचें पुढें नमून असत, ज्या वाड्यांत वैदिक ब्राह्मणांचे थवेच्या थवे मोठ्या पूज्य भावान, महाराष्ट्रदेशाचें अफाट राज्य चालविणारे, यांची मनधरणी करीत असत, ज्या वाड्यास पुण्यपुरुषाच्या पादस्पर्शाचें सुख अनुदिन मिळत असें, ज्या वाड्यांत सर्वसाक्षी सर्वेश्वराचें नांव घेण्याची किमपि खळती होत नसे, ज्या वाड्यांत हिंदूंच्या पवित्रतेची व मुख्यत्वें ब्राह्मणकर्माची वाण मुळींच पडत नसे, ज्या वाड्याची कीर्ति त्याचे उत्पादकाचे पुण्याईनें तिहीं लोकीं पसरली होती, तो हा वाडा, रावबाजीचे महत्त पापानें प्रथमच अगदीं कंटाळून गेली होता, तशांत पुढें तर त्याचा पवित्र देह इंग्रजी बुटांनीं अगदींच खिळून गेल्यामळें ह्या शनिवारच्या वाड्यानें पेशवाईचा उपभोग सुमारें शंभर वर्षें घेतल्यावर आपलें आयुष्य पुरें झालें असें पाहून, आपला प्रचंड देह अग्निनारायणास अर्पण केला* ! हाय ! हाय ! ज्या वाड्याचें आज्ञीं हा कालपर्यंत

* सर्वजित नाम संवत्सरीं फल्गुन शुद्ध ९ रोज गुरुवार दीड प्रहरीं सन १८२७ त ह्या वाड्यानें देह ठेविला.

प्रेमपूर्वक वर्णन केलें–कौतुक गाइलें–तो हा वाडा शेवटीं राखेच्या ढिगांत अगदीं गडप्प होऊन गेला आं! ही स्थिति ऐकून कोणा महाराष्ट्रीयास कसें बरें दुःख होणार नाहीं! बिचारा या वाड्याचा तट आह्मांस दारिद्र्यावस्थेंत व धर्मभ्रष्ट झालेले पाहून रात्रंदिवस ओं–ओं–करून शोक करीत आज कैक वर्षे उभा आहे! नशीब बिचाऱ्याचें!!! शनिवार पेठेंत लोकवस्ती ७७८६ ची आहे.

### (१७) नारायण पेठ.

ही नारायणराव पेशवे यांनीं इ० स० १७७३या वर्षी वसविली. ह्या पेठेंत पूर्वीं वाणी, मारवाडी वगैरे लोकांची विशेष वस्ती असून धान्याचा व्यापार सपाटून चालत असे. ह्या पेठेंत लांकडी (लकडी) पूल हा फार प्रसिद्ध आहे.

**लकडी पूलः**—सांप्रत हा पूल जरी दगडांनीं बांधिलेला आपण पाहतों तरी याचें पूर्वरूप हें नव्हे. पूर्वीं हा भक्कम लांकडांनींच बांधिलेला होता. व ह्याचें वास्तव्य पुण्यापासून मुंबईकडे जाणाऱ्या रस्त्यावर असल्यामुळें, आगगाडी आक्यांचा इकडे संचार होईपर्यंत, गाड्या घोड्यांचा तांडाच्या तांडा नेहमीं यावरून चाललेला असे.

इ० स० १८४० ह्या वर्षीं मुठा नदीस महापूर येऊन याचें पूर्वरूप गेलें तेव्हां आमच्या दयाळू

---

१ टीप—हा पूल बाळजी बाजीराव पेशवे ह्यांनीं शके१६८२ (सन १७६१) या वर्षी बांधिला. खुद्द पेशवे काम पुरें होई पर्यंत पुलावर हजर असत. हा सहा दिवसांत बांधून पुरा केला.

कंपनी सरकारानें आपल्या उदार आश्रयतेखालीं लोकांच्या आश्रयानें ४७,००० रुपये गोळा करून हा दगडांनीं बांधून काढिला. तरी त्याचें नांव लकडी पूल हेंच चालू आहे.

नारायण पेठेंत ह्याशिवाय मातीचा गणपती, अष्टभुजा देवी, माणकेश्वराचा विष्णु, विठोबा, गायकवाड सरकारचा वाडा वगैरे स्थळें प्रसिद्ध आहेत. डोलकर आळींत मुख्यत्वें ब्राह्मणांची पुष्कळ वस्ती आहे.

नारायण पेठेची एकंदर खानेसुमारी ३५६३ आहे.

## ( १८ ) सदाशिव पेठ.

ही पेठ प्रख्यात सदाशीवराव भाऊ यांनीं इ० स० १७५९ या वर्षीं वसविली. ही मोकळी असून मैदानाप्रमाणें होती, त्या वेळीं हींत पेशव्यांच्या सैन्याची छावणी असून कैदीही हींतच ठेवीत असत. शेवटचे बाजीरावांत ह्या पेठेस फारच महत्व चढून हिचा विस्तारही वाढत चालला होता; व बाजीरावी आणखी कांहीं वर्षें अव्याहत चालती तर ही फैलावत फैलावत इतकी फैलावली असती कीं, कदाचित् पर्वतीस हिनें मध्यें टाकिलें असतें.

ह्या पेठेंत वर्णन करण्या योग्य अशीं जुनाट स्थळें बहुत आहेत त्यांतील मुख्य हीं होत. सदाशीव पेठचा हौद, विश्रामबागचा वाडा, पुष्करणीचा हौद, नरसोबाचें देऊळ, हिराबाग व पर्वतीचें तळें.

**सदाशीवपेठचा हौद**:—हा प्रसिद्ध हौद ना-

ना फडणवीस ह्यांनीं इ० स० १७९० त बांधिला. पुण्यापासून सहा मैलांवर आंबेगांव नामक खेडें आहे, तेथील सर्वोत्कृष्ट पाणी नळानें बांधून आणून यांत सोडलें आहे. ह्या पाण्याची पुण्यांत फारच आख्या आहे. शहरांत पुष्कळ लांब पर्यंत हें पाणी मुद्दाम पिण्याकरितां लोक घेऊन जात असतात.

**विश्रामबागचा वाडा**:-ह्या वाड्याचा पाया रावबाजीने इ. स. १८०३ मध्यें घातला. याचें काम एकसारखें सहा वर्षें चाललें असून २,००,५४० रु० खर्च लागला आहे. ह्यास मोठे मोठे तीन चौक असून हा दुमजली आहे. रावबाजीचें विश्रांतीचें—आरामाचें—हें स्थळ असल्यामुळें ह्यास विश्राम 'बाग' असें नांव पडलें. कित्येकांच्या तोंडीं असें आहे कीं, या ठिकाणीं पूर्वीं एक सुंदर बाग असून तिचा मुख्य विश्राम नांवाचा कोणी माळी होता यामुळें 'विश्रामबाग' असें नांव पडलें. असो.

बाजीरावींत ह्या वाड्याचें वैभव फारच असेल हें उघड आहे. नुमतें फरासांस दरमहा ४०० रु० चें वेतन मिळत असे. ह्या इमारतीचा मालकानें आठच वर्षें उपभोग घेऊन नंतर तो विश्राम भोगण्यास ब्रह्मावर्तास चालता झाला. नंतर ह्याची मालकी कंपनी सरकाराकडे आली, तरी शनिवारचे वाड्याप्रमाणें साहेबी बूट या वाड्यांत खेळत नव्हते, ही गोष्ट लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे.

सरकारानें बाजीरावी बुडाल्यानंतर तीन वर्षांनीं ह्या वाड्यांत एक पाठशाळा स्थापन करून तींत शास्त्री

शिक्षण ठेवून हिंदुशास्त्राचा अभ्यास चालू ठेविला होता, व परीक्षा पास होईल त्यास दक्षिणा* मिळत असे ही दक्षिणा साहेबच आपल्या हातांनीं देत असत. प्रथम प्रथम ही साहेबाच्या हातची अतएव अशुद्ध दक्षिणा जाणून घरीं आल्याबरोबर ब्राह्मण सचैल स्नान करीत असत. तसेंच कदाकाळीं साहेबास वाड्यांत जाणें पडल्यास बूट काढून भीत भीत जावें लागत असून दूर उभें राहून डोकावून पाहवें लागत असे. इतक्याही तंत्रांतून चुकून कोठें स्पर्शास्पर्श झाल्यास अतीशूद्राचा विटाळ समजून ब्राह्मण स्नान करीत असत.

ही दक्षिणा देण्याची चाल नंतर बंद करून हळू हळू लाडू, मिठाई वगैरे पदार्थ विद्यार्थीमंडळास खाऊ ह्मणून देण्याचें ठरलें हा प्रकारही पुढें बरेच दिवस चालू होता.

पुढें या पाश्चात्यासंबंधानें लोकांचे ग्रह हळू हळू पालटत चालले ह्मणा, अथवा काल–देश–वर्तमानावर नजर देऊन त्यांना आपले ग्रह पालटणें भाग पडलें ह्मणा; पण तो राजा आहे, राजा कोणत्याही जातीचा असला तरी त्यास स्पर्श केल्यानें विटाळ

---

* बाजीरावींत ह्या दक्षिणे प्रीत्यर्थ वैदिक ब्राह्मणांकडे किती पैसा खर्चत असे याचा उल्लेख पुढें एका स्वतंत्र लेखांत केला आहेच. ही पाठशाला सुरू केल्यानें ती दक्षिणा बंद करून अवघें तें स्केल १५२५० रु० वर आणून बसविलें! दक्षिणा फंडाची व्यवस्था हल्लीं कोणत्या स्केला वर आहे व त्या फंडाचा विनियोग सांप्रत सुधारणेच्या कोणत्या तत्वास अनुसरून, कोणत्या दिशेस, कोणत्या प्रकारें होत आहे हें प्रसिद्धच आहे.

होत नाहीं तो आपणांस वंद्य आहे—पूज्य आहे—वगैरे त्यांचा समज दृढ होत चालला. दिवसानुदिवस एतद्देशीय लोकांस इंग्रजाशीं सलगीनें वागून त्यांची मर्जी संपादन करावी यांतच आपलें हित आहे असें वाटूं लागलें.*

पुढें इ० स० १८४२ त इंग्रजांनीं आपली विद्या व मूलतत्वें शिकविण्याची सुरवात केली तेव्हां ब्राह्मणादिकांचीं (विशेषतः कोंकणस्थांचीं) मुलें ह्या इंग्रजी विद्येकडे विशेष लक्ष्य पुरवून पटापट धडे शिकूं लागलीं व अल्प विद्या प्राप्त झाली असतां शें-पन्नासांची नौकरी सहज मिळूं लागली व खादीचे पंचे ओंगळ वाटून नागपुरी धोतरजोड्याचा योग येत चालला. येणेंकरून या इंग्रजी विद्यादेवीचा महिमा बराच वाढला. व उठला सुटला तो इंग्रजीची पाठ घेत सुटला. व मुलेंही भसाभस पास होत चाललीं तेव्हां इ० स० १८५६ या वर्षीं 'डेक्कन कॉलेज' नामक उच्चप्रतीचें इंग्रजी शिक्षण देण्याची

---

* The natives especially of the higher castes of Hindoos, and the mohomedans, are eager to acquire learning. Their own of course, they esteem and prefer, but they are now daily becoming more desirous particularly Brahamins, Kayest, Prabhoos, and Sonàrs, of learning what we know, & of fitting themselves to serve us by an acquaintance with our language and literature [ The *Government of British India* 1829. ]

पाठशाळा सरकारानें येथें स्थापिली व ह्यांत पूर्वीपेक्षां अभ्यास कडक ठेविले तरी उत्तरोत्तर मुलांची गर्दीच भरूं लागली, तेव्हां हें विश्राममंदीर पुरेनासें होऊच इ० स० १८६८ त सरकारानें 'डेक्कनकॉलेज' करितां निराळीच इमारत बांधून दिली. व विश्राममंदिरांत 'हायस्कूल' स्थापिलें, तें आजमितीपर्यंत याच वाड्यांत असून अक्षय त्यांत इंग्रजी वर्णांचा घोष चालला असून त्याचीं अनंत पुटें वर बसलीं आहेत.*

नुकतीच ( मे १८७९ त ) ह्या वाड्यास आग लागून पुढील दोन चौक अग्नीच्या भक्ष्यस्थानीं पडले हे जळालेले चौक पुनरपि बांधण्याचें काम चालू असून ह्या विश्रामबागच्या वाड्यास गंगाजमनी रूप प्राप्त होणार आहे.

**पुष्करणीचा हौद**:—हा हौदही नाना फडणविसांनींच बांधिला असून सदाशीव पेठच्या हौदाचा व याचा पाण्याचा उगम एकच असल्यामुळें याचें पाणी सर्वोत्कृष्ठ आहे हें वेगळें सांगणें नकोच. पूर्वीं ह्या सभोंवतीं व वरतीं सुंदर द्राक्षमंडप असल्यामुळें फारच शोभा आली होती. व प्रत्यहीं सकाळ—संध्याकाळ—ब्राह्मणांची मांदीच्यामांदी संध्येस लोटत असे. त्या वेळचा तो देखावा फारच मनोहर दिसे. ह्या हौदास ८,९०० रुपये लागले आहेत.

---

* डेक्कन कॉलेज बांधण्यास एकंदर २४५९६३ रु० खर्च लागला पैकीं १२५००० रु० प्रसिद्ध बाटलीवाले यांची मदत आहे.

**नरसोबाचें देऊळः**—हें कारकूळपुऱ्यांतील देऊळ इ. स. १७८८ त गणुजोशी यानें लोकाश्रयानें बांधिलें आहे. कित्येक भोळ्या बाया पुत्रप्राप्तीस्तव यास नवस करीत असतात. व एखादे वेळेस मनावर घेऊन नरसोबा त्यांची ती मनकामना पूर्णही करितो. ह्या देवस्थानास नवसांपासून दरसाल चार पांचशें रुपयांचें उत्पन्न होतें.

**हिराबागः**—चैनी रावबाजीनें हा बाग इंद्रिय सुखोपभोगार्थ निर्मिला होता. तो आपल्या नाना-तऱ्हेच्या विषयवासना या स्थळीं पूर्ण करीत असे. समयविशेषीं इंग्रजी पाहुण्यांस मेजवानी देणें झाल्यास तो समारंभही येथेंच (बागेतल्या वाड्यांत) होत असे.

लार्ड व्हालेनशिया साहेबांनीं त्या वेळीं एका मेजवानीचा आदर केला होता त्या संबंधानें त्यांनीं जी माहिती लिहून ठेविली आहे ती वाचून बाजी-रावाचे चैनी स्वभावाचा मासला दिसून येतो.

पूर्वींच्या मानाशीं ताडून पाहतां हल्लीं हा बाग यद्यपि निकृष्टावस्थेंत आहे तथापि अजूनही हें स्थळ रमणीय आहे. बागेंत सुंदर फुलझाडांचे ताटवेच्या ताटवे लागून गेले असून एके बाजूस मोठमोठे जुनाट वृक्ष आहेत. एके बाजूस पर्वतीचें तळें असून त्याचे कांठीं शहरचा 'टौनहॉल' आहे. व एकंदरीनें ह्या स्थळास फारच शोभा आली आहे.

**पर्वतीचें तळेंः**—कात्रजचें पाणी सोडण्याकरितां

बाळाजी बाजीराव पेशव्यानें इ. स. १७५० त हें तळें बांधिलें आहे. ह्यांत कात्रजचा नळ सुटलेला उघडपणें दृष्टीस पडतो. पर्वतीच्या नजीक असल्यानें यास 'पर्वतीचें' तळें असें ह्मणतात. तळ्याचे मध्यभागीं एक लहानसें टेंकाड आहे त्यावर गणपतीचें देऊळ असून त्यास सारसबाग असें ह्मणतात.

सदाशीवपेठेंत विठोबा, +खुन्यामुरलीधर, नरसोबा, सोटच्या ह्मसोबा, खजिनाविहीर, तुरकंद्र्चा व नानाचाबाग इत्यादि आणखी स्थळें असून लोकसंख्या ८,३६६ आहे.

---

+ ह्या मूर्तीची स्थापना होण्याच्या सुमारास नाना फडणावसांस ह्या सुंदर मुर्तीचा हव्यास उत्पन्न होऊन देवळाचा उत्पादक दादा गद्रे यांजपाशीं नानांनीं भिक्षुकी आरंभिली, पण तो डाव साधेना, सबब मूर्ति हिसकावून आणावी असा पोक्त विचार ठरवून अरब सोडले त्या गर्दींत कित्येक खून पडले, पण मूर्ति हातीं आली नाहीं ह्यावरून ह्या मुरलीधरास 'खुन्या मुरलीधर' असें संयुक्त नांव प्राप्त झालें—ही मूर्ती प्रसिद्ध कारागीर बखतराम ह्यानें घडविली आहे.


# प्रकरण चवथें.

## शहरा बाहेरील कित्येक स्थळें.

पुणें शहरा बाहेर जीं कित्येक स्थळें आहेत, त्यांपैकीं मुख्य हीं होत. ( १ ) पर्वती ( २ ) भांबुर्डें ( ३ पंचालेश्वर ( ४ ) गणेशखिंडीचा गणपती ( ५ ) चतुरशिंगी व ( ६ ) पाशाण ह्या प्रत्येकाचें वर्णन येणेंप्रमाणें:—

( १ ) **पर्वती**:—हें प्रसिद्ध व रमणीय स्थान शहरा नजीक एका उंचवट्यावर आहे. शहर—सपाटी पासून याची उंची २६१ फूट आहे. पर्वतीचा मूळ वृत्तांत असा:—

शाहुछत्रपतींनीं आपल्या अंतकाळीं मराठी राज्याचीं सर्व सूत्रें पेशव्यास वंशपरंपरेनें अर्पण केलीं. ( ब्राह्मणांस राज्यदानच केलें ह्मणण्यास हरकत नाहीं. ) व पेशव्यांनींही आपल्या ‘ भोळसर ’ स्वभावास अनुसरून, तें जड जूं स्वतंत्रपणें खांद्यावर घेण्याचें, ( ‘ स्वामीकार्य ’ जाणूनच कां ह्मणाना ? ) पतकरलें. तरी त्या वेळचे पेशवे हे अगदींच खाल्लच्या घरचे वांसे मोजणारे नव्हते, हें वाचकांनीं विसरतां कामा नये. बाळाजी बाजीराव मोठा धोरणी व तसाच राजनिष्ठही होता, हें सांगणें येथें अप्रासंगिक होणार नाहीं. त्यानें मराठ्यांच्या गादीचा मान योग्यपणें राखिला होता, व पुणें शहर आपलें मुख्य ठिकाण केल्यावर शिवा-




On Transfer by J. L. D'Silva

चित्रशाळाप्रेसपुणें जून१८८८

S. R. ᵉaek

जी महाराजांच्या पादुका या पर्वतीच्या टेंकडीवर आणून ठेवून त्यावर हें देऊळ बांधिलें होतें. पेशव्यांस वारंवार सातान्यास जाणें घडत नसे, सबब शिवछत्रपतीच्या पादुका हीच मराठ्यांची गादी अशा पूर्ण निष्ठेनें हमेषा इतकेंच नव्हे, तर प्रत्यही-या पादुकाचे दर्शनास जाण्याचा नियम त्यानें कधींही टळूं दिला नाहीं, व पुढील पेशव्यांनींही हाच परिपाठ कायम ठेविला होता.

पुढें रावबाजीच्या कारकीर्दींत ' विनाशकाले विपरीतबुद्धिः (अगर विपरीत चिन्हें-डोहळे-म्हटल्यास हरकत नाहीं. ) अशा सारखा कांहीं प्रकार होऊन पुण्य-नगरींत इंग्रजांची ' टोपी ' दिसूं लागली. बाजीरावानें, ह्या मराठ्यांच्या पादुकांस आह्मीं श्रेष्ठ ब्राह्मणांनीं काय ह्मणून पूज्य मानावें--त्याचें देव्हारें काय म्हणून माजवावें, असलें तत्वशास्त्र लढवून त्या पादुका तेथून दूर केल्या. * व त्या ठिकाणीं हल्लींची शिवाची मूर्ति स्थापन केली. असो. ही तरी मेहेर नजरच समजावयाची, नाहीं तर सहस्र भोजनांचा सपाटा व दक्षिणेचा रमणा चालू असल्यावर शिवाची मूर्तीच काय करावयाची आहे, असा कांहीं पोक्त विचार काढला नाहीं, हें एक भाग्यच समजावयाचें. या बाजीरायांना पूर्वोक्त उपाधिद्वया--वांचून इतर सर्व उपाधि शून्य व ईश्वरतिरस्कृत आहेत, असें वाटत असावें असा कित्येकांचा त्यांचे संबंधानें ग्रह आहे

*कित्येकांचे सांगण्यांत ह्या अजून शिवाच्या पिंडीखालीं आहेत.

ह्या देवस्थान संबंधानें दुसरी हकीकत प्रसिद्ध आहे ती अशी:—ह्या टेंकडीवर पूर्वीपर पर्वती नामक फार जुनी एक देवी होती, परंतु त्या वेळीं तिची इतकी प्रसिद्धि नसून जंगली लोकांच्या सुश्रुषेंत ती जंगलांत होती. हिचा पुजारी (गुरव) प्रत्यहीं टेंकडीवर जाऊन पूजा करून येत असे. बाळाजी बाजीरावाच्या स्त्रियेनें मोतीबागेंतून एके दिवशीं सहज पाहिलें, व त्यास बोलावून आणवून त्यास विचारितां, त्या भोळ्या म्हाताऱ्यानें मोठ्या नम्रतापूर्वक आपल्या देवीची हकीकत निवेदन केली, व 'ती नवसास हटकून पावते' असेंही सांगितलें. श्रीमंताच्या स्त्रियेच्या पायास इसबाची व्यथा होती ती दूर होण्यास त्यांनीं देवीस नवस केला, व ती पुढें दूर झाली. यावरून कसब्यांतील गणपतीप्रमाणें ही देवीही राजाश्रयास पात्र झाली! त्या नंतर पर्वतीचें देऊळ बांधून नैवेद्य वगैरे खर्चा करितां पेशव्यांकडून नेमणूक सुरू झाली, व खुद्द पेशवे एकादशीस जाऊन पूजा करूं लागले.

पर्वतीच्या देवळांत जी शिवाची मूर्ति आहे, ती चांदीची असून तिचें वजन २ मण आहे. शिवाचे एके मांडीवर पार्वती व एके मांडीवर गणपती अशा

---

१ टीप—ह्या देवळास शके १६७२ सालीं प्रारंभ होऊन शके १६७६ त काम पुरें झालें. [मंतप्रध न यांची शकावली.]

The chief temple is said to have been erected about the year 1749, and was 6 years in building costing about £ 1,00,000 ( *Watsons' Guide of Poona and Kirkee.* )

दोन मूर्ति आहेत, त्या सोन्याच्या असून त्यांचीं वजनें अनुक्रमें ११०० व ९०० तोळे आहेत. देवांस जडावाचे—मोत्यांचे बहुमोल दागिने पुष्कळ आहेत, ते केव्हां केव्हां बाहेर काढितात.

पर्वतीचें पूर्वींचें देऊळ फारच सुरेख होतें, पण इ० स० १७९१ सालीं ( शके १७१३ विरोधीनाम संवत्सरीं वैशाख शुद्ध १ ) स तें वीज पडून जळून गेलें. सुदैवानें मूर्तीस मात्र इजा पोंहचली नाहीं, असें सांगतात, परंतु पुढें इ० स० १८६७ च्या आगस्त महिन्यांत पुजाऱ्याच्या हातून मुगुट पडून देवाचा हात मोडला आहे.

बाजीरायाचे अमदानींत पर्वतीवर व पायथ्याशीं दरसाल मोठ्या थाटानें दक्षिणेचा रमणा होत असे. सांप्रतच्या सुधारणेच्या तत्वास अनुसरून त्यांच्या दातृत्वाची दिशा यद्यपि चुकलेली ठरली तरी त्याचें दातृत्व वर्णन करण्यासारखें होतें हें निर्विवाद आहे व वेदविद्या मध्यंतरीं उत्तेजन पावण्यास व ती पोसली जाण्यास त्याची दक्षिणा जीवनरूपानें कारण झाली हेंही खास आहे. ही दक्षिणा बहुधा विद्वान् ब्राह्मणांस त्यांच्या योग्यतेनुरूप मिळत असे. *

* हल्लीं ज्या प्रमाणें युनिव्हर्सिटीच्या परीक्षेच्या सांगते समयीं 'कानव्होकेशन्' समारंभ होतो व चान्सलेतर साहेबांच्या हातें 'पदवी—दान' होत असतें तद्वतच पूर्वीं ही वेदविद्येची परीक्षा होऊन योग्यतेनुरूप हें दक्षिणादान' होत असे.

ही चाल प्रथमत: तळेगांवचे दाभाडे त्र्यंबकराव यांनीं सुरू

( पुढील पृष्ठ पहा )

श्रावणामध्यें हा रमणा चालू असतां एके दिवशीं बाजीरायाशेजारीं एक इंग्रेज उभा होता त्यानें आपले ग्रंथांत ह्या बद्दल लिहून ठेविलें आहे. तो ह्मणतो:—

" मी ह्या रमण्याचे पांचवे दिवशीं हजर होतों. सर्व महाराष्ट्र, गुजराथ व तैलंगण देशांतील सुमारें ४०,००० वर ब्राह्मण जमलेले त्या समयीं मला दिसले. हे सर्व ब्राह्मण रमण्याचे पटांगणांत कोंडून टाकिले होते. त्यांच्यावर त्यांच्या त्यांच्या विद्वत्तेचे सूचक शिक्के मारिले होते. पहिल्या प्रतीस एक हजाराचा तोडा मिळत असून शेवटची प्रत पांच रु० ची होती. ब्राह्मणांस बाहेर सोडण्याकरितां पांच दरवाजे खुले असून पहिल्या दरवाजांत खुद्द बाजीराव दुसऱ्या दरवाजांत नाना फडणवीस तिसऱ्यांत चिमणाजी आप्पा व चौथ्या दरवाजांत अमृतराव ह्याप्रमाणें उभे असून त्यांच्या सन्निध रुपयांचा ढीग घातला होता. हे रुपये एकदमच पाण्यानीं भिजवून टाकिले होते. ही दक्षिणा चारी दरवाजांतून शिक्के पाहून ओंगराळें ओंगराळें भरभरून देत होते. हे चारी दरवाजांतील चारी धर्मात्मे सायंकाळचे सहा वाजतां बसले होते ते रात्रीं दहा

---

[ मागील पृष्ठावरून. ]
केली होती. दाभाडा ठार झाल्यानंतर ही दक्षिणा पेशव्यांनीं आपणाकडे घेतली, तथापि एक किंवा दोन वेळा खेरीज करून शेवटचे बाजीरावाचे हातांत महाराष्ट्राची लगाम येईपर्यंत 'दक्षिणेचा' इतका कळस झाला नव्हता. या बाजीरावानें तर भटभिक्षुकांस दक्षिणा दे–देऊन नको—नकोसें केलें.

वाजेतों संपत्तीचे मोठमोठाले पांच लक्षांचे ढीग घटसारे भिक्षुकांचे पदरांत टाकून चालते झाले "

रमण्याचे ब्राह्मण सुटले ह्मणजे सर्व पुण्य–नगरी अगदीं फुलून जात असे. ह्या ब्राह्मणांची व शहरवासी जनांची मौज पाहण्यास झुंडींच्या झुंडीं उभ्या असत. कित्येक भाविक गृहस्थ ह्या ब्राह्मणांस पूज्य मानून रस्त्यांत हात जोडून उभे असत. व ब्रह्मवृंद रस्त्यांतून चालला कीं, 'महाराज स्वयंपाक तयार आहे. सर्व सिद्धता आहे' अशी त्यांची प्रार्थना करीत. कित्येक हलकट लागलेच विचारीत कीं, 'जेवावयास काय घालशील' त्यानें साध्या जेवणाचें नांव घेतलें कीं, 'ह्मशीस अंबोण घाल' असें ह्मणून चालते होत!

हल्लीं पर्वतीवर जो एक मोडका तट व महाल आपणांस दिसतो तो श्री॰ रावबाजीनें बांधण्यास सुरवात केली होती; या गाजीचा असा विचार होता कीं, 'पर्वतीवर मोठा महाल बांधावा—सभोंवतीं भक्कम कोट करावा—बुरूज करावे–तोफा लावाव्या–बाहेरून नग्न पहारा ठेवावा व या प्रमाणें कडेकोट बंदोबस्त राखून हें स्थळ अगदीं निर्धास्त करावें–ह्मणजे आंत राहून आपणांस खुशाल मजा मारितां येईल.' ह्या भीरूभटाचा असा निश्चय

---

१ असा रमणा शके १६८० (सन १७५९) या वर्षी बाळाजी बाजीराव पेशवे, यांनीं केला. त्याविळीं ८० हजार ब्राह्मण हजर होते. त्यांस १६ लक्ष रुपये पेशव्यांनीं देकार दिला.

होता खरा पण तो शेवटास न जातां त्याची ग्रहदशा फिरली व इ० स० १८१६ पर्यंत कांहीं काम पुरें झालें होतें इतक्यांत वीज पडून त्याचा शेवटही याच सालीं झाला.

पर्वतीवर जाण्यास १०८ पायऱ्या असून त्यांवर आंकडे टाकले ( खोदले ) आहेत, ह्यांस पायऱ्या ह्मणण्या पेक्षां 'पायरेश्वर' हें ( संयुक्त मिश्र नांव बरें शोभेल ! एक सारखें वर चढूं लागलें असतां पाय भरून येऊन मनुष्य अगदीं थकून जातो. परंतु असें ( एक सारखें समोर ) न जातां वांकडें वांकडें ( एका पायरीचे एका टोंका कडून तिच्या लांबीनें दुसऱ्या पायरीच्या दुसऱ्या टोंकास या प्रमाणें कुटिल गतीनें ) गेल्यास मनुष्य तितका थकणार नाहीं हें उघड आहे.

तेथें गेल्यावर शहराचा सर्व बाह्य देखावा एकसमयावच्छेदेंकरून नजरेस पडून फारच मौज दिसते. व थंड गार वारा लागून हुशारी येते व श्रमाचा परिहार होतो. कित्येक शोकी गृहस्थ हवा खाण्यास हमेष पर्वतीवर येत असतात.

मुख्य देवळा शिवाय या ठिकाणीं विष्णु व कार्तिकस्वामी यांचीं देवालयें फारच सुंदर आहेत. पेशवाईंत पर्वती संस्थानाकडे मनस्वी रकम खर्च पडत असे या मुळें तो थाट अवर्णनीय होता, तो प्रकार हल्लीं नष्ट होऊन देवस्थानाकडे वंशपरंपरेनें चालत आलेले पुजारी—शागीर्द—पहारेकरी—गवय्ये—वाजंत्री—फुलारी—पोशाखे—आचारी—पाणके

—खटपटे—इतके लोक मात्र आहेत. देवस्थानचा एकंदर खर्च दरमहा १५०० रुपये पर्यंत असून यांतूनच येथल्या इतर निरनिराळ्या देवस्थानांकडे ( मागील प्रकरणांत दर्शविल्या प्रमाणें ) नेमणुकी-च्या रकमा विभागल्या जात आहेत !

( २ ) **भांबुर्डें**:—भांबुर्डें हें एक स्वतंत्र वाटणारें खेडें असून त्याचें वर्णन पुण्याचे पुस्तकांत कां? हा एक प्रश्न कित्येकांस सहजीं येणार आहे. त्याचें उत्तर इतकेंच कीं, हें खेडें जरी वेगळें असलें, तरी या पुण्य-नगरीचे सन्निकर्षानें हें अगदीं तद्रूप होऊन गेलें आहे. मध्यें मुठा नदी आहे इतकाच काय तो द्वैतभाव उरला आहे तरी तिजवरून पूल बांधिला असल्यामुळें तो द्वैतभावही शिथिल झाला आहे.

रावबाजीच्या कारकीर्दींत होळकराच्या छाव-णीचा तळ येथेंच ( भांबुर्ड्यांत ) असे. प्रसिद्ध मल्हा-रराव होळकराचे मरणा नंतर त्याचा पुत्र तुकोजी हा आपल्या बंधुत्रयांसह येथेंच येऊन राहिला होता. पुढें रावबाजीनें ह्या होळकर घराण्याचा अंमल कमजोर पाहून शिंद्या करवीं तुकोजीचा नाश करविला. व पुढें १८०१ या वर्षी विठोजी होळकर यांस भांबुर्ड्यांत एकाचे घरांत धरून राव-बाजीनें त्यास हत्तीच्या पायीं बांधून क्रूरपणानें ठार मारिलें.

हल्लीं ह्यांत लोकवस्ती ३१२० ची असून गुरुवार व रविवार—दिवशीं गुरांचा बाजार भरतो.

( ३ ) **पंचालेश्वरची गुहा**:—पंचालेश्वर हें सां-

याचें देऊळ भांबुर्ड्या नजीक एका गुहेंत आहे. हें पांडव-कृत्य समजून ह्यास 'पांच पांडव' असेंही कोणी ह्मणतात. पंचालेश्वर ह्या नांवा पासून तरी हाच अर्थ ध्वनित होतो. एक मोठा भव्य खडक खोदून त्यांत हें देऊळ केलें आहे. बाहेरून पाहिलें असतां देवळाचा कोठें मागमूस लागत नाहीं, पण आंत गेल्यावर तो विस्तृत सभामंडप पाहून फार आश्चर्य वाटतें! ही गुहा पाहण्यास प्रथम आह्मीं गेलों तेव्हां ते जंगी खांब वगैरे अवजड काम पाहून आह्मांस विजापूरच्या जुम्मा मशिदीची आठवण झाली.

भूमीच्या सपाटी पासून देवळा पर्यंत जाण्यास सुंदर पायऱ्या केलेल्या आहेत, त्यांवरून आंत गेल्याबरोबर सकृद्दर्शनीं एक नंदी दृष्टीस पडतो. नंदीच्या वरच्या भागीं सुमारें १२ फूट उंचीचा एक दगड कोरून त्याचे सभोंवार मोठे खांब केलेले आहेत. ह्या खांबासभोंवतीं जीवंत पाण्याचा एक वर्तुलाकार खंदक आहे. हा नंदी व एकंदरीचा मुख्य खडक हे जरी वेगवेगळे दिसतात तरी पूर्वीं त्यांचा एकच जीव असावा; तसेंच नंदीच्या सभोंवार एक असाच दगडी मंडप असावा असें मानण्यास पुष्कळ आधार आहे. नंदीच्या उजव्या बाजूस खडक खोदून एक शानदार विहीर केलेली आहे, तिला आंत जाण्याकरितां पायऱ्याही आहेत, तींत पाणी भरपूर असतें

तेथून पुढें गेल्यावर देवळाचा सभामंडप लागतो.

तेथें जातांच आपण एकाद्या देवळांत जाऊन उतरलों आहों असा भास होतो. पण सभोंवार व वरती नजर फेंकावी तेव्हांही एक गुहा आहे अशी खात्री होते. व या आर्य लोकांची पाठ थोपटावी अशी वांच्छा उत्पन्न होते! ह्याची लांबी रुंदी अनुक्रमें ८६ व ६६ फूट असून उंची १२ फुटांहून जास्त आहे! ह्यास आडवे उभे मिळून २२ खांब आहेत. खांबाची प्रत्येक बाजू साडेचार फूट आहे. व प्रत्येक दोन खांबांच्यामध्यें अंतर सुमारें ८ फूट आहे.

देवालयाच्या मधल्या गाभाऱ्याची लांबी रुंदी अनुक्रमें ३०.व १८ फूट आहे. या गाभाऱ्यांत तीन भाग केलेले असून मधल्यांत सांबाची, एकांत देवीची व एकांत गणपतीची याप्रमाणें मूर्ती आहेत. सांबाचे मुर्तीशिवाय दुसऱ्या दोन मुर्ती यांची योजना मूळची नसून त्या मागून स्थापिल्या असाव्या; तसेंच वरती ज्या नंदीचें वर्णन केलें त्या खेरीज या सांबाचे समोर दुसरा एक लहानसा नंदी दृष्टीस पडतो त्याची स्थापनाही मागाहूनच झाली असावी, असें मानण्यास पुष्कळ जागा आहे.

जगन्नाथ शंकरशेट यांचा मुक्काम पुण्यास असतांना त्यांनीं ह्या देवालयाचे साफसफाईकडे बरीच रक्कम खर्च करून भिंतीवर रंगी बेरंगी अनेक चित्रें काढिलीं आहेत. हें स्थळ पुण्याच्या एका बाजूस असल्यामुळें त्याकडे पुणेरी लोकांचें दुर्लक्ष्य असावें असें दिसतें. व याची सांप्रतची

निकृष्टावस्था हीच या गोष्टीची साक्ष ह्मटल्यास चिंता नाहीं. ह्या गुहेच्या आजूबाजूस खडक फोडून इमारती–दगड काढून नेत असतात. ह्या संबंधानें बिचाऱ्या गुहेस दगा प्राप्त न होवो ह्मणजे झालें ! !

(४) **गणेशखिंडींतील गणपती:**—गणेशखिंड हें नांव या गणपतीवरूनच पडलेलें दिसतें. हा गणपती चतुरशिंगीच्या पायथ्याशीं आहे. ह्याची स्थापना शिवरामबोवा चित्राव यांनीं केली असून देऊळही त्यांनींच बांधिलें आहे. देवळाचे आजुबाजूच्या सर्व इमारतींचा भाग मोडलेला व पडलेला दिसतो. देऊळ लहानच असून आवारांत पुजारी वगैरे यांस रहाण्यास जागा आहे. आंत एक विहीर आहे, तिच्या पायऱ्या पडक्या झाल्या असल्यामुळें त्या मुळींच बंद करून टाकिल्या आहेत. देवळाचा पुढील सभा-मंडप माधवराव बर्वे ह्यांनीं नवीन बांधिला आहे. देवस्थानची नेमणूक सरकारांतून दरमहा १८१३ आहे.

(५) **चतुरशिंगी:**—हें स्थान पुण्याचे उत्तरेस सुमारें तीन मैलांवर एका टेंकडीवर आहे. हिची पूर्वीची हकीकत लोकांत प्रसिद्ध आहे ती अशी:—

पुण्यांतील कोणी दुल्लभशेट नामक श्रीमंत पेढीवाल्याचा दरसाल सप्तश्रृंगीच्या यात्रेस जाण्याचा नियम असे. सृष्टिक्रमानुसार शेटजी वार्धक्यावस्थेस पोंहचले तरी त्यांनीं आपला पायीं जाण्याचा

१ ओंकारेश्वराचें वर्णन पृष्ट ७२ पहा.

नियम चालविला होता; या मुळें ती यात्रा त्यांला मरणोन्मुख करीत असे. एके दिवशीं देवीचा दृष्टांत झाला कीं, 'अमुक ठिकाणीं ( माचीस ) मी तुझ्या संनिध वास करितें तेथें येत जा' त्यापासून चतुरशिंगीची येथें स्थापना झाली.

वर चढून जाण्यास सुंदर पायऱ्या आहेत. डोंगरावर व खालीं एक दोन पाण्याचीं कुंडीं आहेत. डोंगरावरून दूरवर मुळा मुठा नद्यांचा सर्पासारखा विकृताकार नजरेस पडतो. तसेंच एकीकडे नजर फेंकावी तों गर्द झाडी व तींतून कित्येक देवालयांचीं तेजःपुंज शिखरें डोकावून पाहत आहेत असा भास होतो; व दुसरीकडे लांबच लांब सपाट माळ—मधून मधून हिरवीगार शेतें दिसत असून, क्षितिजाजवळ लहान लहान असंख्य टेंकड्या असा कांहीं मजेचा देखावा नजरेस पडतो.

देवीची दरसाल नवरात्रांत यात्रा भरत असते, तेव्हां तर माणसांचा एकसारखा लोट चाललेला दिसतो. तो बहारीचा प्रकार आमच्या मराठी तिसऱ्या पुस्तकानें पोराबाळांच्या देखील ओळखीचा करून दिला असल्यामुळें आह्मी आपली जागा अडवून वाचकांस कंटाळा आणीत नाहीं.

( ६ ) पाषाण:—हें खेडें पुण्याचे वायव्येस चार मैलांवर व चतुःशिंगीच्या डोंगराचे पश्चिमेस दोन मैलांवर आहे. ह्या खेड्यांतील लोकवस्ती सुमारें हजारा जवळ जवळ आहे. पाषाणचें ( सोमेश्वराचें ) देऊळ फार प्रसिद्ध असून तें या

खेडच्यापासून सुमारें एक मैलाचे अंतरावर आहे. त्या ठिकाणास 'देऊळवाडा' असें ह्मणतात. ह्या देवळाकडे जातांना देवळाचे सान्निध गर्द आंबराई लागते. झाडांस मोहर आला ह्मणजे सभोंवतालचा प्रदेश सुगंधानें अगदीं भरून जातो. असो. झाडांतून पुढें जावें तों देवळाच्या सभोंवतालची भिंत व दरवाजा दृष्टीस पडतो. त्या दरवाजानें आंत गेल्यावर पुढें एक मोठी दीपमाळ दृत्त करून उभी असलेली दिसते. देवळांत जावें तों देवाचा गाभारा भूमीच्या सपाटीपासून एक पुरुष खोल असलेला दृष्टीस पडतो. त्यांत अगदीं अंधार आहे, तरी मोठमोठ्या समया अष्टौप्रहर जळत असल्यानें प्रेक्षकांस पंचाइतींत पडण्याचें कारण नाहीं. एके अंगास मुळानदी झुळझुळ वहात असून तेथेंच पुष्करणी बांधिली आहे (हीस 'चक्रतीर्थ' असें ह्मणतात.) व नदीचें पाणी ह्या पुष्करणींत सोडिलें आहे, व सभोंवार घाट बांधिले आहेत. येथें शिवरात्रींत मोठी यात्रा भरते तेव्हां ह्या तीर्थांत स्नान करण्यास बहुतेक पुणें लोटलें असतें. येथील प्रदेशाचा देखावा मोठा रमणीय आहे. जिकडे पहावें तिकडे सह्याद्रीनें आपलीं उंच शिखरें मोठ्या डौलानें वर काढलेलीं दिसतात.

ह्या देवालयाचे नजीकच एक बाग आहे. तिचें सालीना उत्पन्न सुमारें दीडशें रुपये आहे.

---

१ शके १६७६ [इ० स० १७५५] या वर्षी हीं झाडें बाळाजी बाजीराव ह्यांनीं लाविलीं (पेशवे यांची सालवार कारकीर्द.)

देवाचे सुस्तुशे करितां दोन पुजारी ( एक बाळाजीनाईक कळकर यांजकडून व दुसरा चित्राव यांजकडून ) आहेत. व देवालयावर सर्व मालकी चित्राव यांचीच आहे. शिवरात्रीचे उत्साहा प्रीत्यर्थ सरकारांतून ११००रु० ची नेमणूक मिळते. ह्या देवस्थाना संबंधानें पूर्व वृत्तांत असा आहे कीं, सुमारें सत्राव्या शतकांत ह्या पाषाण खेड्याजवळ बहुतेक लिंगाइतांचीच वस्ती होती, व ते गुरेंढोरें बाळगून आपला निर्वाह करीत. त्यापैकीं एका वाणीअप्पाची गाय असे. ती धन्यास दूध न देतां ह्या ठिकाणीं पूर्वीं जी झाडी होती त्यांतील एका वारूळाजवळ येत असे. वारुळांतून एक सर्प निघून तें दूध पिऊन जाई. हा क्रम बरेच दिवस चालला तेंव्हां दुधाचें होतें तरी काय ? याचा तलास लावितां त्यानें तो सर्व प्रकार अवलोकन केला. पुढें तें वारूळ खणून पहातां आंत स्वयंभू पांच लिंगें सांपडलीं. ही वार्ता सर्व–तो–मुखीं होतां होतां छत्रपती शाहूमहाराजांपर्यंत गेली व नंतर महाराजांचे मातुश्रीनें ह्यावर देऊळ बांधविलें. हल्लीं जें आपण जुनाट देऊळ पहातों तें हेंच. पुढील मंडप हा इ० स० १७८० या वर्षीं शिवराम बोवा चित्राव

१ टीप—ओंकारेश्वराचे वर्णनांत जें चित्रावांचें नांव आलें आहे तें हेच शिवरामबोवा चित्राव. ह्यांस भूमीगत पुष्कळ द्रव्य सांपडलें. त्यांनीं तीन देवळें बांधिलीं, ( १ ) ओंकारेश्वर, ( २ ) गणेशखिंडींतील गणपती [ ही गणपतीची मूर्ति ज्या ठिकाणीं द्रव्य सांपडलें तेथलीच पाषाणाची मुद्दाम करविली असल्याचें सांगतात ] व ( ३ ) पाषाण ( सोमेश्वर. )

ह्यांनीं बांधिला आहे. थोरले माधवराव ह्यांचे कारकीर्दीत जो मोठा दुष्काळ पडला होता तो या सोमेश्वराचे कृपेनें दूर झाला तेव्हां पासून पेशवे-सरकारांनीं देवालयाकडे दरसाल ३३०० रु० ची नेमणूक करून दिली. हल्लीं सोमेश्वरास भररक्कम न मिळतां कालमानाप्रमाणें तिची तिजाई (११००) रु० मात्र मिळते, असा वरतीं उल्लेख आलाच आहे. ह्या तिजाईतलाच कांहीं हिस्सा ओंकारेश्वर खात असेल असें वाटतें.

# प्रकरण पांचवें.

## शहर रचना इ०.

**पाण्याचा पुरवठा**—पुणें शहरांत जशी पाण्याची सुबत्ता आहे, तशी सुबत्ता अवघ्या हिंदुस्थानांतील दुसऱ्या क्वचितच शहरांत असेल. हें पाणी एकंदर पांच वेगवेगळ्या ठिकाणांपासून शहरास मिळत आहे. (१) खडकवासल्याचें पाणी, (२) कात्रजचें पाणी, (३) रास्ते यांनीं आणिलेलें पाणी, (४) नानाफडणविसांनीं बांधून आणिलेलें पाणी, (५) व चौधरी यांनीं आणिलेलें पाणी. शिवाय शहरांत एकंदर १२९० विहिरी आहेत त्या वेगळ्याच. यांतील कित्येक विहिरी मालकांनीं बंद करून टाकिल्या आहेत. याचें कारण, खडकवासल्याच्या पाण्यानें लोकांस आळशी केलें हेंच होय! सर्व शहरांत एकंदर ८४ हौद असून सार्वजनिक उभे असे नळ ७५ आहेत. खेरीज घरोघरीं स्वतंत्र नळ कैक लोकांनीं घेतले आहेत, ते वेगळेच. वर सांगितलेल्या पांच ठिकाणांतून प्रत्यहीं १५ लक्ष ग्यालन पाणी खर्च होतें, असा अजमास केला आहे. त्याचा तपशील येणेंप्रमाणें:—

| | | | |
|---|---|---|---|
| (१) खडकवासल्याचें | पाणी | ग्यालन | ६५०००० |
| (२) कात्रजचें | ,, | ,, | ६५०००० |
| (३) रास्ते यांनीं आणलेलें | ,, | ,, | ५०००० |
| (४) नानांनीं | ,, | ,, | १०००००० |
| (५) चौधरी | ,, | ,, | ५०००० |
| | | | १५०००००० |

( १ ) **खडकवासला**[1]—ह्या पाण्याचा दरदिवस दहा लक्ष ग्यालनवर कधींही खर्च होणार नाहीं, असा म्युनिसिपालिटीचा अंदाज आहे. ह्या पाण्याकरितां दरसाल १०००० रुपये कमेटीस सरकारचे पदरांत टाकावे लागतात. त्याचा करार असा झाला आहे कीं, जर रोज ७॥ लक्ष ग्यालनवर खर्च झाला, तर जितकें जास्त पाणी खर्च होईल, त्यास दरहजार ग्यालनं मागें तीन आणे सरकारास द्यावे.

(२) **कात्रज**—हा तलाव पुण्याचे दक्षिणेस सात मैलांवर आहे. हा इ० स० १७५० या वर्षी बाळाजी बाजीराव ह्यांनीं बांधिला आहे. ह्या तलावाकडे जातांना जिकडे तिकडे पर्वतीच्या पैलवर बागबगीचे, आंबराई, गर्द झाडी व पर्वताचीं उंच उंच शिखरें असा मनोहर देखावा नजरेस पडतो. पुढें दोन तीन मैल जमीन चालून गेलें ह्मणजे दूर एका उंच शिखरावर सिंहगड दृष्टीस पडतो, त्याकडे दृष्टि फेंकली असतां व त्याचे पूर्वीचे गुण आठविले असतां मोठा विस्मय वाटतो. ज्या सिंहगडानें मराठे शाईत प्रतापी शिवाजी महाराजांस विजयी केलें, ज्यानें शिवाजीचा महान् योद्धा तानाजी मालुसरे ह्याचें शरीर आपल्या पोटांत घेऊन त्याचा भाऊ सूर्याजी यास यश दिलें, ज्यानें आपलें नांव शिवाजी पासून बदलून "सिंहगड" असें नवें नांव

[१] ह्या तलावाची माहिती अर्वाचीन पुणें भाग २ यांत दिली आहे.

धारण केलें, ज्यानें महान् महान् म्लेंच्छ वीरांस पादाक्रांत करून आपल्या विक्राळ शरीरानें त्यांची छाती फाडावयास लाविलें, ज्यानें मावळी शिपायांस व त्या बरोबर महान् शिवछत्रपतीस अनेक प्रसंगीं आश्रय दिला, अशा त्या भाग्यशाली गडाचे गुण आठवून व त्या सिंहगडाची सांप्रतची शोचनीय स्थिति पाहून व ऐकून खरोखर विचारी पुरुषाचें हृदय पोळल्या वांचून कदापिही रहावयाचें नाहीं ! असो.

ह्या तलावापाशीं एका बाजूस साताऱ्चे मेल टांग्याचा टप्पा असून दुसरे एके बाजूस उंचवट्यावर एक लहानसा जीर्ण बंगला आहे. कात्रज हें तळें डोंगरांत नसून एका उंचवट्यावर आहे. हें ठिकाण व हा पाण्याचा झरा ज्यानें शोधून काढला असेल त्याची तारीफ केल्याशिवाय रहावत नाहीं. ज्या ठिकाणीं झरे अडविले आहेत, त्या ठिकाणीं एक तळें केलें आहे. हें तळें कात्रच गांवाजवळ आहे. ह्या तळ्यास एक जब्बरा बांध घालून खालीं एक पाण्याची मूस केली आहे, त्यांतून पाणी उसळी सरसें धबधब खालीं पडतांना दिसतें. दुसरा झरा ह्या तळ्याचे वरील अंगास एका ओढ्यांत आहे. ह्या ओढ्यास आजूबाजूस पाण्याचा टांक दृष्टीस पडत नाहीं, पण एके जागीं जमिनीचे खालून पाणी येतें, त्या पाण्यास मूस बांधून व पुढें एक जंगी आडवी भित बांधून, त्यांतून बाहेर काढिलें आहे. वर सांगितलेल्या तळ्याचें पाणी व हें पाणी एके जागीं मिळून वहात खालीं

बऱ्याच अंतरावर जाऊन एक सुमारें साडेपांच एकर जमिनीचें तळें आहे त्यांत जातें. व येथेंच पाण्याचा सांठा होतो. ह्या मुख्य तळ्यास एक दगडी मजबूत बांध घातला असून त्याची लांबी १००० फूट असून उंची ४० फूट आहे. व पाण्याची साधारण मानानें खोलीही ४० फूटच आहे. तळ्याचे वरील अंगास मोठा पाट काढून त्यांतून एके बाजूस ओढ्यास बाहेर काढून लाविलें आहे. ह्या दोनही तळ्यांचे आजूबाजूस गर्द अंबराई आहे. खालच्या तळ्याचे समीप नारळीचीं भुनाट झाडें आहेत. पेशव्यांचे वेळीं येथें सुंदर बाग असून पेशवे ह्या ठिकाणीं हवाखाण्या करितां वारंवार येत असत असें सांगतात. खालचे तलावाचे बांधास एक सहा इंचांचें छिद्र आहे. त्यांतून धबधब्याप्रमाणें पाणी पडून तें नळांत जातें. ह्या पाण्याची गति एका सेकंदांत ३ ग्यालन इतकी आहे. पाणी नेणारा नळ मजबूत विटांनीं बांधिला असून कमानदार आहे. ह्याची रुंदी अडीच फूट आहे, उंची सहा फूट आहे व लांबी सुमारें चार मैलांवर आहे. ह्यातून एक माणूस सहज चालत जाईल. भ.च्या मारुती नजिकचे शिळोप्याच्या वेळीं गटारबातम्या झोंकणारे झोरके असें सांगतात कीं, ' एका माणसानें घोड्यावर बसावें, हातांत भाला घ्यावा आणि ह्या नळांतून खुशाल घोडा उडवीत जावें, इतका हा विस्तृत आहे. ' असो.

ह्या नळास प्रत्येक शंभर यार्डांवर उसास (उच्छ्वास) केले आहेत. असे उसास सुमारें ७० आहेत. ह्यांची उंची नळाखालीं सुमार दहा फूट आहे. व हे विहिरी प्रमाणें ओंड झाले आहेत. ह्यांतही कांहीं झरे आले आहेत. त्यामुळें कांहीं ठिकाणीं पाणी फार जोरानें वहातें.

ह्या तळ्यांत सध्या गाळ पुष्कळ सांठला असल्यामुळें कांहीं झरे बुजून गेले असावेत असा सुमार दिसतो. ह्याची दुरुस्ती करण्याचें कमिटीनें मनावर घेतल्यास, ह्या तळ्यापासून विशेष उपयोग होणार आहे.

(२)रास्ते यांचा नळ—पुण्याचे नैऋत्येस सुमार सात मैलांवर थोरलें कोंडवें आहे, तेथून हा नळ बांधून आणिला आहे. एखादा अजाणता गृहस्थ ह्या नळाच्या उगमाची चौकशी करण्यास गेला असतां प्रथम धाकट्या कोंडव्यांतच तो गोंधळून जातो, व शेतकरी लोक बहिरोबाच्या नाल्यासन्निध ज्या विहिरी आहेत, त्यांकडे त्याला बोटें दाखवितात. परंतु हें त्यांचें ह्मणणें विश्वसनीय नसल्यामुळें त्या विचाऱ्यास पुढील मार्ग क्रमावा लागतो. जेव्हां लष्करांत पाण्याचें दुर्भिक्ष होतें, त्यावेळीं ह्या विहीरी सरकारानें बांधून त्यांतील पाणी लष्करांत नेत होते. थोरल्या कोंडव्या पासून सुमार दोन मैलांवर हें पाणी बहिरोबाचे नाल्याचा उगम आडवून तेथून बांधून रास्ते यांचे वाड्यांत सोडिलें आहे. ह्या नळाचा मार्ग बहिरोबाचे नाल्याचे काठानें शि-

द्याचे छत्रीपर्यंत आणिलेला दिसतो, व पुढें जशी सखल जमीन सांपडेल तसा हा नळ खळखळ आवाज करीत जातो. ( नकाशा पहा. ) हा नळ नवइंचाचे पोकळीचा आहे. ह्याचें बांधकाम फारच मजबूद असून दर शंभर यार्डांवर उसास केले आहेत. हें पाणी बांधून आणण्यास रास्त्यांस असूकच खर्च झाला असें नक्की सांगतां येत नाहीं. कारण, वाडा, नळ, व लक्ष्मीश्वराचें देवालय मिळून नवलाख रुपये खर्च झाला असा लेख सांपडतो. पेशवाई बुडाल्यापासून पुढें साठ वर्षें ह्या नळाचें पाणी इंग्रजसरकार लष्कराचे पाण्याचे पुरवठ्यास घेत होतें. पुढें खडकवासल्याचें पाणी जिकडे तिकडे खेळूं लागलें तेव्हां पासून हें बंद केलें. ह्या पाण्याबद्दल सरकार दोन लाख रुपये रास्त्यांस देत होते, पण तें रास्त्यांनीं घेण्याचें नाकारिलें, ह्मणून सरकार सुप्रसन्न होऊन, ज्यावेळीं रास्त्यांस पाण्याची कमतरता होईल त्यावेळीं रोज दहा हजार ग्यालन पाणी रास्त्यांस द्यावें असा योग्य ठराव सरकारानें केला.

हल्लीं ह्या नळाचें पाणी रास्ते पेठेंत लक्ष्मीश्वराचे देवळा समीप दृष्टीस पडतें, व रास्ते यांचे वाड्यांत तर जिकडे तिकडे पाणी खेळविलेलें दिसतें. ह्या वाड्यांत लहान मोठे हौद केले आहेत, पैकीं एक हौद मुख्य इमारतींत आहे. ह्याचे बुडाशीं तांब्याचा मजबूत पत्रा बसवून त्यांत पाणी सोडिलें आहे, व ह्या पत्र्याचे खालीं भुयाराप्रमाणें मोकळी जागा असून त्यांत अग्नी पेटविण्यास स्थळ केलें

आहे. जेव्हां हजार पांचशें माणसें उष्णोदकानें स्नान करण्याचा प्रसंग येई, तेव्हां हा हौदच उष्ण करून लोकांस मनमुराद पाणी स्नान करण्यास मिळे ! ! !

( ४ ) **नानाफडणविसांचा नळ**—हा नळ नानांनीं सन १७९० या वर्षीं पुण्याचे दक्षिणेस सुमार सहा मैलांवर नरेहअंबेगांव ह्मणून खेडें आहे तेथून आणिला आहे. हा एका विहिरींतून बांधून आणिला आहे. ह्याचें पाणी पुष्कर्णी व सदाशीव पेठेच्या हौदांत सोडिलें आहे. ह्याचें बांधकाम सर्व कांहीं रास्ते यांचे नळाप्रमाणें आहे.

( ५ ) **चौधरी यांचा नळ**—हा नळ धाकटें कोंडवें येथून बांधून आणून चौधरी यांचे हौदांत सोडिला आहे. ह्या पाण्याचा उगम कोठें दिसत नाहीं. तो दडवून टाकिलेला दिसतो. इतर नळांप्रमाणें ह्याचीही बांधणी आहे.

**रस्तेः**—पेशवाईंतील कांहीं रस्ते फरसबंदी केले होते, व त्यांचा बहुतेक भाग अगदीं घाणेरडा व मलीन होता. हे रस्ते मुळीं अरुंद असून ज्यानें त्यानें आपआपल्या घरापुढें लहान मोठे ओटे बांधिले असल्यामुळें अगदींच अडचणीचे होऊन गेले होते. प्रत्येक रस्त्यास एक एक दरवाजा ( वेस ) असून तो रात्रीं भांबुर्ड्याची ११ वाजतांची तोफ उडाल्यावर लावून घेत व मग सकाळीं चार वाजतां दुसरी तोफ होई तेव्हां उघडीत. कोणास रात्रौ फिरणें झाल्यास त्यास सर-

कारांतून चार आण्यांचा दाखला आणावा लागे. ह्या दाखल्याशिवाय कोणी भटक्या किंवा कार्य-साधु किंवा चाकरमानी (मग तो वडा असो किंवा छोटा असो) त्यास चावडीवाले आपली चावडी दाखवीत असत. ही सारी रात्र चिलटा ढेंकणांत चावडीवर काढून हे रात्रफिरस्ते दुसरे दिवशीं कोतवालाच्या हुकुमानें मुक्त होत.

इ० स० १८५६ सालीं पुणें म्युनिसिपालिटीची स्थापना झाली, त्यापासून रस्त्यांवरील खाट खडबड हळूहळू जाऊन गाड्या जाण्या येण्यासारखे १८ पासून २९ फूट रुंदीचे रस्ते गांवांत तयार होत गेले; व त्यांस क्रमाक्रमानें हें हल्लींचें रूप प्राप्त झालें. हल्लीं शहरांत गाड्या फडकावण्यासारखे व विस्तृत असे मुख्य लांबचलांब तीन रस्ते आहेत. (१) गंज, गणेश व मंगळवारचा रस्ता. (२) वेताळ, आदितवार व कसब्याचा रस्ता. व (३) शुक्रवार व बुधवारचा रस्ता. यांत रविवारांतील मोती चौकासारखा रहदारीचा व सुंदर रस्ता सर्व शहरांत नाहीं. हा रस्ता चापून चोपून व शिंपून मौजेचा केलेला असतो. ह्याचे दोहों बाजूंस उंच व टोलेजंग वाडे कांहीं पेशवाईतील गतवैभवाची साक्ष देणारे व कांहीं हल्लींच्या सुधारणेची आठवण देणारे आहेत. ह्या रस्त्याची रुंदी २४ फूट असून शिवाय दोहों बाजूंस ३।३ फूट रुंदीचीं व मोठाल्या शिळांनीं आच्छादलेलीं अशीं गटारें आहेत. नाना तऱ्हेच्या सुगंधी सामानांचीं व

पुष्पांचीं दुकानें ह्या रस्त्याच्या दुतर्फा असल्यामुळें येथून जाणायेणारांच्या मनास फार आल्हाद वाटतो. ह्या रस्त्याला जोडून समंतात् फरसबंदी पायवाटा असून त्यांची रुंदी १५ फूटपर्यंत आहे. हल्लीं पुण्यांतल्या चटसाऱ्या रस्त्यांची एकंदर लांबी ३६ मैल पसरली आहे. शिवाय लहान गल्ल्या ६ पासून १६ फूटपर्यंत रुंदीच्या असून त्यांचा विस्तारही १६ मैल लांबीचा झाला आहे. ह्यांतील कित्येक गल्ल्यांनीं फिरणें हें फार त्रासाचें झालें आहे. कारण, शौचकुपांचीं तोंडें ह्या गल्ल्यांकडे केलीं आहेत. कधीं कधीं ह्या घाणीमुळें शहरांत भयंकर-रोगही उद्भवतात. असो.

ह्या सर्व लहान मोठ्या रस्त्यांची दुरुस्ती राखण्या करितांच कमेटीला सालीना २०००० रुपये खर्च करावा लागतो. फेब्रुवारीपासून तों जूनपर्यंत हे रस्ते पाण्यानें भिजवून चिंब करितात. व रात्रीं काळोखापासून फिरणारांस उपद्रव न व्हावा म्हणून ठिकठिकाणीं केरोसीन तेलाचे दिवे लावतात. त्यांची संख्या आज मित्तीला ३६० आहे.

घरें:—पेशवाई पाहिलेलीं अशीं जुनाट घरें पुण्यास पुष्कळ आहेत; परंतु तीं कालमानानें वृद्धावस्थेस पावलीं आहेत. हल्लीं पुणें शहरांत एकंदर १२,२७१ घरें असून म्युनिसिपालिटीनें यांच्या पांच प्रती केल्या आहेत त्याः—

( १ ) २० हजारांवर किंमतीचे वाडे, संख्या ८५

( २ ) ८ हजारांवर व २० हजारांचे आंत,, ६३१

| | | |
|---|---|---|
| ( ३ ) १हजारावर व८हजारांचे आंत | ,, | २,६९९ |
| ( ४ ) २ शेंवर व हजाराचे आंत | ,, | ४,१९७ |
| ( ५ ) दोनशेंचे आंत ,, ,, | ,, | ४,६५९ |
| | | १२२७१ |

एकंदरीनें पाहतां पुण्यासारखीं शोभिवंत, मजबूद व मुख्यतः थोडक्यांत सोयीवार घरें दुसऱ्या थोडच्याच शहरांत अढळतील. ह्यांचा अंतर्बाह्य भाग मोठा मजेदार केला असतो, व त्यांत नवा जुना प्रकार पाहून तर फारच मौज दिसते. पूर्वींच्या घरांची धर्ती पाहवी तों वेगळी व नव्यांची नवीनच. पूर्वींच्या घरांचा पुढील भाग फार उंच असून त्यांच्या दर्शनी भिंतीवर देवादिकांचीं नानाविध चित्रेंही दृष्टीस पडतात. व एकंदरीनें त्यांचें बांधकाम मजबूद, निवळ दगड चुन्याशीं गांठ, मोठमोठे विस्तृत् चौक, मजबूद दरवाजे, देवड्या वगैरे प्रकार नजरेस पडावयाचे, परंतु अलीकडे इंग्रजी अमलांत जीं घरें होतात त्यांचा मासला निराळाच व त्यांत मजबुदीपेक्षां भपका, टापटीप, रंगीबेरंगी कांचांच्या खिडक्या यांकडे विशेष लक्ष्य दिलें जातें. पुढें छोटेखानीं बागा, वेली, कुंज, फुलझाडांच्या थोड्या बहुत कुंड्या, एके बाजूस गाड्या ठेवण्याचीं घरें; आंत पहावें तों कोंच, खुर्च्या, कांचपात्रें व कांचदीपक, टेबलें, कपाटें, लठ्ठ लठ्ठ बुकें ह्यांचा सुकाळ असून टक् टक् करणारीं घड्याळें ह्याप्रमाणें व्यवस्था दिसावयाची, व सभोंवार मजबूद भिंत वगैरे

कांहीं नमून २-२॥ हात उंचीचे चुन्या विटांचें कठडे व त्यांला लोखंडी किंवा लांकडी गजांचे मजेदार फाटक असा प्रकार नजरेस पडावयाचा. कालमाहात्म हें कांहीं निराळेंच असतें. असो.

इमारतीबरोबरच त्यांतील स्वच्छताही वाखाणणी करण्यासारखी आहे. इतर शहरांत अशी स्वच्छता विरळच सांपडेल. येथें मुळापासून ब्राह्मणांची वस्ती पुष्कळ असल्यामुळें हा स्वच्छतेचा प्रकार शेजार धर्माप्रमाणें इतर जातींसही लागत गेला. मद्रासेकडील कांहीं लोक जे नेहमीं गाडग्या मडक्यांत आपलें आयुष्य घालविणारे, ज्यांच्या झिंट्यांच्या व अंग नेहमीं मलीन असावयाचें व ज्यांच्या आंगास व वस्त्रास कित्येक दिवस पाण्याचा स्पर्शही व्हावयाची मुष्किल, असे गलिच्छ लोक फार वर्षं ह्या पुण्यांत येऊन राहिल्यामुळें हल्लीं त्यांच्या स्वच्छतेची व घरांतील निर्मळतेची ब्राह्मणांवर ताण होत चालली आहे.

## पूल.

( १ ) शहराचे पश्चिमेस मुठानदी वाहते तीवर रहदारीचे मोठे असे तीन पूल आहेत. ( २ ) शहरांत नागझरीचा ओढा वाहत आहे, त्याजवर छोटे असे सहा पूल आहेत व ( ३ ) शहराचे पूर्वेस माणिक ओढा वहात आहे, त्यावर लहानच तीन पूल आहेत. यांचा प्रकार असाः—

**( १ मुठानदी )लकडी पूलः**—हा मुठा नदी-

( १ ) टीप—८० पृष्ठ पहा.

वर असून ह्यास अठ्ठेचाळीस फूट रुंदीच्या नऊ कमानी आहेत, व पुलावरील रहदारीचा रस्ता १८ फूट रुंदीचा आहे. ह्यावरून जात असतां खालीं नदीच्या वाळवंटीं धुण्यापाण्यांत गुंतलेले लोकांची दाटी नजरेस पडते, व पैलवर प्रेतांच्या धुण्या लागून राहिलेल्या नजरेस पडतात व कित्येकांचीं मस्तकें आगीच्या लोळानें तडातड फुटून त्यांचे बाराप्रमाणें होणारे आवाज कानांत शिरून एकाएकीं अंगावर कांटा उभा रहातो व काळीज चर्र्र् होतें.

नारायणराव पेशव्यापर्यंत ब्राह्मणांचीं प्रेतें ह्या लकडी पुलाजवळ दहन करीत असत, व खुद्द नारायणरावाचें प्रेत येथेंच दहन केलें. पुढें सवाई माधवरावाचे कारकीर्दींत हल्लींच्या ठिकाणीं ( ओंकारेश्वरापाशीं ) ब्राह्मणांचीं प्रेतें दहन करण्याचा प्रघात पडला, व खुद्द सवाई माधवरावाचें प्रेत ओंकारेश्वरापाशींच दहन केलें, असें इतिहासानें कळतें.

धरणः—हें धरण कुंभारवेशीजवळ आहे. नदी ओलांडून जाण्याचें हें पूर्वींचें साधन होय, हें पेशवाई नांदत असतां लोकांस जाण्यास मुळींच अटकाव न करितां मोठ्या आनंदानें जाऊं देत होतें, पण इंग्रजी टोपी पुण्यांत दिसूं लागल्यामुळेंच कीं काय न कळे ! ह्या धरणानें डोक्यांत धूळ घालून रहदारी अगदीं बंद करून टाकिली होती, पण कंपनी सरकारानें ह्याच्या मस्तीस न जुमानतां ( इ० सन १८३९–४०त ) तीस हजार रु० खर्च करून हल्लींचें भलें भक्कम धरण बांधून त्याची ती मस्ती जा-

गऱ्या जागीं जिरवून टाकिली ! धरणाची एकंदर लांबी ७०५ फूट असून रुंदी २१' फूट आहे. ह्या स ९।९ फूट रुंदीच्या १२ मोऱ्या आहेत. पाण्याचा सांठा वाढविण्याकरितां वर्षांतून कांहीं महिने त्यांचीं झडपें बंद करून टाकितात. ह्या धरणावरून पावसाळ्यांत जाणें जिवावरचें होय. कारण, कधीं कधीं नदीस पाणी चढून तें धरणावरून वाहत जात असतें त्यामुळें रस्ता दिसेनासा होतो. ह्यास दुतर्फा कठडा नसल्यामुळें जरा पाय चुकला कीं, नदींत गडप् व्हावें लागतें.

**वेल्स्लीचा पूलः**—इतिहास प्रसिद्ध वेल्स्लीसाहेबांनीं महाराष्ट्र देश ( कोणत्याही रीतीनें कां होईना ) काबीज केल्यानंतर त्यांचें स्मारक ह्मणून हा पूल बांधण्याचें ठरलें. हा पूल मुळा व मुठा यांच्या संगमावर आहे. हा पूर्वीं ( इ० स० १८२८ त ) शुक्रवारांतील पेशव्यांचे वाड्यांच्या लांकडांनीं बांधिलला होता, व याचें काम तीन वर्षें चालून जेष्ठ वद्य १२ शुक्रवारीं मालकम् साहेब गव्हर्नर यांनीं प्रातःकाळीं येऊन पूल उघडून आपण त्यावरून जाण्यास मुहूर्त केला. ह्या वेळीं साहेबांनीं शेंकडो ब्राह्मणांस बहुत दक्षिणा वाटली. वाचक हो, पाहिलें ना ! पूर्वींचे साहेब हिंदुधर्मासंबंधानें कसे भीरु होते ते ! कंपनी सरकारचा हुकूमच होता कीं, अशीं सार्वजनिक कामें उघडितांना पूर्वींची दक्षिणा वाटण्याची चाल एकाएकीं बंद न करितां ती वाटण्यांत येत जावी. असो. ह्या दक्षिणेचा फार-

सा गुण न येतां हा लकडी पूल वाहून गेल्यामुळें हा दगडांनीं बांधून काढिला. (इ० स० १८३९.) परंतु ह्या अवस्थेसही हा कंटाळून ह्यानें पुनरपि कुचराई चालविली. शेवटीं हल्लीं आपण पहातों आहों त्यांत यानें रूप घेतलें. (१८७५.) ह्यास आठ कमानी आहेत, प्रत्येक कमान ५२॥ फूट रुंदीची असून वरील रस्ता २८ फूट रुंदीचा आहे. हल्लीं पुण्यांत हा "व्हासली पूल" नांवानें अडाणी लोकांत प्रसिद्ध आहे. पुलाचे बाजूस एक दगड बसवून त्यावर येणें प्रमाणें मजकूर कोरला आहे:—

"The original wooden structure, named "in honor of the victories obtained in the "Deccan by Major Gell: Arthur "Wellesley (afterwards F. M. the Duke "of Wellington, K. G.), constructed by "Captain Robert Foster, Bombay Engi-"neers, at a cost of Rs. 91,892, and "opened in 1830 by the Honorable "Major Gell: Sir Jhon Malcom. G. C. B., "Governor of Bomay, having become de-"cayed and unsafe for traffic, was re-"moved, and the present bridge, designed "and constructed, by colonel A. U. H. "Finch, R. E. at a cost of Rs. 1,10,932, "was opened to the public in May 1875; "His Excellency the Honorable Sir Philip "Wodehouse, K. C. B. Governor and "President in Council.

( २ नागझरी ) जकाती पूलः—हा पूल सोमवार व मंगळवार ह्या पेठांचे दरम्यान आहे. पेशव्यांचे वेळीं येथें जकातीचें ठाणें असल्यामुळें ह्यास 'जकाती पूल' हें नांव पडलें. हा पूल इ० स० १८३९–४० सालीं सरकारानें बांधिला आहे. ह्यास बारा फूट रुंदीच्या तीन कमानी असून ह्याची लांबी ७२ फूट व रुंदी २० फूट आहे

दारुवाल्याचा पूलः—हा पूल सोमवार, रास्ते, व न्याहाल ह्या पेठा पकडून आहे. येथें दारूसामान करणारे लोक रहातात ह्मणून ह्यास 'दारुवाल्यांचा पूल' असें नांव पडलें. नागझरी वरील सर्व पुलांत ही जुंगी आहे. इ.स. १८७०सालीं पुण्याचे म्युनिसिपालिटीनें १९०००[२] रुपये खर्चून हा बांधिला आहे. ह्यास बारा फूट रुंदीच्या अशा चार कमानी असून ह्याची लांबी १७४ फूट व रुंदी ३२ फूट आहे. स्टेशनाकडून शहरांत जाणायेणारे लोक ह्यास आपल्या नजरे खालीं (पायांखालीं देखील) घालून जातात.

[ १ ] ह्या नागझरीची अशी कथा ऐकण्यांत येते कीं, सुमारें चौदाव्या पधराव्या शतकांत, ह्या नागझरीस 'नागेश्वरी' असें नांव चालत होतें. हें नांव सोमवारांतील नागेश्वरावरून पडलें असें सांगतात. लांब लांबचे भाविक जन ह्या नागेश्वरी तीर्थास येत असत. व मोठ्या पूज्य बुद्धीनें नागेश्वरीची पूजा करीत असत. हल्लीं ह्या नागेश्वरी तीर्थाची कशी पुजा होत आहे व त्यांत किती कर्दमतीर्थें मिसळत आहेत, तें वाचक जाणतीलच. ! ! !

(२) (*Bombay Gazetteer Vol.* III) पण दारुवाल्याचे पुलावर जो एक दगड कोरिला आहे, त्यावर २०,०५५ रुपये खर्च झाला असें लिहिलें आहे, मग खरें कोणतें !

**पार्शांचा पूल**—हा गणेश व रास्ते ह्या पेठांस धरून आहे. पार्शी लोकांचे मुख्य गुरु ( दस्तुर ) ह्यांनीं लोकोपकारार्थ इ० स० १८३० सालीं हा बांधिला आहे. ह्यास पांच फुटींच्या तीन मोऱ्या असून वरील रस्ता सहा फूट रुंद आहे जवळ-पासच्या पेठेंतील रजस्वला स्त्रिया वगैरे निर्भिडपणें आपलीं मलीन वस्त्रें येथें धुतांना हमेषा नजरेस पडतात.

**गणेशपेठेचा पूल**—हा नाना व गणेश ह्या पेठांस जोडतो. हा वीस फूट रुंद असून ह्यास सोळा फुटींच्या तीन मोऱ्या आहेत. हा इ० स० १८३९ सालीं कंपनी सरकार बहादूर यांनीं बांधिला.

**बुरुडांचा पूल**—हा भवानी व आदितवार ह्या पेठांस जोडतो. येथें बुरुड लोकांची वस्ती असल्यामुळें ह्यास हें नांव प्राप्त झालें इ० स० १८४०—४९ च्या सुमारास अधाई नामक कोणी उत्तर हिंदुस्थानांतील कारागिरानें लोकोपयोगार्थ हा बांधिला असल्याचें समजतें.

**घशटीचा पूल**—हा भवानी,गंज व वेताळ ह्या पेठांस जोडतो. घशटी नामें कोणी नर्तकी पुण्यात हाती तिनें आपलें नांव रहावें ह्मणून सुमारें १८०० शें रुपये खर्चून सन १८४९ सालीं हा बांधिला. हा २० फूट रुंद असून ह्यास १८ फूट रुंदीच्या तीन कमानी आहेत.

( ३ माणिक ओढा ) **दलालखोरांचा पूल**—

हा सोमवार व मंगळवार ह्या पेठांची भेट करून देतो. येथें हलालखोरांची वस्ती असल्यामुळें यास हें नांव प्राप्त झालें. हा बराच मोठा ह्मणजे २०४×४८ फुटांचा असून ह्यास पांच फुटांच्या ३ मोऱ्या आहेत. इ० स० १८४० च्या सुमारास कंपनी सरकारानें हा बांधिला आहे.

**गोसाव्यांचा पूल**—हा गोसावी-पुऱ्यांत असल्यामुळें ह्यास हें नांव प्राप्त झालें. इ० स० १८७० सालीं म्युनिसिपालिटीनें तीन हजार रु० खर्चून हा बांधिला आहे.

**भट्टीगेटाचा पूल**—हा रास्ते पेठेंत आहे. हा अगदीं लहान आहे. ह्यास सात फुटांच्या दोन मोऱ्या आहेत. हा इंजिनीयर खात्यांतील कोणी कंट्राटदारानें इ० स० १८४९ त लोकोपयोगार्थ बांधिला आहे. येथें कवलें करण्याची भट्टी असल्यामुळें ह्यानें हेंच नांव स्वीकारलें आहे.

**पुणें म्युनिसिपालिटी**—इ० स० १८५६ या वर्षीं पुण्यास हल्लींची म्युनिसिपालिटी स्थापन झाली. पहिल्यानें हींत तीस सभासद होते. नंतर सन १८७४ सालीं छत्तीस झाले. पुढें नऊ वर्षांनीं आठ सभासद कमी करून अठ्ठाविसांची भरती ठेविली. अठ्ठाविसांपैकीं नऊ सरकारतर्फे, बारा प्रजेच्यातर्फे व सात नामिनेटेड ह्याप्रमाणें नेमण्यांत आले. चेअरमन् ( अध्यक्ष ) नेमणें तो प्रजेच्या तर्फेचे सभासदांनीं निवडावा व त्याची नेमणूक एका वर्षापुरती असावी असा नियम आहे. वर्षांतून

चार वेळां जनरल् कमेटी भरते. व म्यानेजिंग कमेटी वारंवार भरते.

या शहरम्युनिसिपालिटीचें सालीना उत्पन्न [1] २,३३,०४० रुपये असून तें जकात, घरपट्टी, पाणीपट्टी, गाडीपट्टी, भंगीपट्टी, सोनखत, कचरा वगैरे बाबींच्या रूपानें वसूल केलें जातें. ह्या उत्पन्नापैकीं सालीना खर्च सुमारें १,०३,७२० रुपये होत असून सालाचे निव्वळ सुमार १,२९,३२० रुपये पोत्यांत पडतात; पण कधीं कधीं विशेष सार्वजनिक कामें करवयाचीं असल्यास उत्पन्न व खर्च बरोबर होतो.

म्युनिसिपालिटीचें काम चालविण्याकरितां मुख्य चार अधिकारी आहेत; त्यांचीं नांवें ( १ ) सेक्रेटरी, ( २ ) इंजीनीयर, ( ३ ) हेल्थ् ऑफीसर ( ४ ) व जकात वगैरेचा सुपरिंटेन्डन्ट. पहिला सोडून बाकीच्या तीन अमलींच्या हाताखालीं अनुक्रमें १४-९ ७० याप्रमाणें इसम आहेत. हे सर्वजण नेटीव असल्यामुळें दरमहा ह्यांचा पगार २,२६० रुपयांत भागतो. शहरांत आगीचे बंब चार आहेत त्यांकडे सालीना खर्च पांच हजार होतो. पोलीस व रस्त्यांवरील फाणसांस मिळून दहा हजार रुपये, खडकवासल्याचे पाण्याबद्दल सरकारास द्यावे लागतात ते दहा हजार; शहरांतील कचरा झाडणाऱ्या झाडुवाल्या बाया दीडशें व कचऱ्याच्या गाड्या

१ टीप हा आंकडा १८८३-८४ सालाचा आहे.

पंचवीस आहेत त्यांस सालीना खर्च १४०००, शौचकूप ७८५४ आहेत व त्याकरितां २८० भंगी व २८ गाड्या आहेत ह्या सर्वांस खर्च ३६ हजार व दुसरा सटरफटर खर्च मिळून सोळाशें ह्याप्रमाणें १०३७२० रुपये सालाचा खर्च होतो.

हशरांत केरकचऱ्याकारितां तीनशें पेट्या केल्या आहेत. ह्यांतील कांहीं कचरा कुंभार लोक कवलें, विटा वगैरे भाजण्याकारितां आपल्या गाढवांवर लादून नेतात. व कांहीं म्युनिसिपालिटी शहराबाहेर नेऊन जाळते. कुंभारापासून कचऱ्याचें उत्पन्न पांच सहा हजारांवर होतें. दुसरा कचरा जो म्युनिसिपालिटी जाळते त्याची राख कांहीं वायां न जातां त्याचा उपयोग ह्याप्रमाणें होतोः— शहरांतील शौचकूपांतील मळ गाड्या भरभरून सोनखत तयार करण्याचा कारखाना पर्वतीच्या पैलवर आहे तेथें नेतात. तो तेथें ओतून पसरितात त्यावर ही राख शिंपडितात. सूर्याचे किरणांनीं तो दमटवोला झाल्यावर त्यास वर खालीं करून पुन्हा त्यांत राख मिश्र करून अगदीं वाळवितात. वाळल्यावर हा अगदीं गंध रहित होतो. व ह्याप्रमाणें हें 'सोनखत' तयार होतें. हल्लीं पुण्यांत उसांची लागवड फार झाल्यामुळें ह्या सोनखतापासून म्युनिसिपालिटीस सालीना छत्तीस हजारांवर उत्पन्न होतें, व सोनखत सहा हजार टनांवर तयार होतें !

**लोकवस्ती**—सन १७८० या वर्षीं अंदाजावरून

पुणें शहराची वस्ती दीड लक्ष गणली होती. रावबाजीचे कारकीर्दीचे प्रथमारंभीं बेबंदशाही व 'बळी तो कान पिळी' हा न्याय सर्वत्र असल्यामुळें लोक त्रस्त होऊन कांहींका जणांनीं पुणें सोडून चालते झाले त्यामुळें लोक कमी झाले. पण पुढें इंग्रजांनीं रावबाजीस पेशवेपद दिल्यावर, व त्यांच्या पहारा पुण्यांत बसल्यावर लोकांस धैर्य येऊन लोक वसाहत अधिकाधिक होत गेली. ज्या वेळीं रावबाजी किंवा पेशवाई रसातळास गेली त्या वेळीं लोकसंख्या सुमार १,५०,००० होती. सन १८२५ इसवींत बिशप हीबर ह्यानें ह्या पुणें शहरचा सवा लक्ष लोकसंखेचा अंदाज केला होता. पण पेशवेराजधानीचें शहर मोडत चालल्यामुळें लोकही मोडत गेले. सन १८५१ ह्या वर्षी ७९,२०९ लोक होते. सन १८५६ च्या सुमारास रेलवेच्या कारखान्यामुळें पुण्यांत लोक येऊन राहिले, व पुढें सन १८६४ सालीं रेलवेनें व्यापारास तेजी होत गेली त्यामुळें लोकसंख्या ८० हजारांवर आली. सन १८७२ ह्या वर्षी ९०,४३६ वर लोक झाले व परवांचे खानेसुमारीस ( १८८१ ) त सरकारानें ९९,६२२[1] लोक गणिले. ह्या शेवटच्या आंकड्या पैकीं ८७,८७४ हिंदु १०,५१९ मुसलमान, ५६२ ख्रिस्ती, २०६ पार्शी व ४६१ इतर लोक होत.

१ टीप—हा आंकडा पुणें व खडकी कँटोन्मेन्टच्या लोकवस्तीच्या बाहेर आहे. कॅन्टोन्मेन्टमध्यें लोकसंख्या २७५८१ शिवाय आहे.

मंडई---पुण्यांतील मंडईचा भाजीबाजार सर्व हिंदुस्थानांत प्रसिद्ध आहे. हा बाजार ज्या ठिकाणीं भरतो त्या ठिकाणीं पेशव्यांचे अमदानींत मोकळी जागा असून सणावारांचे दिवशीं सरदार--मानकरी हे येथल्या तंबू, राहुट्यांत जमा होत असत. ही जागा ४९८ फूट लांब व १३९ फूट रुंद आहे व अगदीं मोकळी आहे. सकाळीं चार वाजल्यापासून तों सात वाजेपर्यंत गाड्या भरभरून भाजीपाला वगैरे आसपासच्या खेड्यापाड्यांतून येतो. हा माल मंडईत आल्यावर काची वगैरे लोक तो लगेच घाऊक खरेदी करितात. व ह्या काच्यापासून किरकोळ माल घेणारे व्यापारी खरेदी करितात. येथें भाजी विकणाऱ्यांची रांग निराळी बसते, फळफळावळ यांची रांग निराळी, बटाटे, कांदे ह्यांचे ढीग निराळे, पाने ( विड्याचीं ) ह्यांची रांग निराळी, केळीचीं पानेही निराळे ठिकाणीं, एकंदरींत प्रत्येक मालाची ओळ निरनिराळी लागून गेलेली असते. ह्या मंडईत शिरतांच माणसांची एकसारखी चळवळ दृष्टीस पडते, कोणी गिऱ्हाईक हातांत अंजिरांकारितां करंडे घेऊन उभा, कोणी अंजीर तोंडांत घालून चव घेण्यांत गुंतलेला, कोणी "ये ! माळणी, तीन पैशांला शेर दे," असें म्हणणारा, कोणी मोलकरणीस 'पाटीवाले' म्हणून हाक मारणारा, कोणी रडके व वेडेंविद्रें तोंड करून कमी किंमतीनें भाजी मागणारा, कोणी म्हणतो 'कायहो,' आज बाजार तर फार महाग

आहे, दुसरा ह्मणतो ' तो लग्नसराईनें व शहरांत बाहेरचे लोक आल्यानें महागावलेला आहे. ' वगैरे प्रकार एकसमयावच्छेदेंकरून नजरेस पडतात.—त्याचप्रमाणें माळणी वगैरे एकसारखा तराजूचा कांटा वर–खालीं करून व त्यास हिसके हिसडून ग्राहकांचे पदरांत माल टाकतांना दृष्टीस पडतात. कोणी ' सहा पैसे पांसरी बटाटे ताजा माल खानेवाला लाल ' ह्मणून, कोणी ' घ्यारे लुसलुसित कवळे भेंडे ' ( मग ते जून का असेनात ) ह्मणून, कोणी ' अधेल्याला कोथिंबिरीची जुडी ' ह्मणून, कोणी ' कवड्या कवड्या ' ह्मणून, कोणी ' पैशाला शेर, पैशाला शेर ' म्हणून, कोणी ' पाहिजे तर घ्या ' कोणी ' दमडी कमी नाहीं घ्यावयाचा ' कोणी ' पोंकळा स्वस्थ येईल–जा तो घ्या ' वगैरे नानातऱ्हांनीं सुरावर–हेल काढून–कर्कशपणें बोलतांना–ओरडतांना ऐकूं येतात.

मंडईंत रविवारीं फारच गर्दी उडून जाते व त्या दिवशीं मालही महाग विकला जातो. रविवारीं सुट्टी असल्यामुळें शहरांतील चाकरनौकरांच्या व मुंबई वगैरे कडील ' सात आठ तासांच्या रस्त्यावरील ' पैसा अधेल्याकडे दृष्टि न देणाऱ्या लोकांच्या झुंडींच्या झुंडी या मंडईंत कोसळतात. खेरीज त्यांच्या ओळखीदेखीच्या लोकांची गांठही यदृच्छेनें येथेंच पडावयाची. गुड्–मॉर्निंग्, शेक्हँड् हीं येथेंच व्हावयाचा !

बिनधंद्याचे लोक, ' कवडीचुंबक मार्तंड नाइकांच्या

वर्गांतील लोक ' व गोर गरीब यांची भाजी खरेदीची वेळ ह्मटली ह्मणजे बाजार उलगडण्याची संधी. या वेळीं पैशाचा माल अधेला दमडीस घेऊन हे चालते होतात.

हा बाजार दिवसा अक्रा वाजेपर्यंत मात्र असतो. ह्मणजे सकाळीं भाजीपाल्याचे, फळफळावळीचे जे पर्वतप्राय ढीग दिसत असतात, यात्रेप्रमाणें मनुष्यांची गर्दी झालेली दृष्टीस पडत असते, तो सर्व प्रकार एकदम नाहींसा पाहून व हें विस्तीर्ण पटांगण एकाएकी शून्य पाहून मनुष्यास मोठें नवल वाटतें![1]

दरदिवशीं स्थूल दृष्टीनें मंडई मध्यें किती माल खपला जातो-याचें सरासरीचें मान इ० स० १८८२-८३ सालांत सरकारानें काढिलें आहे तें असें:—

| मालाचें नांव. | गाडे. | मण. | किं. रु. |
|---|---|---|---|
| भाजी. | ६० | ७२० | ९०० |
| फळें. | २० | २४० | ६०० |
| सर्पण. | १० | १२० | ५० |
| वैरण. | ८० | ९६० | ४०० |
| किरकोळ. | १५ | १८० | १५० |
| बेरीज. | १८५ | २२२० | २१०० |

१ टीप-तारीख १० जानेवारी इ० स० १८८६ पासून आठवड्यांतून दोन वेळा सायंकाळीं जुना सामानाचा बाजार ह्या पटांगणांत भरूं लागला.

**दवाखानें**—शहरांत लोकांस फुकट औषधें मिळण्या सारखे सात दवाखाने आहेत; पैकीं दोन सरकारी ( सासून व वेड्यांचीं इस्पितळें ), तीन शहर म्युनिसिपालिटीचे ( शनवार, नाना, व कसबा पेठें-तील ) व दोन सावकारी, एक सोराबजी शेटचा दवाखाना ( शुक्रवार ) व दुसरा अनाथां करितां सासूनचा दवाखाना (नारायणपेठ ); ह्यांशिवाय दाक्तरी पदव्या घेतलेले लोकांचे तीनचार घरगुती दवाखाने व सरकारी पेन्शन् खाणारे दाक्तर लो-कांनीं उघडलेलेही बहुत दवाखाने आहेत. शहरांत देशी वैद्यही पुष्कळ आहेत. पैकीं कांहीं अनुभवि-क, कांहीं वर्तमानपत्रांतून भपकेदार जाहिराती दे-ऊन बनलेले, कांहीं नाकाडोळ्याचे, कांहीं सांगीचे, कांहीं 'अवलिया प्रासादिक' वगैरे तर कितीक आहेत यांचा पत्ताच नाहीं.

सासून इस्पितळ, वेड्यांचें इस्पितळ व सोराबजी-शेटचें इस्पितळ ह्यांत सरकारी अनुभविक शस्त्र-वैद्य ( सरजन् ) आहेत. बाकीच्या कांहींत अ-नुभविकांची गुजराण केली आहे. इंग्रजी पढलेल्या लोकांचा विशेष भर इंग्रजी औषधांवर, ते देशी दमडी अधेल्याच्या औषधांकडे ढुंकूनही न पाहतां ४।५ रु० खर्च करतील, पण इंग्रजी औषधें घेतील. दरमहा डाक्तराकडील बील आलें नाहीं कीं, क-सेसेंच वाटणारीही कांहीं नांवाजलेली मंडळी आहे, कांहीं दाक्तरांस दरमहा अमुक पगार देणारीही

१– हा दोन तीन महिन्यां पूर्वी स्थापन केला आहे.

मंडळी आहे, व दवाखान्यांत वारंवार जाऊन डाक्तर-साहेबांची गांठ घेऊन औषधें घेणें हेंही कित्येकांच्या अगदीं परिपाठांतलेंच बनून गेलें आहे—करमणुकीचें साधन झालें आहे—व प्रतिष्ठितपणाचें द्योतक झालें आहे! इतर लोकांपैकीं मराठी जुन्या काळच्या लोकांचा ग्रह भस्म, मात्रा वगैरेवर व गांवठी लोकांचा गांवठी झाडपाल्यावर याप्रमाणें ‘ सार्वजनिक आरोग्याची ’ हवाल आहे.

# प्रकरण सहावें.

## लोकाचार.

नाटकें:—' नाटकें करावीं कीं करूं नये ' या विषयावर कै० विद्वच्छ्रेष्ठ विष्णुशास्त्री चिपळूणकर ह्यांनीं आपल्या केसरीपत्रांत सविस्तर उहापोह केला आहे. त्यांतील एक शब्दही खोडून काढण्याची कोणाची छाती झाली नाहीं. त्यांचा तो लेख व त्यां बरोबरच:—

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्
जानंतु ते किमपि ! तान्प्रति नैष यत्नः ।
उत्पत्स्यतेस्ति मम कोऽपि समानधर्मा
कालोऽह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी ॥
[ मालती माधव.[1] ]

ही भवभूतीची दर्पोक्तिही इतरां कित्येकांप्रमाणें आह्मांस कबूल आहे. आह्मी इतकेंच ह्मणतों कीं,

[ १ ] अर्थ—जे कोणी सांप्रत आमच्या या प्रयत्नाला [ मालती माधव नाटकाला ) नाकें मुरडतात, त्यांनीं असें खास समजावें कीं, अशा अरसिकां करितां हा प्रयत्न मुळींच नाहीं ! आमची अशी खात्री आहे कीं, या आमच्या प्रयत्नाचें अभिनंदन ( कौतुक ) करणारे रसिक लोक आज जरी कोणी नसले तरी कदाकाळीं तरी उत्पन्न होतीलच होतील ! व तसें शक्यही आहे. कारण, काल हा निरवधि ( अनंत ) असून पृथ्वी विपुल आहे ! !

ज्याप्रमाणें इंग्रजी शिकल्यापासून लोकांची स्वधर्मावरील श्रद्धा कमी होते—त्यांचे आचार विचार सुटतात; हा दोष इंग्रजी विद्येच्या आंगचा नसून तिच्या तऱ्हेवाईक योजनेचा आहे; तद्वत्च नाटकांचे पायीं होणारी हानी हा दोष नाटकांच्या आंगचा नसून त्यांच्या चमत्कारिक योजनेनें किंवा 'अति सर्वत्र वर्ज येत्' ह्या न्यायानें होत आहे. इतकें दिग्दर्शन करून या ठिकाणीं आह्मांस जें काय ह्मणावयाचें आहे तें ह्मणतों.

पेशवाईत किंवा मराठ शाहींत ह्या नाटकांचें नयनाट झालें होतें. तेव्हां फक्त देवळांत ललितें व तिठ्यावर तमाशे मात्र होत असत. ललितांतून दशावतार व क्वचित् मजेचीं सोंगें दृष्टीस पडत. तमाशांतून देवादिकांवर व क्वचित् इतर छंदीफंदीही लावण्या ऐकूं येत. पुढें बाजीरावींत 'कुण्या सभाग्याची मदनमंजिरी—ही सांग सखे सुंदरी।' अशा थाटावर लावणीचा रोख होता.* बाजीरावी व त्या बरोबरच पेशवाई निजधामास गेल्यावर ह्या तमाशांत कांहीं फेरबदल होऊन मधून मधून सोंगें येऊं लागलीं. लावणीचा शेवट झाला कीं, एकादें

* पण अलीकडे तर या पुण्यांत अलंकार शास्त्राचा, व विशेषतः शृंगार रसाचा शेणसडा होऊन त्यामुळें किळसच उत्पन्न व्हावा, ह्या रोखावर ह्या लावण्या व त्यांची नातवंडें-पणतवंडें झगडे छकडी झळकूं लागून ह्या विचकटपणा कोटीच्या पायरी पर्यंत जाऊन कैक लोकांस प्रायश्चित्तही भोगावें लागलें आहे; तरी त्यांची स्वादुता तिळमात्र कमी न होतां उत्तरोत्तर वाढतच आहे!

सोंग तयार. नंतर हा सोंगाचा पाठ इतका वाढला कीं, एकाद्या [1]लावणींत चार चार—पांच पांच विचकट सोंगें येऊं लागलीं ! व तीं प्रेक्षकांस आवडतही गेलीं ! !

कर्नाटकांत देवादिकांचीं नाटकें करण्याची चाल होती, ती पाहून व हीं तमाशांतील सोंगें लोकांस आवडतात असें जाणून, सुमारें वीस पंचवीस वर्षांपूर्वी विष्णुदासनामक सांगलीकर कोणी नाटकहितेच्छूनें हल्लींचें हें ‘ अल्लल्लल्ल् रूपी ’ नाटक बनविलें. त्यावरील लोकांची अभिरुचि वाढतां वाढतां इतकी वाढली आहे कीं, गिरणींत खपणाऱ्या अशिक्षित मजुरांनीं देखील—मुंबईसारख्या शहरांत—प्रसिद्ध बादशाही नाटकगृहांत—स्वतः नाटकप्रयोग करून दाखवून आरडून—ओरडून, नाचून—बागडून त्या धांगडधिंग्यानें नाटकगृह अगदीं दणाणून सोडिलें ! असो.

ही नाटकाची ‘ एक छत्री ’ चाल इ० स० १८७९ पर्यंत होती, (व अजूनही आहे, पण कमी.) असें ह्मटलें तरी चालेल. नंतर अण्णा किर्लोसकर नामें रसिक गृहस्थांनीं पार्शी नाटक प्रयोगाचें अनुकरण करून, आपल्या गायनकलेच्या प्राविण्यानें व कवित्वाच्या चिरपरिचयानें संगीत नाटकाचा झेंडा उभारिला. व त्यांस सर्व साधनें एकसमयावच्छेदेंकरून अनुकूल पडल्यामुळें, या संगिताचा परिणाम

(१) टीप—हे गृहस्थ इ० स० १८८५ च्या नोवेंबर ता० २ रोजीं मधुमेह रोगानें मृत्यु पावले.

आबालवृद्धांच्या मनावर फारच जोरानें पडला. ह्मणजे त्यांनीं आपल्या संगितानें लोकांस अगदीं गुंग करून टाकून 'दुनिया झुकती हैं–झुकानेवाला च्याही हैं' ह्या ह्मणीचें सत्यत्व प्रकट केलें. यामुळें हल्लीं जिकडे पहावें तिकडे संगिता वांचून कां. हीं ऐकूं येत नाहीं. इतर नाटकवाल्यांनीं देखील संगितांतील विद्वान संगितांतील ओळखीचे चालीवरील एकाद दुसरें तरी पद ह्मटल्या वांचून त्यांच्या नाटकास गोडीच येईनाशी झाली आहे! हेंचसें काय! पण शाळांत--कॉलेजांत--गवई बोवांच्या गाण्यांत–अर्वाचीन 'प' ला पव 'ट' ला ट जुळवून कवित्व फेटकावून 'कवीश्वर' बनणारांच्या काव्यांत व शेवटीं 'घेईं–घेईं माझे वाचे' ह्मणून कथा करणारे आमचे हरिदास यांच्या कथेंत व भोजन–समारंभांत देखील संगीत व तदनुरोध–चाली शिरल्या आहेत! काय करतील बिचारे! एक संगिताचा वशिला नसल्यानें सर्व लंगडें व्हावयाचें!! असो. हें एक देशी बिवेचन पुरें करून आपल्या प्रस्तुत विषयाकडे वळूं.

ह्या नाटकामुळें देशाची इतकी दुर्दशा होत चालली आहे कीं, असे नाटकप्रयोग आह्मी आणखी कांहीं वर्षें असेंच चालविले तर अरेराव हिंदुजन नाटकी बनून रंगभूमीवर बुद्धिबळांतील राजांप्रमाणें वेषधारी होऊन रंगभूमीचें मात्र राज्य खास पटकावितील!!

हल्लीं ह्या नाटकवाल्यांनीं कोंवळीं कोंवळीं सुंदर

मुलें यांस ‘ भोळ्या ’ मिशनरींप्रमाणें आपल्या जाळ्यांत ओढण्याचा क्रम चालविला आहे. कधीं कधीं हे लोक गरीब आईबापांस पैशाची भूरळ पाडून त्यांचीं अल्पवयी अर्भकें छिनून आपल्या कळपांत ओढून घेतात त्यांचे स्वाधीन हें अज्ञान मूल झालें कीं, त्यास जीर्ण पंचाऐवजीं मूल्यवान साडी नेसण्यास, संजाबदार शेंडी ठेवण्यास, नायकांप्रमाणें गोंदण्यास लाविलात! एव्हढेंच करून ते उगा राहतात काय? नाहीं! तर डोळे कसे मारावे, बुबुळें गरगरां कशीं फिरवावीं, भिवया कशा चढवाव्या, तोंड कसें मुरडावें, मुरका कसा मारावा, शरीराचे अवयव कसे फुलवावे, एका आंगठ्यावर कसें नाचावें, पाय कसा ठेवावा, उडी कशी मारावी, कंबर कशी लववावी वगैरे नानाविध स्त्रियाविभाव शिकवितात. ह्याप्रमाणें हें पोर तयार झालें ह्मणजे रंगभूमीवर आणून प्रेक्षक जनांकडून शाबासकी मिळविलें! तशांत जर कां हें पोर आणखी संगीत जाणत असेल तर मग त्यानें आपल्या भूमिकेची कमालच केली म्हणावयाचें! या अशा पात्रास उत्तरोत्तर मुखावर रोमोद्भव होऊं लागल्यास दर शनिवारीं बुधवारीं नाटकाम दाढी—मिशी अर्पण करावी लागते! पुढें त्याचा जन्म कसा जात असेल तें वाचक जाणतीलच!!

पुण्यांत नाटकास जाणारीं व तो ‘ चॉन्स ’ न दवडणारीं बहुतेक शाळेंतील मुलेंच दृष्टीस पडतात! जे परस्थ गृहस्थ आपल्या मुलांस पुण्यांत पाठवि-

तात त्यांचीं मुलें आपला विद्याभ्यास करून इतर सर्व गुणांत पुण्यांत पूर्ण होत असतील! नाहीं बरें? नाटक-प्रयोगाचे वेळीं कांहीं मुलें आमचे पाहण्यांत आलीं, त्यांत कोणी विड्यांचे झुरक्यावर झुरके मारून बंबाप्रमाणें धुराचा लोट सोडीत असतो, कोणी पानतमाखू खाऊन त्यांच्या पिचकाऱ्यांनीं नाटकगृह लाल करीत असतो, कोणी सोडा वॉटर लेमनेडचीं बुचें फडाफड उडवून बाटली तोंडास लावितो, कोणी रंगभूमीवर स्त्रीपात्र आपलें काम बजावीत असतां पुढील चरण आपणच बोलतो, कोणी 'चुकलास रे चुकलास' असें मोठ्यानें ह्मणतो, कोणी किर्लोसकरकृत पुस्तकच बरोबर घेऊन 'लेसन' (धडा) घेतल्याप्रमाणें पात्राची तुलना करितो, कोणी ह्मणतो 'आतां भावड्या येईल,' कोणी म्हणतो 'आतां मोरोबा येईल,' कोणी ह्मणतो 'आतां नाटेकर,' कोणी म्हणतो मुजुमदार, कोणी 'विष्ण्या-राम्या-गोम्या येतील.' अशीं पात्रें येण्या पूर्वीच त्यांचीं नांवें फडाफड घेतो! हे रसिकजन महिन्यांतून निदान तीन चार नाटकें झोडण्यांत बहुधा कमी पडूं देत नाहींत! कदाचित् नाटकास उदाराश्रय देण्याकरितां पैसे न मिळाल्यास बुधवार-रविवारच्या फुटक्या बाजारांत आपलीं किंवा समयाविशेषीं दुसऱ्याचींही पुस्तकें विकून ठिकून त्यांचे पैसे टिकिटांच्या रूपानें खर्ची घालण्याचे कामीं ते प्रविण झालेले असतात! कांहीं मुलांस जर हेंही साधलें नाहीं तर तीं नाटकगृहाचे दारापाशीं येऊन

खळखळां रडतात, मग कोणी तरी उदारधी नाटकवाला त्यांस आंत घेऊन जातो. आह्मी हा जो प्रकार वर सांगितला आहे तो अतिशयोक्तीचा आहे असें मात्र कोणी किमपिही समजूं नये.

'नाटक गुल हौशी' लोक नाटक पाहून घरीं आल्यावर त्यांतील गुणानुवाद दुसरें नाटक पाहीपर्यंत बोलत असतात. वाचक हो! आह्मा महाराष्ट्रवासी जनास हें नाटकाचें सुख उत्तम मिळूं लागलें आहे. मग आमचे घरांत कोणी कां येईना! कोणी का सर्व बुचाडून नेईना! कांचा मिळून पांचांचें का हरण होईना! पण नाट्यकला दिवसानुदिवस सुधारून रंगभूमीवर दिल्लीपतीची—शिवछत्रपतीची—त्याचे अष्ट प्रधानां पैकीं एकाद्याची, रंगी नायकिणीची—खवलेशास्त्र्याची—डॉक्टर् फ्रेंड्ची भूमिका ( पार्ट् ) रंगभूमीवर आह्मांस मिळाली ह्मणजे आह्मी कायते कृतकृत्य झालों—आमचा देश परराष्ट्राच्या दाढेपासून मुक्त केला—भयंकर दुष्काळा पासून सोडवून आह्मी सुखी झालों! असें समजावयाचें! असेंच ना!!

**चैनबाजीः**—पूर्वीं पासून ह्या महाराष्ट्रांत व त्यांतही पुणें शहरांत चैनबाजीचा प्रकार होताच; पण त्यावेळीं लोकांचे दिवस मुख्यत्वें दंग्याधोप्यांत व मोहिमेवर जाण्या येण्यांत, गुंतलेले असल्यामुळें, शेवटचे बाजीरावी पर्यंत तो चैनीचा प्रकार कमीच होता म्हटल्यास चालेल. पण पुढें रावबाजींनीं चैनबाजीचा कळसच केला होता ह्मणून आनंदफंदीनें बाजीराया वरील आपले पवाड्यांत " उटचा के-

शरी, टिळा कस्तुरी, कमालखानी हार गजरे । गहिनाजी बहिनाजी अक्षय जवळ पालखिच्या हुजरे॥' वगैरे उल्लेख आणलेला आहे[1]. बाजीरायास नुसता नौकर ठेवणें झाल्यास त्याचीं १८ कलमें तो पाहत असे ह्मणून सांगतात. तीं १८ कलमें हीं होतीं:—

( १ ) पागोटें पट्टीदार—कंगणीदार.
( २ ) शेंडी संजाबदार ( ३ ) भिवया कमानदार.
( ४ ) मिशा कल्लेदार—फुन्नेदार.
( ५ ) ओंठ पोंवळेंदार ( ६ ) काय लिंबदार.
( ७ ) आंगरखा तंगदार—कंठीदार—पेलेदार.
( ८ ) निऱ्या कठारेदार. ( ९ ) कांसोटा तंगदार.
(१०) जोडा आणीदार. ( ११ )बोलणें खुबीदार.

---

१ रावबाजीची पालखी वाहणारा एक भोई पुण्यांत अजून जिवंत आहे. त्याचें वय हल्लीं शंभराजवळ असून, तो यद्यपि अक्षर—शत्रु आहे व त्याचे अंगावरील सारे केंस जरी पिकून झडले आहेत तरी त्याचे स्मरणशक्तीस कांहीं विकार न होतां या बाजी संबंधानें ऐतिहासिक माहिती तो हुबेहुब सांगतो. त्यानें आम्हांस ह्या रावबाजीचे चैनीचे असे अनेक प्रकार सांगितले आहेत. त्याची साद्यंत हकीकत लिहिली असतां त्याचा एक ग्रंथच होईल—तो ह्मणतो श्रीमंतांपाशीं आह्मी एक हजार भोई होतों, महाराजांची पालखी सर्व सोन्या रुप्यानें मढविली होती. आंत मोत्यांच्या झालरी होत्या. पालखीची सर्व शोभा वर्णनीय होती. रावबाजीचे वेळीं पुणें गोकुळासारखें नांदत होतें. महाराज कृष्णा प्रमाणें असून पुण्यांतील कैक स्त्रिया त्यांच्याशीं गोपी प्रमाणें आचरण करीत होत्या ! कोणती तरी सुंदर स्त्री महाराजांपाशीं बसल्या शिवाय पालखी उचलण्याची पाळी आम्हांस बहुधा आलीच नाहीं. एखादी सुंदरी रस्त्यांतून नटत मुरडत चालली असतां श्रीमंतांपाशीं आणण्याचा हुकूम होता. मर्जी प्रमाणें स्त्री-पात्र किंवा सुंदरी त्यांपुढें उभी केली म्हणजे आम्हांस मोठें बक्षीस मिळे, इ० "

(१२) हंसणें मोहकदार. (१३) बसणें ऐटदार.
(१४) चालणें टुमदार. (१५) खाणें मजेदार.
(१६) गंध मोहरकेदार. (१७) अक्षर वळणदार.
व शेवटीं (१८) बायको छानदार !

पुण्यांत हल्लीं चैनबाजीचा प्रकार इतका वाढला आहे कीं, त्याचें कोणासही आश्चर्य वाटल्यावांचून राहणार नाहीं. सकाळीं फाटकेंतुटकें धोतर नेसून बगलेंत धोकटी अडकवून जाणारा राम्या न्हावी संध्याकाळचे वेळीं पाहिला तर त्याचें तें गुलाबी धोतर, तसेंच सुरकुत्या रहित कसाविणी थाटाची चापचोपलेली चट्टीपट्टी, त्याचा पेल्दार मराठेशाही किंवा भट्टीरवेशी तंग व खडखडीत आंगरखा, डोक्यास एक लफ्फेदार पगडी किंवा पागोटें, कानांत एक खोटचा मोत्यांची भपकेदार बाळी, हातांत सोनापितळेचें सलकडें, कानांत सुगंधी तेलाचे चिंदलेले बोळे, पायांत रोगणी बूट किंवा पुणेंशाई लालभडक जोडा, खांद्यावर चुण्या काढलेली रुईफुली उपरणीं, हातांत एक काठी ( पण बहुधा छडी ) व मणगटांत एक सुवासिक मोतियाचा गजरा अडकवून, मोठ्या डामडौलानें नानावडीसारखा मोतींचौकांतून बावनखणींतून किंवा शुक्रवारांतून वर खालीं मान करीत करीत ऐटीनें इ-कडून तिकडे व ह्या पेठेंतून त्या पेठेंत चालतांना दृष्टीस पडतो !

कोठें कोठें सायंकाळीं व रात्रीं रस्त्यांतून जा-तांना गल्लच्या गल्ल्यांनीं व माड्या माड्यांनीं तंतुवा-द्यांचा सुस्वर व मधुरध्वनि; कोठें कोठें किर्लोस्कर-

कृत छंदी नाटकांचीं पदें; कोठें गुलछबेलीचीं नाना रागिणींवर आलाप व हेल काढ काढून मोहयुक्त पदें ऐकूं यावयाचीं. कोठें पहावें तों साध्या, किनखापी किंवा बारारंगीढंगी चंच्या सोडून पानतंबाखु चघळीत बसणाऱ्या चैनी लोकांचे थवे; कोठें नुसत्या सुकया बाता झोंकीत व जांभया देत बसणारे भांग्या मारुती जवळील आळशी मोहोरके; कोठें नुस्ती माडी पहात पहात भटकणारे रात्रीचे भटके; कोठें नाटक-प्रयोग पहाण्याकरितां लांब लांब पाय पेंचीत धांवणारे अल्प व तरुण बांड; कोठें 'छुम् छुम्' आवाज काढीत व आपल्या नेत्र धनुष्यांनीं कटाक्षशर फेंकून तरुणांचें हृदय भेदीत जाणाऱ्या वारांगना; कोठें सुंदर रथांतून सुंदर आभरणांनीं युक्त असे सुंदर श्रीमंत लोक; कोठें पगडचा फिरवून व ऐटबाजीनें एकादें माशुक पात्र बरोबर घेऊन भाडोत्री गाड्यांवर गाड्या चमकावीत जाणारे गुलहौशी; कोठें देवालयांतून नुसता स्त्री-समूह पाहण्याकरितां किंवा प्रिय पात्रांवर डोळा फेंकण्याकरितां किंवा साधल्यास एकादा नवा जुना × × बगलेंत मारण्याकरितां किंवा गर्दींत खिसे कातरण्याकरितां किंवा एकादा नाटकी पोऱ्या स्त्रीवेष घेऊन स्त्री-समूहांत ढुंगणास ढुंगण लावून बसण्याकरितां घुसणारा लफंग्या व कोठें चांडाळ चौकडे; कोठें नुस्ती सुंदर माडी चढून सकुमार व गोंडस हातांतील एकादा 'विडा' तोंडांत घेण्याकरितां गुंतलेला इष्कबाज; कोठें डियर फ्रेंड्सीं, वर्तमान-पत्रांतील बाता झोंकीत जाणारा,

व डोळ्यांस उपनेत्र अडकाऊन वर मुंडी करीत चाललेला एडिटर सांब; कोठें दारू पिऊन, मस्त होऊन, झुकांड्यावर झुकांड्या खात, व साधल्यास गटारें तपाशीत, जाणारा बाटलीबाज; कोठें इंग्रजी भटारखान्यांतून हाडुकें चघळून व तुकडे मोडून जीभ चाटीत आलेला बुद्धिमान् नरश्रेष्ठ; कोठें सुंदर रथांत बसून जाणाऱ्या तंग कंबरबंदाच्या व फुललेल्या छातीच्या मडमेकडे वांक वांकून पाहणारा व लाल घोटींत जाणारा 'ग्रॅज्युएट;' कोठें दिवसभर थकून व खर्डे घास घासून सुकया ऐटीनें चालणारा चाकरमानी; कोठें 'डोळेभर' छक्कड पाहून तेथील विचकट लावण्यांनीं आपलीं कर्णेंद्रियें तृप्त करणारा तमासगीर; कोठें ब्राह्मणी जोडा लेऊन आपल्या प्रिय पतींबरोबर फिरणारीं सुशिक्षीत ब्राह्मणी अगर त्यांचीं जोडपीं; कोठें सुंदर जोडी घोड्यांचे गाडींत बसून शाळेंत जाणाऱ्या सुंदर पोरी विद्यार्थिनी; कोठें हिंदुस्त्रिया ( कुमारिका नव्हे ! ) इंग्रजी बूट व मोजे घालून हातांत 'लठ्ठ' बूक घेऊन मडमीसंगें ताड ताड इंग्रजी बाता फोडीत जाणाऱ्या सुधारणेच्छु ( ऊर्फ देशोन्नति करणाऱ्या ) ; कोठें काय कोठें काय वगैरे बहारीची व हल्लींच्या एकुणिसाव्या शतकांतील सुधारणेस योग्य अशी मौज या पुणें शहरांत दृष्टीस पडते ! !

इकडे शहराचे बाहेर सुधारणेच्या 'फयाशनच्या' अत्युच्च शिखरास पावलेले साहेब व आमचे

राज्यकर्ते व त्यांच्या मडमा, हा समूहही चैनींत गुंग झालेला दृष्टीस पडतो. कोठें उंच पण नाजुक रथांत भव्य केप किंवा आरबी घोडे जुंपून सहल करणारीं शुभ्र जोडप्यांच्या जोडपीं; कोठें उंच कोंच बाकांवर बसून हातांत लगाम धरून पुरुषा सारखा पण तंग पोषाख-तशीच टोपी चढवून फिरणारी एकटीच साहेबीण; कोठें अविवाहित मुसमुशित—नव-यौवना-तरुण बांडाकडे नेत्रकटाक्ष फेंकून व स्मित-वदन करून ताड ताड घोडे फेंकीत एकटीच जा-णारी गुलाबकळी; कोठें तरुणीच्या मागें घिरट्या घालीत फिरणारा तरुण एरंड; कोठें हातांत हात घालून कानाशीं लागून कंकण तुल्य कटीनें युक्त व यौवनावस्थेनें फुर फुरलेल्या तरुणीचे शब्द झेलीत जाणारा तरूण; कोठें घोड्यापुढें घोडा जुंपून दुचा-की, उंच, उघड्या रथांतून, हातमोजे लेवून घो-ड्यावर चाबूक ओढीत व रस्त्यांत एकादा गौरकाय मिळाल्यास त्यास गाडींत ओढून घेऊन, 'पैस पैस' करीत व त्याच्या कानाशीं लागत जाणारी नखरेबाज कोरी—गोरी; कोठें शुभ्र सडे टाकून व मध्यें जाळी लटकावून व्यायाम—भूमींत दोहोंबाजूस एकमेकांवर मृदु चेंडू फेंकीत थय् थय् नाचणारी विलासी जोडपीं; कोठें फॅशनवर फॅशन व ताणावर ताण करून डोळ्यांस उपनेत्र अडकावून रोज नवीन नवीन आ-भरणांनीं युक्त अशा तरूण मडमा; कोणी चंद्र-कळा किंवा लालभडक नागपुरी लुगड्याचे झगे, कोणी हातांत बांगड्या, कोणी सोन्याचीं कंकणें,

कोणी चंद्रहार, गळसरी, कोणी भरगच्ची कंबरपट्टा; कोणी बोटांत झकूझक् झळकणाऱ्या हिऱ्यांच्या आंगठ्या, कोणी वेणींत चंद्रकोर, कोणी बुचड्यांत सुवर्णफूल, वगैरे नानाविध प्रकारें व मनास मानेल त्याप्रमाणें हिंदुस्त्रियांचें अनुकरण करणाऱ्या ' फॅन्सी बॉलहितचञ्च !!! ' याप्रमाणें शहराबाहेर सुधारलेल्या साहेब लोकांच्या वस्तींत ही मौज दृष्टीस पडते !!!!

**विद्याभ्यासः**—पुण्याप्रमाणें मानेचा कांटा मोडून अभ्यास करणारे तीव्र अभ्यासी इतर ठिकाणीं थोडेच असतील व त्याप्रमाणेंच गालफडें बसलेले, डोळे पाताळांत गेलेले, नजर मंद झालेले, वाऱ्यानें हालणारे, क्षयरोगी, पाक खाणारे, चाटणीं चाटणारे, बाटली घेऊन दवाखान्यांत पेंगत जाणारे व ट्रीचरच्या शॉप मधून ' इन व्हॅलिड पोर्ट् ' किंवा ' कॉड लिव्हर ऑईल ' मागविणारे विद्यार्थी व विद्वानही इतर ठिकाणीं थोडेच असतील !

पेशवाईंत ह्याचे उलट प्रकार दृष्टीस पडत होता. पुणें शहरांत व आसपासचे सातार प्रांतांत, धट्टकट्ट, कसलेले, नादबिंद, पिळदार व मोकार बांध्याचे व पटाईत असे लोक असत. त्यांच्याप्रमाणें जोरदार व सशक्त लोक महाराष्ट्रांत किंबहुना सर्व हिंदुस्थानांत थोडेच होते. पण शेवटचे ढिल्या बाजीरायानें लोकांस लाडुभोजन दे—देऊन आपणासारखें अगदीं ढिले करून सोडिले. व त्यांची संततीही पुढें निर्जीव होत चालली. हल्लीं ह्या

विद्यामायेनें लोकांस अगदीं वेड लाविलें आहे. इं-ग्रजी विद्या आमचे पदरांत पडल्यापासून ज्यास त्यास आपल्या मुलांस इंग्रजी उंच प्रतीचें शिक्षण देण्याची आशा लागली आहे. पण ही संपाद-ण्यास मुलांचें किती बरें रक्त आटतें ह्याचा कोणी विचार करितो काय? केव्हां केव्हां तर सोन्याचा घास उचलितां उचलितां त्याच्या हातांत तो तसाच राहून बिचाऱ्यास 'राम' ह्मणावें लागतें!! या-प्रमाणें आमच्यांतील असे नामी नामी विद्वान अ-कालीं मृत्युमुखीं पडून एकंदर देशाचें केवढें दुर्दैव ओढवत आहे हें आपण पहातोंच आहों!!!

खरोखर पाहिलें असतां आह्मी महाराष्ट्र जन, ज्यांचे वडिलांनीं घडीव दगडाचे किल्ल्यांवर सपासा-रखें चढून गडावर गड घेतले, ज्यांनीं डोके फिर-विले असतां प्रतिपक्षांचे लोकांचें काळीज चर् चर् कांपे, ज्यांनीं हातांत पट्टा घेतला असतां शें-पन्नास वीरांस ते चीत करून सोडीत, ज्या आमचे पूर्व-जांनीं कट्ट्या म्लेंच्छांस स्वप्नांत देखील वरळावयास लाविलें, ज्यांनीं शत्रूंचीं शिरें कापून त्यांच्या शें-ड्यास शेंड्या गांठवून त्यांचे भारे डोई खांद्यावर आणिले, ज्यांनीं हिरव्या मक्या बाजरीच्या क-णसांवर कांहीं दिवस काढिले, ज्यांनीं आतांप्रमाणें आगगाड्या वगैरेचें कांहीं साधन नसतां भयंकर नद्द नद्या, नाले, ओहळ रात्रीचा दिवस करून ओलांडून तुडवून परदेश काढिले, ज्यांनीं आपल्या स्त्रिया झा-डांच्या बाळलेल्या पानांत ठेवून परशत्रूपासून त्यांचा

बचाव केला व ज्या आमचे वडिलांनीं आपल्या मनगटाचे जोरावर आपला पूज्य धर्म स्थापून त्या प्रीत्यर्थ व देशा प्रीत्यर्थ आपले देह धारा—तीर्थीं ठेविले; त्यांचे वीर्यापासून झालेले जे आह्मी त्यांची स्थिति ही अशी ! ' आलीया भोगासीं असावें सादर ' असेंच ह्मटलें पाहिजे. दुसरें काय ???

हल्लीं पुण्यांत लहान मोठ्या ११६ शाळा असून चार कॉलेजें आहेत. ह्या सर्वांत सुमार ११००० विद्यार्थी आहेत. पुण्याप्रमाणें तीव्र बुद्धीचे व कंबर बांधून विद्या शिकणारे व शिकविणारे दुसरे कोठेंही नसतील व यामुळेंच मुंबई, सोलापूर, सातारा, कोल्हापूर वगैरे ठिकाणचीं मुलें अभ्यास करण्याकरितां पुण्यांतच लोटतात. ब्राह्मण—वस्तींत गल्लोगल्लीं तीन अक्षरांच्या पदव्या पटकाविलेले लोक आढळतात. व आळो आळीं इंग्रजीची संथा चाललेली ऐकूं येते. असा एकही रस्ता, बोळ, वाडा, माडी, घर, झोंपडें बहुधां सांपडावयाचें कीं नाहीं जेथें इंग्रजीची हालचाल नाहीं. सकाळीं दहा—साडेदहा वाजतां व संध्याकाळीं पांच—साडेपांच वाजतां रस्त्यांत पहावें तों सर्व रस्ते या विद्यार्थी—समुहानें फुललेले दिसतात. व ह्यांत देखील ' खाविंदचरणारविंदीं मिलिंदायमान ' होणाऱ्यांचीही मिसळ असते. त्यांतही १०—१०॥ च्या सुमारास जी मौज दिसते ती कांहीं चमत्कारिकच, हातांत बुकांची चवड घेऊन धांवत पळत, टोपी सांवरीत, छत्री घेतलेला विद्यार्थी तोंडानें कांहीं पुटपुटत, घंटा वाजायाचे आंत शाळेंत

दाखल होण्याकरितां 'चिंतातुर होत्साता' पाहून फारच मौज वाटते. व कालमाहात्म्य कसें असतें याचें नवल वाटतें.

येथें शिकलेले लोक फार व शिकणारेही फार तेव्हां मुलांस कोणत्याही विषयाची फोड करून व समजून घेण्यास फार श्रम पडत नाहींत. तसेंच लोकांचें विद्येकडे अधिक लक्ष्य असल्यामुळें राजकीय किंवा कोणत्याही विषयाची किंवा सार्वजनिक कामाची चळवळ ह्या पुण्यांतच फार आढळते.

बाहेर गांवच्या मुलांकरितां येथें सोईवार खाणावळी अनेक आहेत. ट्रेनिंग कॉलेजांतील विद्यार्थ्यांकरितां जें 'बोर्डिंग हौस' आहे त्यांतही इतर शाळांतील कांहीं विद्यार्थ्यांचा त्यांची इच्छा असल्यास समावेश होतो. मराठ्यांचे मुलांकरितांही येथें एक 'सुशिक्षण गृह' नुकतेंच स्थापन झालें आहे. येथें त्यांची खाण्यापिण्याची चांगली सोय आहे. पुण्यांतील बहुतेक शाळा व शिकलेले लोक यांचें वास्तव्य शहरांतच आहे. त्यामुळें शहरांत लोक–वस्तीची बरीच दाटी झाली आहे व ह्या दाटीमुळें घाण वाढत चालली आहे. ह्या वरील कारणानें केव्हां केव्हां प्राणनाशक रोग उद्भवतो. पुण्यांत मुलें ठेवणाऱ्या गृहस्थांस मुंबईच्या मानानें फार कमी तरी दरमहा सुमारें एकंदर ८।१० रुपयांचा खर्च सहज होतो; त्यामुळें गरीबगुरिबांचे मुलांस पुण्यांत येऊन ह्या विद्येचें व तिच्या मिषानें नाटकें झोडण्याचें होत नाहीं. तथापि मधुकरी मागून अगर

घार लावून शिकणारीं व प्रसंग सांपडल्यास नाटकास उदार अश्रय देणारीं, नाटक करून दाखविणारीं व छक्कडी झोडणारीं मुलेंही कमी नाहींत ! !

**सण**:—पुणें हें महाराष्ट्र देशाच्या राजधानीचें ठिकाण असून तशांत ब्राह्मणी दरबार असल्यामुळें हिंदूंचे सर्व लहान मोठे सण येथें थाटदार रीतीनें होत असत. त्यावेळीं सर्व कांहीं मजा होत्या. सर्व सणांत अगदीं अग्रगण्य सण कायतो दसऱ्याचा मानला होता. ह्याचें वर्णन वाचकां करितां येथें देतों. म्हणजे त्यावरून इतर सणांचीही बहुतेक कल्पना होईल. दसरा येणार त्याचे पूर्वीच पुणें शहरांत मोठी धामधूम उडत असे; व मग त्या मुख्य दिवशीं तर मोठाच आनंद उडावयाचा. शहर नानाप्रकारें रंग देऊन शृंगारीत असत, व जिकडे तिकडे आनंदी आनंद चालत असे, सर्व रस्त्यांनीं कुंकुमाचे नानारंगी सडे घालीत असत, नागरिकजन आपल्या महिरपदार खिडक्यांतून व दारांतून फुलांचे—हार—तुरे—गजरे लटकावीत असत व जिकडे तिकडे गुढ्या तोरणें उभारीत असत, सर्व रस्त्यांतून माणसांचा एक सारखा रव चालत असे. स्त्रिया मूल्यवान् डागडागिने लेवून झरोक्यांतून, बाहेरील धामधूम पाहण्यांत गुंतल्या असत. सर्व शहरभर चिराकदान करीत असत. गल्ली—गल्लीं वेदघोष चालत असे व सोंवळें भाडें घेऊन लगबगीनें इकडून तिकडे धांवतांना भटभिक्षुक—पाढ्ये—दीक्षित—आचार्य यांची तारांबळ उडत असे. मराठे वीरांची तर ह्या वेळीं

मोठीच गडबड दिसे. त्यांस त्यांच्या मुख्यांकडून ह्या दिवशीं नवीन अलंकार–वस्त्रें मिळत असत, ते आपलीं सर्व हत्यारें[1] अगदीं साफसूफ करून घरांत त्यांची पूजा करीत असत, त्यांस कोंबडी बकऱ्यांचा नैवेद्य अर्पण करीत असत, ह्मणजे त्यांचे रक्तानें हत्यारांस लालभडक टिळे लावीत असत, त्यांचे थवे रस्त्यांतून इकडे तिकडे धांदलीनें जातांना दृष्टीस पडत, ह्या वीरांच्या पिळींव पागोट्यांचे लफ्फेदार पदर त्यांच्या भव्य पाठीवर लोळत जातांना दृष्टीस पडत, त्यांचे कानांत झळकणारे हिरे—माणकें–मोत्यांचे जडाव–चौकडे लोंबतांना दिसत, त्यांची कंबर विषारी शस्त्रांनीं व मजबूत शेल्यांनीं वेष्टिलेली दिसे, ते भव्य घोड्यावर बसले असून त्यांचे हात, पाणीदार तरवारी व भाले सांवरण्यांत गुंतलेले दिसत, त्यांचे अंगांत तंग—पेलेदार—शुभ्र व झरझरीत असे अगरखे असल्यामुळें त्यांचें पिळींव शरीर जखडून टाकिलेलें दिसे, व एकंदरींत ती उमदी–क्रूर—प्रसन्न–व विलक्षण मुद्रा त्यांच्या मनांतील विचारांप्रमाणें–कल्पनें प्रमाणें रंगीबेरंगी दिसत असे ! !

या दिवशींचा सायंकाळचा थाट मोठा मजेदार दिसे. पेशवे आपली सर्व फौज तयार करीत असत. ही फौज सीमोल्लंघनाचीच लूट करावयास तयार होई एवढेंच नव्हे, पण नव्या मोहिमेवर

१ टी० हल्लीं ह्या हत्यारां ऐवजीं विळे, कोयते वगैरेंची पूजा करण्यांत येते. व पोपया वगैरे फळें कापून त्यांस सेंदूर फांसून तोच नैवेद्य समजला जातो.

जाण्याचाही हाच दिवस नेमलेला असे. आतां ह्याच दिवशीं जरी घरांतून पाय बाहेर पडत नसे, तरी पण दुसरे सकाळीं एक मुक्काम व्हावयाचाच. पेशवाईंतील सीमोल्लंघनाचें मैदान हल्लींच्या गारपिरापाशीं असे, त्या ठिकाणीं शमीचे मोठमोठे वृक्ष राखून ठेविलेले होते; व शिवाय एक दोन बिघे जमीनींत धान्यही पेरलेलें असे. हल्लीं नऊ दिवस आह्मी घरांतील धान्याची जशी जोपा करितों तशी तेथें करीत असत.

संध्याकाळचे समयीं श्रीमंतांची स्वारी शनवारच्या वाड्यांतून बाहेर निघून सुंदर हत्तीच्या अंबारींत विराजित झाली कीं, धडाधड तोफांचे असंख्य आवाज निघत. एकंदर स्वारीच्या अगदीं अघाडीस हत्तीवर मराठ्यांचा जरीपटका असे, त्याचे मागून लष्करी बाजा-वाजंत्री, त्यांचे मागून लष्कर (पायदळ व स्वार,) त्यांचे मागून श्रीमंतांचा मव्य हत्ती, त्याचे मागून होळकर शिंदे वगैरे बडे बडे सरदार व मानकरी, त्यांचे मागून गांवांतील सर्व गृहस्थ मंडळींचा घोंटाळा व त्यांचे मागून शहरांतील गवय्ये-बजवय्ये-ढोलके-डफय्ये-यांची एकच घाई; ह्याप्रमाणें एकंदर स्वारीचा थाट मोठा अवर्णनीय दृष्टीस पडत असे! मुख्य जरीपटक्याचें निशाण जर हल्लींच्या कलेक्टर कचेरीजवळ तर पेशव्यांचा हत्ती शनवारच्या वाड्यापाशीं. हल्लीं ताबूताचे दिवशीं जसे हजारों नगरवासी जन रस्तोरस्तीं, माड्यामाड्यांनीं व छप्परा छप्परांनीं मजा पहावयास बसतात, तसा

ह्या थाट पहाण्यांत इतर जनसमूह गुंतलेला दिसे. पेशवे ह्या गारपिराचे मैदानांत येऊन तेथें शमीपूजन होऊन भटभिक्षुकांस असंख्य द्रव्य वाटीत व लागलींच निशाणी तोफ सुटत असे. तिचा आवाज डोंगरी किल्यांत जाऊन पोंहचतांच तेथील तोफखाना सुरू व्हावयाचा, तेणेंकरून पुण्यांत व आसपास पुष्कळ दूरवर विजांच्या गडगडाटांप्रमाणें दणदणाट सुटून जात असे. नंतर पेशव्यांचें सैन्य शमीचे वृक्षावर व त्या धान्यावर एकदम तुटून पडावयाचें. ह्या वेळीं येखाद्या लुटूपटूच्या लढाईचा देखावा नजरेस पडावयाचा. तेथून ही वरात मिरवत मिरवत आस्ते-आस्ते परत शनवारचे वाड्यासमोर आल्यावर तेथें दरबार भरत असे. पेशवे मोठ्या आनंदानें बरोबरच्या लढाऊ शिपायांस सोने देऊन "सोने मिळवून आणा—व आपला धर्म सोन्यासारखा पाळा" असें सांगून निरोप देत असत. नंतर हें शूर शिपायी आपल्या आप्तवर्गास, इष्ट मित्रांस सोने देऊन ती सारी रात्र आनंदानें, बोलण्या-चालण्यांत, घरची व्यवस्था करण्यांत घालवून दिवसास गोंडा फुटण्यापूर्वीं घरांतून बाहेर निघत असत! त्या वेळीं ह्या सैन्यास पोंचविण्यास सर्व शहर लोटलें असे. कधीं कधीं ह्या मोहिमेवर पेशवेही बरोबरच निघत असत. असो. आलीकडे ह्मणजे पेशवाईचे अखेरीस ( बाजीराव--शाईत ) दसरा जाऊन शिमग्याचा सण फार मातला होता. ह्या सणांत सर्व पुणें शहरांत जो कांहीं निंद्य प्रकार होई त्याचें येथें वर्णन देऊन

आह्मी आमची लेखणी विटाळीत नाहीं. एवढें मात्र सांगतों कीं, सर्व रस्ते गुलालानें व रंगानें नाहिलेले असत. पांच दिवस स्त्रियांस घराबाहेर निघण्याची सोय नसे, सर्व लोकांचीं वस्त्राभरणें रंगांनीं माखलीं जात व रावबाजी तर आपल्या पुष्ट बैलांच्या गाड्यांतून रंगांचीं हजार--पांचशें पात्रें भरभरून, पिचकाऱ्या घेऊन स्त्री—पात्रें सांपडल्यास त्यांवर * रंगाचा वर्षाव करीत, व रंग उडविण्यांत दंग होत्साता चालत असे !

आजकाल हे सर्व हिंदूंचे सण मावळले, हे सर्व बहारीचे दिवस गेले, व सर्व झालें ! आतांची वेळ कांहीं वेगळीच प्राप्त झाली आहे. हल्लीं पुण्यांत दसऱ्याचे सणांत निरनिराळ्या पेठेंत आपल्याच्या झाडाची एकादि फांदी तिष्ठ्यावर रोंवितात. कांहीं जण शहराबाहेर जातात. व आमचे सुधारलेले ( किंवा नांवाजलेले कां म्हणाना ) लोक हें सर्व " मूट " आहे, असें मानून घरींच " चूप " बसतात, किंवा वाटल्यास हिराबागेंत अगर इतर कोठें तरी 'देशोन्नतीचें पांघरूण घातलेलें' एकादें व्याख्यान झोडितात.

धंदे:—आपल्या लोकांच्या पूर्वींच्या व हल्लींच्या धंद्यांत जमीन अस्मानाचा फेर झाला आहे.

---

* बुधवारांतून जाण्या येण्यास बुधवारचा शिक्का पाठीवर मिळत असे. हा शिक्का मोठा असून त्यावर विभच्छ अक्षरें कोरिलीं होतीं. हे बुधवारचे शिक्के कांहीं जुन्या घराण्यांत कपड्यावर मारिलेले अजून आहेत.

पूर्वी लढाईचे प्रसंग वारंवार पडत. तेव्हां लढाऊ व कारस्थानीं जातींशिवाय इतर लोक नानाप्रकारचे धंदे करून निर्वाह करीत असत. हे धंदे देशांतले देशांत असून ते करणारांस व इतर लोकांसही विशेष फायदा होत असे. हल्लींप्रमाणें पगाराचीच वाट पाहणारे अगर मोठा पगार असला तरी दरघडीस पगाराचा वायदा करणारे ते नसून ते दोन पैसे बाळगून होते. फार दूरची गोष्ट नाहीं, पण पन्नास वर्षांपूर्वी पुणें शहरांतील दिवसभर खपणाऱ्या मजुरास दीड आण्यापासून दोन आण्यापर्यंत मजुरी मिळत असे. शेतीभाती करितां पैऱ्यांस एक आण्यापासून तों दीड आणा मिळत असे. कारागिरांस तीन आण्यापासून सहा आण्यापर्यंत ह्मणजे शिकस्त झाली. बायकांस पुरुषाचे पाउणपट व मुलांस निम्मे मिळत असे. तरी त्यांचा त्यांत गुजारा होऊन ते सुखी असत. हल्लीं असल्या हमालास ८।१० आणे रोज मिळाले तरीही बिचाऱ्याची ओढ कांहीं संपत नाहीं ! हें असें कां ? !

पूर्वापार ह्या पुण्यांत नाणीं चालत असत. त्यापासूनही सराफ वगैरे लोकांस विशेष फायदा होता. ह्या नाण्यांची याद येथें आमचे वाचकांकरितां देतों:—( १६७४–१६८० इ० ) ह्मणजे शिवाजीचे वेळीं सोन्याचीं नाणीं गद्दा, इब्रामी, मोहर, पुतळी, सतलामी, होन ( हे होन चौदा जातींचे होते:—पादशाही, संगेरी, अचुत्राई, देवराई, रामचंद्रराई, गुती, धारवाडी, शिवराई, कावेरीपाक,

मलकहट्टी, पालानाइकी, आद्वानी, जडमाली व ताडपत्री ) व फलम ( हे फलम बारा जातीचे होते:—अफराजी, त्रीमलहारी, त्रीशुळी, चांदवाडी, त्रिलधारी, अलफकरी, महंमदशाही, वेलुरी, काटेराई, देवगवली, रामनाथपुरी, व कनगोटी ) अशीं हीं मुख्य सात नाणीं ( व त्यांतील निरनिराळे प्रकार ) चालत होतीं. पेशव्यांचेवेळीं रुपये चालत होते ते येणेंप्रमाणें:—मल्हारशाही किंवा रास्ते यांचा रुपया, ( हल्लींच्या पंधरा आणे दराचा होता.) अंकुशी, ( हा तीन जातीचा होता. ( १ ) कोरा किंवा निर्मळ चापी, ( २ ) मध्यम चापी, व ( ३ ) नारायण चापी ) बेलापुरी व भटुरी ( हे १४ आणे दराचे होते. ) बोडकी व सुरती ( हे पावणे पंधरा आणे दराचे होते.) खेरीज जरीपटकी, कुलाबी, मिरजी, पोरबंदवाडी, फुलशहरी व टेंबुर्णी याप्रमाणें रुपये होते. ' शिक्के तीन जातीचे होते ह्मणजे हल्लीं शिक्का, श्री शिक्का व बांई शिक्का.

पुण्यांतील वजनी शेर ७८ भार ( हल्ली शिक्का ) आहे. पेशवाईंत हल्लीं शिक्का ७६ भारांचा शेर मानला होता, पण इंग्रजी झाल्यापासून त्यांनीं प्रथमत: ७८ भार शेर सदर बाजारांत चालू केला. तो तसाच अजून तेथें चालत आहे. शहरांत ७६ भारी शेर चालत होता, पण हल्लीं ह्या आठ दहा वर्षांत सरकाराचे मनांत साऱ्या पुण्यांत ७८ भारी शेर चालावा असें आल्यामुळें एकादा शेर कामांतून गेला ह्मणजे दुकानदारांस वरील ७८ भारी घ्यावा

लागत आहे. पेशवाईंत हल्लीं प्रमाणें शिक्के मोर्तबाचें लोखंडी माप क्वचित् होतें. फारकरून दगडांशीं व्यवहार होत असे, तरी पण पूर्वींचे व्यापारी सचोटीचे असल्यामुळें वजनांत बहुधा कांहीं लांडीलबाडी करीत नसत. हल्लीं हें दगडी वजन मंडईंत कोठें कोठें आढळतें. धान्याचें माप पूर्वीपार चालत आलेलें आहे. त्यांत सरकारानें अजून ' मुंबईच्या पायली प्रमाणें ' फेरफार केला नाहीं. धान्याचे शेरांत व वजनी शेरांत जवळ जवळ छटाकाचा फेर असतो. धान्याची बोली फार करून पल्लयावर असते. हा पल्ला १२० शेरांचा आहे. अडते. आळींत ( नानाच्या पेठेंत ) घाऊक दरानें धान्य खरेदी केल्यास पल्लयामागें दोन अडीच शेर वर मिळतात, पण त्यांत केरकचरा असून ते घोळून चाळून देत नाहींत. दाणें-आळींत माल साफसूफ मिळतो. पण व्यापारी लोक केव्हां केव्हां हलकें धान्य भारींत मिसळ करून गिऱ्हाइकाचे डोळ्यांत धूळ टाकण्यास चुकत नाहींत व केव्हां केव्हां मापांतही लबाडी करितात. धान्याचें माप अधोलीनें दोघे इसम एकदम मोजतात. त्या मोजण्याकडे मात्र ग्राहकानें लक्ष्य दिलें पाहिजे. व्यापारी लोक तांदुळ वगैरे दाखवितात एक व पदरांत घालतात एक असें हमेष होतें. इतर जिनसांतही केव्हां केव्हां असा प्रकार अनुभवास येतो. पुण्यांतील बाजार—भाव आठ पंधरा दिवशीं बदलत असतो. तेल, तूप, गूळ वगैरे जिन्नस एकदम चार

आठ मण घेतले असतां त्याची बोली धडीवरून करितात. मेहईची घडी ह्मणजे चार शेरांची होय. ही भाजीची घडी असें वाचकांनीं समजलें पाहिजे. पुणें शहरांत एकंदर बाजार २६ आहेत त्यांचा तपशील येणेंप्रमाणें:—९ भाजीचे ६ सागुतीचे (मटण) ३ मासलीचे, १ सर्पणाचा २ वैरणीचे, व ९धान्याचे. हें शहर पितळेच्या हरएक सामानाविषयीं, जरतारीविषयीं, तबकिरीविषयीं, सुगंधी सामानाविषयीं तसेंच दुसऱ्या अनेक जिनसांविषयीं प्रसिद्ध आहे. इ० स० १८८१ पासून तों १८८४ पर्यंत तीन वर्षांत शहरांतून ९,७२,६४२ बंगाली मण माल गेला त्याची किंमत ३३,४६,४९० रुपये होती. व बाहेरचा माल शहरांत आला तो ४८,८९,९२२ बंगाली मण होता. त्याची किंमत १,२९,९७,८२० होती. असा अजमास केला आहे. शहरांत पिण्याचे दारूचा खपही मनस्वी आहे. सन १८८२—८३ सालांत मुंढव्याच्या दारूच्या कारखान्यांतून[+] देशीदारू १३८७० मण आली त्याची किं० ५,९४,८०० होती. व ३९७० मण शहरांतून बाहेर गेली त्याची किंमत १,४२,८०० रुपये होती. वरील सालीं १७०९० मण इंग्रजी दारू आली त्याची किंमत १०,२९,४०० होती. ह्यांतून बाहेर (सातारा किंवा कर्नाटक) १४३२ मण गेली. त्याची किंमत ८९,९२० रुपये होती.

---

+ टीप—ह्या कारखान्याची सावंत माहिती आह्मीं दुसऱ्या भागांत दिली आहे.

हल्लींचे विद्वान् ( चार दोन परीक्षा दिलेले ) लोक शाळा स्थापून व शिकवण्या शिकवून आपलें पोट भरीत आहेत. येथें मुंबईसारखा जंगी व्यापार नसल्यामुळें चाकरमाणी लोक फारसे नाहींत. कांहीं सरकारी ऑफिसें स्थाईक असून रेलवे ऑफीसेंही आहेत. त्यांत कांहीं कामगार असतील तेव्हढेच. जीं सरकारी ऑफिसें आठ महिने प्रांतांत फिरावयास गेलीं असतील ती विश्रांती करितां चार महिने ( बरसातींत) पुण्यांत येतात. तेव्हां मात्र कामदारांची गर्दी होते. पुण्यांत एकंदर वकील १२६ आहेत व छापखानेवालेही बरेच असून वर्तमानपत्रेंही पुष्कळ निघतात त्यांत पुणें—वैभव, केसरी, ज्ञानप्रकाश, ज्ञानचक्षु, शिवाजी, जगद्धितेच्छु व मराठा ( हें शेवटचें पत्र निव्वळ इंग्रजी असतें ) हीं मुख्य आहेत. यामुळें पुण्यांतील हकीकत क्षुल्लक कां असेना पण ती बाहेर फुटण्यास व तिचा फैलावा होण्यास विलंब लागत नाहीं. वर्तमानपत्रांप्रमाणें मासिक पुस्तकांचाही येथें सुकाळ आहे. येथें एक चित्रशाळा ( तसबिरा काढण्याचा कारखाना ) सन १८७८ सालीं स्थापन झाला असून त्यांत फारच सुबक काम वठलें जातें, असा लौकिक आहे.

**चित्पावन[1] ब्राह्मण.**—पुण्यांत चित्पावन ब्रा-

---

( १ ) चित्पावन या शब्दाची साधनिका अनेक लोक अनेक प्रकारें करितात. चित्पावन ह्म॰ कोंकणस्थ, चिता—प्रेत= त्या चितेपासून पावन करून घेतले ते चित्पावन. हें तर सर्व श्रुत आहेच.

( पुढील पृष्ठ पहा. )

ह्मणांचीच वस्ती सुमार दहा हजारांवर असल्यामुळें व पेशवे हेही चित्पावन असल्यानें ह्या जातीबद्दल दोन शब्द सांगणें प्रशस्त दिसतें. ह्यांची मुळची वस्ती पश्चिम समुद्रतीरीं उत्तर कोंकणांत आहे. संभाजी राजास औरंगजेबानें ठार केल्यावर मुसलमानांचें पेंव कोंकणांत कोसळलें. व " जर ( द्रव्य ) सतकये जान, जान सतकये आब्रु, आब्रु सतकये इमान ( धर्म ) " ही म्हण त्यांचे हाडीं खिळल्यामुळें त्यांनीं हिंदु—धर्माचें वाटोळें करून आपल्या ' महंमद प्रणित ' धर्माचा फैलाव आरंभिला. त्यांच्या ह्या अशा हातचाईनें ब्राह्मणादि उंच जातींची कंबर खचत जाऊन ते फुटेल त्या मार्गानें पळत सुटले. ह्या बेबंदशाईत श्रीवर्धनकर भट बाळाजी विश्वनाथ साताऱ्यास येऊन सासवडचा कुळकर्णी महादाजी पुरंदरे यांचे आश्रयानें राहिले, व आपल्या शौर्यबळें करून छत्रपतींच्या

---

( मागील पृष्ठावरून. )

कित्येक यांची परंपरा इजिप्त पर्यंत पोहचवून " इजिप्तवान" = ' जित्पावन " = चित्पावन अशीही साधनिका जुळवितात. व त्यास आधार;—

केरलश्च तुलिंगाश्च तथा गौराष्ट्र वासिनः ।
कोंकणाश्च कुहालोश्च, वरालाटाश्च बर्बरा ॥ १॥
(१ सौराष्ट्र इति पाठभेदः २ करहाटाश्च इ॰ पा॰ भे॰)
स॰ ख॰ अ॰ ६

त्याप्रमाणेंच हे लोक बर्बरी ( इजिप्त ) देशांतून येऊन राहिले ह्मणून कोंकणास ' बर्बरी कोंकण ' असेंही म्हणण्याचा प्रघात दाखवितात. परंतु कोंकणास ' शूर्पारक ' देश असें भारतांत म्हटलें आहे.

मर्नीस उतरून त्यांचे पेशवे किंवा मुख्य प्रधान बनले. ह्यांनीच आपल्या चित्पावन जातीस पुढें नावारूपास आणिलें, किंबहुना त्यांस हल्लींच्या वैभवास चढविण्यासही तेच कारण झाले ह्मटल्यास हरकत येईलसें वाटत नाहीं.

बाळाजीचे पूर्वीं चित्पावन हे इकडे देशावर येत नसून इकडे त्यांची चहाही नव्हती. मराठेशाईंत देशस्थ ब्राह्मणांचाच चढता पायां असून ते मोठे कवी, हुद्देदार व राजकार्यधुरंधर होते. हे देशस्थ ब्राह्मण चित्पावनांस धिःकारून त्यांस हलके मानीत इतकें कीं, त्यांस आपल्या पंक्तीस घेणें हेंही त्यांना हलकें वाटत असे, पण बाळाजी विश्वनाथांस हा आपल्या जातीचा कमीपणा खात असे, त्यांनीं श्रीनिवास परशुराम पंडित प्रतिनिधि यांचे मुलाची मुंज कऱ्हाडापाशीं 'कोळेगांवीं' झाली, त्या वेळीं बहुत खटपट करून देशस्थ व चित्पावन ह्या उभय जातींचा समेट केला, व एका पंक्तीस बसवून पंक्तिव्यवहाराचा पाया घातला. नंतर इकडे मराठी राज्यांत बाळाजी विश्वनाथांचा उत्कर्ष होऊं लागल्यावर हळू हळू कोंकणचीं मुळें घाट चढून इकडे येऊं लागलीं, व इकडील काळीभोर जमीन

[ १ ] टीप—देशस्थ, कोंकणस्थ व कऱ्हाडे ह्या तीन जातींचें ऐक्य व्हावें या हेतूनें किंवा अशाच कांहीं हेतूनें नानासाहेब पेशवे ह्यांनींही ह्या जातींच्या मुलींबरोबर लग्नें लाविलीं, म्हणून ऐकिवांत आहे. पण कऱ्हाड्याची मुलगी केल्याचें कोठें सांपडत नाहीं. मात्र शके १६८२ सालीं पैठणचे देशस्थ ब्राम्हण सावकार वाखरे यांची मुलगी त्यांनीं केली खचित.

सुपीक देश, सपाट मैदान, व पोटभर अन्न पाहून एका पायावरच नाचून बाळाजीपंतांच्या छायेखालीं नांदूं लागलीं. पण प्रथम स्वयंपाकी, शागीर्द, धोतरबडवे, पुजारी वगैरे नीच कामें पतकरल्या वांचून त्यांस गत्यंतर नव्हतें. एके दिवशीं बाळाजींनीं महादोबा पुरंदरे यांस कांहीं कामाकरितां ग्रामांतरास जाण्यास सांगितलें. महादोबानें जाण्याचें लांबणीवर टाकिलें, ह्याचें कारण बाळाजीपंतांनीं त्यास विचारितां महादोबा ह्मणाला, 'मी एखादा चित्पावन पोऱ्या शागीर्द पहातों आहें तो मिळाल्यावर मी ग्रामांतरास जाईन.' आपली जात लोक इतकी नीच समजतात हें पाहून बाळाजीस फार वाईट वाटलें. त्यांनीं लगेच चित्पावनाचे दोनशें 'बोडेह' कोंकणांतून आणवून पुण्यांत ठेविले, व त्यांजकडून विद्याभ्यास करविण्यास तें झटून प्रयत्न करूं लागले. त्यावेळची विद्या ह्मणजे केमेस्ट्री, फिलॉलाजी, जिऑलाजी, जिऑग्रफी वगैरे प्रकारची नव्हती हें वाचक जाणतच आहेत. बाळाजी पेशव्यांनीं त्यांच्या मोडी अक्षरावर विशेष काळजी घेतली व केव्हां केव्हां ते स्वतःही वळणें घालून देत असत. हीं मुलें हुशार झाल्यावर बाळाजींनीं दप्तरी कामांत त्यांस हळू हळू घुसडून दिलें. प्रथम परभूचें चिटणिशी वळण असे तें सोडून कोंकणस्थांनीं आपलें बिवलकरी व जनोबाभट्टी अशीं दोन नवीनच वळणें स्थापित केलीं. पेशवे अमदानींत हे चांगलेच उदयास चढले. पेश-

वाई बुडाल्यावर ह्या जातीस पडती कळा आली; तथापि हे आपल्या बुद्धीनें व श्रमानें इतर लोकांस मागें पाडीत जाऊन हल्लीं तर इंग्रजी विद्येंत अगदीं लोळत पडले आहेत; व इंग्रजांचें अनुकरण करण्यांत ह्यांचेंच पाऊल पुढें आहे !

चित्पावनांचे अंगीं आर्जव—शक्ति विशेष असल्यामुळें ते कातळ फोडून, पाताळांत जाण्यास मार्ग नाहीं तरी पण आपल्या आर्जव—शक्तीच्यायोगें, तो मार्ग दुभागून, ते आपला प्रवेश करतील ! हे स्वजातीय पक्ष अधिक स्वीकारितात. कांहींकांत एक मात्र चाल अगदीं निंद्य आहे ती कोणती ह्मणाल तर ‘ मुली विकून पैसे घेण्याची. ’ साठ वर्षांचा ‘ कोंवळा ’ मुलगा जरी असला किंवा ह्या ‘ कोवळ्या ’ मुलास दमा खोकल्यानें खो—खो करावयास लावून जरी दमवून टाकिलें असलें किंवा ह्यास ह्मातारचळ लागून ‘ साठी बुद्धि नाठी ’ असें जरी झालें असलें तरी पण हे आपली सुकुमार पोरगी पैशाचे आशेनें तिचे वयाच्या प्रमाणानें ‘ दरवर्षास दर शेंकडा ’ रुपये घेऊन विकून टाकण्यास कमी करीत नाहींत, व तो व्याधीग्रस्त जरठ नवरा शेवटचे घडी समयीं तरी ह्या नवयौवना शुभांगीच्या गोंडस व सकुमार हातून तोंडांत पाणी मिळण्याकरितां तरी पण तिचें पाणिग्रहण केल्याशिवाय रहात नाहीं. पती मागें ही अनाथ पोर अखंड वैधव्यसागरांत बुडून जाते. असो. हल्लींचे विद्वान लोक आपल्या मुली अशा पीडितांस व वयोवृद्धांस न

देण्याविषयीं होईल तेव्हढा प्रयत्न करीत आहेत, हें प्रशंसनीय आहे.

कोंकणस्थांच्या भाषेमध्यें प्रायः अनुनासिकांचें प्राधान्य असून ओकारांत शब्द विशेष आढळतात. असली भाषा निव्वळ जुने लोक कोंकणांत बोलतात, तिचा एक मासला येथें देतों:—

"येश्वदाचों बोढयों मेलों मातलोंसे हरी
लुगडों घेवोंनीं गेलों चढलों कळंबावरी"

चित्पावन ब्राह्मण बहुतेक स्मार्त सांप्रदायी व क्वचित् मध्वमतानुयायीही आढळतात. ह्या जातीमध्यें ऋग्वेदी व यजुर्वेदी असे दोन वर्ग आहेत. ऋग्वेदी ह्यांचें सूत्र आश्वलायन व शाखा शाकल आहे. यजुर्वेद्यांचें सूत्र हिरण्यकेशी आणि शाखा तैतिरीय आहे. ह्यांच्यांत चौदा गोत्रें असून जुनीं उपनांवें साठ आहेत, तरी सांप्रत साडेतिनशें उपनांवें प्रसिद्ध आहेत.

चित्पावन ब्राह्मण पाहिजे तो धंदा करण्यास अगदीं मागें पुढें पाहत नाहींत. कोणी सावकार कोणी पेढीवाले, कोणी वैदिक, कोणी शास्त्री, पुराणिक, वैद्य, हरिदास, पंतोजी, गवई, खाणावळीवाले, दलाल, आचारी, पाणके, धोतरबडवे इत्यादि नानाविध धंदे हे करितात. ह्या पुण्यांत पांच सात वर्षां मागें कित्येक तर हजामतीही करीत असत. ह्यामुळें लोकांत त्यांचें वजन कमी झालें आहे. असेंही ऐकण्यांत येतें. कित्येकांचें

असें म्हणणें कीं, कोणत्याही तऱ्हेचे धंदे करणें हा देशोन्नतीचा उत्तम मार्ग होय !

चित्पावनांसारखे हाड कसून मेहनत करणारे, उद्योगी, तसेच बुद्धीमान्, साहसी, टापटिपीचे, पाहिजे तें करण्यास तयार, असे लोक ह्या महाराष्ट्रांत किंबहुना ह्या हिंदुस्थानांत विरळाच आढळतील.

**वक्तृत्वोत्तेजक सभाः**—आपल्या देशांत वक्ते निर्माण झाल्याशिवाय ह्या देशाची उन्नति होणार नाहीं असा 'ठाम सिद्धांत' ठरवून शहरांतील कित्येक लोकहितवादी गृहस्थांनीं इ० स० १८६८ या वर्षीं पुण्यांत ह्या सभेची स्थापना केली. व त्याप्रमाणें दरसाल बहुधा मे महिन्यांत हे भाषण—समारंभ नाटक-गृहांत होत असतात. व पंचानुमतें ज्या उमेद्वारांचें भाषण पसंत ठरेल त्यांस दहापासून पन्नास रु० पर्यंत बक्षीस देतात इतर अर्वाचीन सुधारणांचा ज्याप्रमाणें देशोन्नतीकडे रोंख ठेविला आहे त्याप्रमाणें या वक्तृत्वाचाही आहे, हें वर सूचविण्यांत आलेंच आहे. तें कसेंही असो, पण हे समारंभ दरसाल इतर ठिकाणच्या मानानें फारच प्रेक्षणीय, व श्रवणीय होतात यांत संशय नाहीं. बक्षिसादिकांचा खर्च टिकिटांच्या विक्रीपासून व कांहीं लोकांच्या देणगीपासून होत असतो.

**सार्वजनिक सभाः**—पुण्याचे प्रख्यात स्वदेशाभिमानी के० गणेश वासुदेव जोशी (सार्वजनिक काका) यांच्या खटपटीनें पुण्यांत तारीख २ एप्रिल स० १८७० इ० औंधचे संस्थानिक पंत प्रतिनिधि

यांच्या अध्यक्षते खालीं ह्या सभेची स्थापना झाली. दक्षिणेंतील मोठमोठे संस्थानिक–सरदार–राजेरजवाडे जहागीरदार–इनामदार–सरकारी नौकर–बडे बडे पेनशनर–वकील–व्यापारी, व इतर सुखवस्तु असे ह्या सभेचे सभासद आहेत. रयतेच्या कल्याणाकरितां ही सभा फार तत्पर असून पार्लमेंट्पर्यंतही महशूर आहे. ह्या सभेप्रमाणें वजनदार सभा ह्या देशांत इतरत्र क्वचित्च असेल. सभेच्या कामाची माहिती सर्वांस व्हावी ह्या उद्देशानें सभेचें एक त्रैमासिक पुस्तक ( इंग्रजी ) व एक मासिक पुस्तक ( मराठी ) अशीं उत्तम रीतीनें विवेचन केलेलीं दोन पुस्तकें छापून प्रसिद्ध होत असतात. ह्या सभेची कचेरी शुक्रवारांत 'जोशी–हॉल्'मध्यें आहे.

**नेटीव्ह जनरल् लायब्ररीः**—पुण्यांत ह्या पुस्तकालया पूर्वीं एकही लायब्ररी नव्हती, पण त्यावेळचे गव्हरनर सर जार्ज् क्लार्क् यांनीं सूचना केल्यामुळें दक्षिणेंतील सरदारांचे एजेन्ट 'वार्डन्'[१] साहेब ह्यांचे आश्रया खालीं ता० ७ फेब्रुवारी सन १८४८ सालीं ही लायब्ररी स्थापन झाली. ह्या स्तुत्य उद्योगांत रा० ब० गोपाळराव हरी देशमुख, रा० मोरो रघुनाथ दमदेरे, खान ब०

१ 'वार्डन साहेब' असें पुणें ग्यॅझीटीयर मध्यें दिलें आहे. पण ता० २६ मार्च १८४८ सालच्या प्रभाकरांत "ही लायब्ररी जज्ज साहेब 'हेनरीब्रोन' ह्यांचे आश्रया खालीं स्थापन झाली असें लिहिलें आहे.

पेंद्मजी पेस्तनजी, रा० आबासाहेब शास्त्री पटवर्धन व दुसरे आणखी श्रीमंत व होतकरू लोक असून त्यांनीं ह्या कामीं चांगल्या रीतीनें मदत केली. तरी प्रथम प्रथम तर ह्या लायब्ररींत शाळेतील मुलांशिवाय कोणीही पाय टाकीत नसे. पुढें हळूहळू लोकांस ग्रंथ वाचण्याची गोडी लागल्यामुळें, लोक येऊं जाऊं लागले. पुढें पुढें तर हिची चांगलीच भरभराटी होऊं लागली होती, पण सन १८७९ सालीं हिची ग्रह–दशा फिरून ही वरील सालाचे मे महिन्यांत ‘ अग्निरूप ’ होऊन बसली ! ह्या लायब्ररी सारखीं जुनीं पुस्तकें व ग्रंथ–संग्रह दुसरा कोठेंही नव्हता. लायब्ररी जळाली त्यावेळीं ५७०० पुस्तकें असून त्यांची किंमत पंचवीस हजारांवर होती. हीं चट्ट सारीं पुस्तकें जळून खाक झालीं. नंतर आश्रयाची याद फिरविली त्यावेळीं म्युनिसिपालिटीनें पांचशें रुपये दिले. हल्लीं ही लायब्ररी सार्वजनिक सभेच्या मंदिरांत किंवा जोशी–हॉलांत असून तींत आजमित्तीला ग्रंथ–संख्या एक हजारावर झाली आहे. शिवाय सोळा वर्तमानपत्रें व चार मासिक पुस्तकें येत असतात–वर्गणीदार सुमारें १०० असून त्यांची वर्गणी सालीना साडे सहाशें होते. शिवाय देणगीचे रुपयेही शें–दोनशें जमा होतात. दिवसानुदिवस हींत ग्रंथ–संख्या वाढत असून पुनरपि नवा रूपास येत चालली आहे. व हें पुण्यास भूषणच आहे.

# पुस्तकांतील स्थळांचा कोश.


| | पृष्ठ. |
|---|---|
| अंबारखाना.... .... | ६२ |
| अमृतेश्वर..... .... | ७२ |
| अस्मानी महाल ... | ७७ |
| आनंदोद्भव ना० गृह | ७० |
| आर्यभूषण ना० गृह. | ५७ |
| आरसेमहाल .... | ७७ |
| ओंकारेश्वर.... .... | ७२ |
| कचेरी दिवाणखाना. | ७६ |
| कसबा पेठ.... .... | ६१ |
| कात्रज.... .... | १०४ |
| कोतवालचावडी ... | ७० |
| खडकवासला.... | १०४ |
| गणपतीचें देवालय | ६२ |
| गणेश पेठ.. .... | ५६ |
| गणेश पेठेचा पूल.. | ११८ |
| गणेश दिवाणखाना. | ७६ |
| गणेश खिंडींतील गणपती.... .... .... | ९८ |
| गंज पेठ.... .... | ५१ |
| गोकाक दिवाणखाना. | ७५ |
| गोसावीपूरा.... .... | ४४ |
| गोसाव्यांचा पूल.... | ११९ |
| घरें.... .... .... | १११ |
| घशेटीचापूल........ | ११८ |
| घोडपीर.... .... | ४९ |
| घोरपडे पेठ......... | ५२ |
| घोरपड्यांचा वाडा.... | ६१ |
| चतुःशिंगी.... .... | ९८ |
| चित्पावन ब्राह्मण.. | १५३ |
| चैनबाजी.... .... | १३४ |
| चौधरी यांचा नळ. | १०९ |
| जकातीपूल.... .... | ११७ |
| जुम्मा मशीद..... | ६१ |
| डुल्यामारुती........ | ५७ |
| त्र्यंबकजी डेंगळा. | ४० |
| तांबडी जोगेश्वरी ... | ७० |
| तुळशीबाग.... .... | ६८ |
| दवाखानें.... .... | १२६ |
| दारूवाल्यांचा पूल. | ११७ |
| धरण.... .... ... | ११४ |
| धंदे.... .... .... | १४८ |
| नवें मार्केट.... .... | ५४ |

नरसोबाचें दे...
न्याहाळ
नानाची पेठ..
नानाचा नळ .
नानाफडणवीस ... २
नागेश्वराचें देऊळ ... ४
नाचें दिवाणखान . ... १२
नारायणरावांचा महाल
.... .... .... ... ७७
नारायण पेट. .. ८०
नाटकें.... .... .. .१२८
निवडुंग्या विठोबा ९०
नेटिव्ह ज० लायब्ररी
.... .... .... ....१६०
पर्वती.... .... .... ८८
पर्वतीचें तळें .. .... ८६
पंचाळेश्वर गुहा ९९
पानसे .... .... ३५,९६
पाषाण..... .... ....९९
पाण्याचा पुरवठा. १०३
पारशांची अग्यारी. ९०
पारशांचा पूल.... ११८
पारसनाथाचें देऊळ. ९२
पुणें म्युनिसिपालिटी ११९
पुरंदरे यांचा वाडा. ६२
पुष्करणीचा हौद. ८९

पृष्ठ.
पेठ्यांचा वाडा. .... ६३
पेशव्यांचें दरबार. २७
फडके यांचा वाडा. ९८
बावनखाणी.... .... ९६
बुधवार पेठ.... .... ६६
बुधवारचा वाडा ....६९
बुरुडांचा पूल.... ११८
बेलबाग.... .... ६७
बोहऱ्यांचा जमातखाना,
.... .... ....६०
भवानी पेठ .... ....९१
भट्टीगेटाचा पूल....११९
भांबुर्डें.... .... ....९९
मंडई.... .... .... १२३
मंगळवार पेठ........४१
मुजफरजंग पेठ .... ९१
मोरोबादादांचा वाडा.६९
रविवार पेठ.... ....९८
रस्ते ... .... .... १०९
रामेश्वराचें देऊळ.... ९४
रास्ते पेठ.... .... ४९
रामशास्त्री.... .... ३४
रास्ते यांचा नळ १०७
लक्ष्मीनारायणाचें दे-
ऊळ.... .... .... ६३
लक्ष्मीश्वर.... .... ६४

| | पृष्ठ. | | पृष्ठ. |
|---|---|---|---|
| लकडी पूल. | ८३,११३ | शेखसाल्यांचे दर्गे.... | ६४ |
| लोक वस्ती.... .... | १२१ | सदाशिव पेठ........ | ८१ |
| वक्तृत्वोत्तेजक सभा | १५९ | सदाशिव पेठेचा हौद | ८१ |
| विश्रामबागचा हौद | ८२ | सण.... .... .... | १४४ |
| विद्याभ्यास...... | १४० | सार्वजनिक सभा.... | १५९ |
| वेताळ पेठ.... .... | ५२ | सोमेश्वराचें देऊळ.... | ६० |
| वेलस्ली पूल........ | ११५ | सोमवार पेठ.... .... | ४२ |
| शहरचा तुरुंग.... | ५३ | हणमंत पेठ.... .... | ४९ |
| शनिवार पेठ.... .... | ७१ | हस्तीदंती दिवाणखाना.... .... .... | ७६ |
| शनिवारचा वाडा.... | ७२ | हलालखोरांचा पूल | ११८ |
| शुक्रवार पेठ.... .... | ५३ | हिराबाग.... .... | ८६ |
| शुक्रवारचा वाडा.... | ५५ | | |

**सूचना**:—ह्या पुस्तक संबंधीं हरएक प्रकारें पत्रव्यवहार करणें तो आमच्या नांवें पुणें पेठ रास्ते येथें करणें. ग्राहकांनीं दुसरीं आणखी मनरंजक वगैरे पुस्तकें मागविल्यास तीं आनंदानें आह्मी पाठवूं.

## विक्रीस तयार.

| सीताराम रामचंद्र गाईकवाड कृत. | रु० | आ० | पै |
|---|---|---|---|
| विजापूर वर्णन [ देखाव्यांसह ] | १ | ० | ० |
| पुणें शहर भाग १ [ नकाशांसह ] | ० | १४ | ० |
| बालकांड ( निरंजन कविकृत ) | ० | ८ | ० |
| कुणकेश्वर ... ... ... ... ... ... | ० | ८ | ० |
| सोलापूर जिल्ह्याचा भूगोल ... ... ... | ० | ० | ६ |
| **विष्णु पांडुरंग राणे कृत.** | | | |
| मराठी पांचव्या पुस्तकाचा शब्द संग्रह ... ... | ० | ४ | ० |
| रायल रीडर्स नंबर १ चे शब्द ... ... ... | ० | २ | ३ |
| मोडी पहिल्या पुस्तकाचे शब्द ... ... ... | ० | १ | ० |
| ,, दु० ऱ्या ,, ,, ... ... ... | ० | १ | ० |
| ,, ति० ,, ,, ,, ... ... ... | ० | १ | ० |
| Notes on the History of England | 0 | 1 | 0 |

आठ आणे व वर किंमतीच्या पुस्तकांस ट० हं० एक आणा प्रमाणें पडेल. मास्तर लोकांस कमिशनचे दर निराळे आहेत.

---

**पुणें शहर भाग २.**—हा हल्लीं आह्मी तयार करीत आहों. ह्यांत सिव्हिल लाईन किंवा सबरबन, खडकी, पुणें लष्कर वगैरेंतील इंग्रजी अमलांतील स्थळांची साद्यंत हकीकत; कवनें, मुंढवें, शिंदे व होळकर यांच्या छत्र्या, खडकवासला, रम् फयाक्टरी ( शराब करण्याची गिरणी, ( कागद व साखर करण्याची गिरणी, वासुदेव बळवंत फडके, खडकीची लढाई, विठ्ठलवाडी, इत्यादि अनेक स्थळें असून, हा भाग मोठा मनोरंजक उतरला आहे. ह्या पुस्तकाची किंमत न पाठवितां फक्त आपली नांवें कृपा करून आश्रयदात्यांनीं पाठविणें. हें पुस्तक केव्हां तयार होईल त्याबद्दल वर्तमानपत्रांत जाहिरातीनें कळवूं.

सीताराम रामचंद्र गाईकवाड,
पुणें पेठ रास्ते घर नं० २८२.